CMYK

सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

सदाफुलीसह

सोलापूर | बुधवार, १० जून २०२६ । युगाब्द ५१२८ । वर्ष ४२ वे अंक १९२ । पाने १२+८ । किंमत रु. ८/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com



CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





रशिया-युक्रेन युद्धाने भीषण रूप धारण केले आहे. कुणाही मागे हटायला तयार नाही. मंगळवारी रशियाने खार्किव्ह शहरावर केलेल्या क्षेपणास्त्र माऱ्यानंतर नागरी वस्तीत आग लागली

## चिनी कंपन्यांवर अमेरिकेची बंदी

◆ **वॉशिंग्टन, ९ जून**

अमेरिकेचा संरक्षण विभाग पेंटागॉनने चिनी लष्कराशी संबंध असल्याचा आरोप करत अलीबाबा, बायडू आणि युनिट्री या प्रमुख चिनी कंपन्यांवर बंदी घातली आहे. या कंपन्यांना अमेरिकेच्या संरक्षण कंत्राटासाठी बोली लावण्यास निर्बंध घालण्यात आले.

पेंटागॉनने निवेदनात म्हटले की, तीन कंपन्यांचा चिनी लष्कराला मदत करत असल्याचे चौकशीत समोर आहे. त्यामुळे या कंपन्यांना काळ्या यादीत टाकण्यात आले. या कंपन्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे चीनच्या लष्करी सामर्थ्यात योगदान देत आहेत. त्यामुळे या कंपन्यांना अमेरिकेच्या संरक्षण कंत्राटांमधून वगळण्यात आले. नवीन यादीत १८८ चिनी कंपन्यांचा समावेश आहे. चीन आपली लष्करी शक्ती वाढवण्यासाठी खाजगी कंपन्या आणि संशोधन संस्थांचा वापर करीत आहे. चीन सामान्य व्यवसाय वाटणाऱ्या कंपन्यांकडून प्रगत तंत्रज्ञान आणि कौशल्य मिळवितो. भविष्यात आर्टिफिशियल इंटेलिजन्स तंत्रज्ञानाचा वापर लष्करी उद्देशांसाठी चीनकडून होण्याची शक्यता आहे. (वृत्तसंस्था)




# एक लाख डॉलर्स आकारणे बेकायदेशीर

- **अमेरिकन न्यायालयाचा ट्रम्प यांना धक्का**
- **‘एच-१बी व्हिसा’साठीची शुल्कवाढ रद्द; भारतीयांना दिलासा**

◆ **वॉशिंग्टन, ९ जून**

एच-१बी व्हिसा शुल्कवाढीसंदर्भात न्यायालयाच्या निर्णयामुळे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मोठा धक्का बसला आहे. अमेरिकेच्या फेडरल न्यायालयाने ट्रम्प प्रशासनाचा एच-१बी व्हिसासाठी एक लाख डॉलर्स (९० लाखांहून अधिक भारतीय रुपये) आकारण्याचा निर्णय बेकायदेशीर ठरवून तो रद्द केला आहे. बोस्टन जिल्हा न्यायालयाचे न्यायाधीश लिओ सोरोकिन यांनी सोमवारी हा निकाल दिला. या निर्णयाचा अमेरिकेत स्थलांतर करू इच्छिणाऱ्या भारतीयांना फायदा होणार आहे.

२० डेमोक्रॅटिक राज्यांच्या ॲटर्नी जनरलनी दाखल केलेल्या खटल्याची सुनावणी घेतल्यानंतर अमेरिकेचे जिल्हा न्यायाधीश लिओ सोरोकिन यांनी हा निकाल दिला. या खटल्यात डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने गतवर्षी सप्टेंबरमध्ये एच-१बी व्हिसा



शुल्क वाढवण्याच्या निर्णयाला आव्हान देण्यात आले होते. ट्रम्प प्रशासनाने एच-१बी व्हिसा मिळवण्याचा खर्च अनेकदा वाढवून १ लाख डॉलर्सपर्यंत नेला होता.

एका न्यायाधीशाने डोनाल्ड ट्रम्प यांची एच-१बी व्हिसा शुल्कवाढ बेकायदेशीर ठरवली. कारण तिला काँग्रेसची (अमेरिकन संसद) मंजुरी मिळाली नव्हती. गतवर्षी ट्रम्प यांच्या आदेशापूर्वी परदेशी कामगारांसाठी एच-१बी व्हिसा मिळवू इच्छिणाऱ्या कंपन्यांना विविध कारणांनुसार साधारणपणे दोन ते पाच हजार डॉलर्स शुल्क भरावे लागत असे. ट्रम्प यांनी हे शुल्क वाढवून एक लाख डॉलर्स केले.

**व्हिसा नियम केले अधिक कठोर**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाल्यापासून डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हिसा नियम अधिक कडक करण्यावर भर दिला आहे. ट्रम्प प्रशासनाचा युक्तिवाद आहे की, अमेरिकेचे व्हिसा धोरण जगभरातील लोकांना फायदेशीर ठरते, तर अमेरिकन नागरिकांसाठी ते हानिकारक आहे. त्यामुळे, व्हिसा नियम अधिक कडक केल्याने अमेरिकन तरुणांसाठी रोजगाराच्या संधी वाढतील. या उपायांमध्ये व्हिसाच्या अधिक कठोर अटी आणि नवीन एच-१बी (-१) अर्जांसाठी वाढीव शुल्काचा समावेश होता. तथापि, न्यायालयाने आता एच-१बी व्हिसावरील शुल्कवाढीला स्थगिती दिली आहे. (वृत्तसंस्था)

### भारतीय सर्वांत मोठे लाभार्थी

**अमेरिकेच्या एच-१बी कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ६५,००० व्हिसा जारी केले जातात. याव्यतिरिक्त, उच्च पदवी असलेल्या कर्मचाऱ्यांना २०,००० व्हिसा दिले जातात, जे तीन ते सहा वर्षांसाठी मंजूर केले जातात. या व्हिसा कार्यक्रमाचे भारतीय सर्वात मोठे लाभार्थी ठरले आहेत. त्यामुळे, ट्रम्प प्रशासनाने शुल्कवाढ स्थगित केल्याने भारतीयांना दिलासा मिळेल.**

## फटाक्यांच्या कारखान्यात स्फोट; सात जणांचा मृत्यू

◆ **जयपूर, ९ जून**

जयपूरमध्ये मंगळवारी फटाक्यांच्या कारखान्यात आग लागल्याने सिलेंडरचा स्फोट झाला. यात सात जणांचा मृत्यू झाला तर पाच जण गंभीर जखमी झाले. ही घटना खोह नागोरियन परिसरात सकाळी ११.३० च्या सुमारास घडली. अग्निशमन दलाची पथके घटनास्थळी पोहोचली असता आगीच्या ज्वाळांनी कारखान्याचा बराचसा भाग व्यापला होता. अतिरिक्त जिल्हाधिकारी युगांतर शर्मा यांनी सांगितले की, हा कारखाना एका घरात बेकायदेशीरपणे चालवला जात होता. गॅस सिलेंडरने पेट घेतला आणि त्याचा स्फोट झाल्यानंतर ही घटना घडली.

# शांतता करार लागू करा अन्यथा रेल्वे; रस्ते रोखणार

### आत्मसमर्पण करणाऱ्या बंडखोरांचा इशारा

◆ **आगरतळा, ९ जून**

ईशान्य भारतात दोन वर्षांपूर्वी आत्मसमर्पण केलेल्या बंडखोरांनी शांतता करार लागू करा अन्यथा १२ जूनला त्रिपुरातील तीन ठिकाणी रेल्वे आणि रस्ते वाहतूक रोखू, असा इशारा सोमवारी दिला. त्यांनी राज्य आणि केंद्र सरकारसोबत झालेल्या शांतता करारांची तत्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणीही केली.

केंद्र आणि राज्य सरकारांमध्ये झालेल्या करारानुसार नॅशनल लिबरेशन फ्रंट ऑफ त्रिपुरा आणि ऑल त्रिपुरा टायगर फोर्सच्या सुमारे १२०० सदस्यांनी सप्टेंबर २०२४ मध्ये सिपाहीजाला जिल्ह्यातील जंपाजाला येथे त्रिपुराचे मुख्यमंत्री माणिक साहा यांच्यासमोर शस्त्रे ठेवत आत्मसमर्पण केले. केंद्र सरकारने आत्मसमर्पण केलेल्या बंडखोरांच्या तसेच स्थानिक लोकांच्या सर्वांगीण विकासासाठी २५० कोटी रुपयांच्या पॅकेजची घोषणाही केली होती.

आत्मसमर्पण करणाऱ्या बंडखोरांचे नेते प्रसेनजित देबबर्मा यांनी प्रसारमाध्यमांना सांगितले की, आमच्या कार्यकर्त्यांच्या आणि आदिवासी लोकांच्या कल्याणासाठी केंद्र आणि राज्य सरकारांसोबत शांतता करार होऊन दोन वर्षे झाली आहेत. याअंतर्गत आमच्या लोकांच्या पुनर्वसनासाठी २५० कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करण्यात आले होते. या विषयावर चर्चा करण्यासाठी आम्ही केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या भेटीची वेळ मागितली होती. परंतु, आम्हाला कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. (वृत्तसंस्था)

### ३९७ कोटींचा रोहित्र घोटाळा

# एफआयआर दाखल

## हस्तक्षेपास सर्वोच्च न्यायालयाचा नकार

◆ **नवी दिल्ली, ९ जून**

सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यानंतर द्रमुक सरकारच्या विद्युत मंत्री व्ही. सेंथिल बालाजी यांच्या कार्यकाळात झालेल्या रोहित्र खरेदीप्रकरणी सीबीआयने गुन्हा दाखल केला आहे. २०२१ ते २०२३ दरम्यान झालेल्या रोहित्र खरेदीतील कथित ३९७ कोटी रुपयांच्या घोटाळ्याप्रकरणी सीबीआयने एफआयआर दाखल केला आहे. यासंदर्भात अरप्पोर इयक्कम या स्वयंसेवी संस्थेने मद्रास उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. एजन्सीने टँजेडकोच्या चेन्नईस्थित निविदा आमंत्रण प्राधिकरण आणि निविदा छाननी समितीचे तत्कालीन अधिकारी, इतर सरकारी अधिकारी, खाजगी व्यक्ती आणि कंत्राटदारांविरोधात भारतीय दंड संहितेच्या गुन्हेगारी कट आणि फसवणुकीशी संबंधित कलमांखाली तसेच भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींनुसार गुन्हा दाखल केला आहे.




टॅन्जेडकोने २०२१, २०२२ आणि २०२३ मध्ये २५ केव्हीएसी ते ५०० केव्हीएसी पर्यंतच्या विविध वैशिष्ट्यांच्या वितरण रोहित्रांच्या पुरवठ्यासाठी काढलेल्या निविदांमध्ये भ्रष्टाचार झाला. त्यामुळे निविदाकारांना अवाजवी फायदा झाला आणि सरकारी तिजोरीचे ३९७ कोटी रुपयांचे नुकसान झाले. (वृत्तसंस्था)

### मद्रास उच्च न्यायालयाचा चौकशीचा आदेश

**रोहित्र खरेदीतील कथित घोटाळ्याची सीबीआय चौकशी करण्याचे निर्देश देणाऱ्या मद्रास उच्च न्यायालयाच्या आदेशात सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिल्यानंतर जवळपास एका महिन्याने ही सीबीआय कारवाई झाली आहे. २९ एप्रिलला मद्रास उच्च न्यायालयाने तामिळनाडू सरकारने केलेल्या ४५,००० वितरण रोहित्रांच्या खरेदीतील कथित अनियमिततेची सीबीआय चौकशी करण्याचे आदेश दिले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर, बालाजी यांनी सांगितले की, निविदा प्रक्रियेत सर्व प्रक्रिया योग्यरीत्या पाळण्यात आल्या होत्या आणि ट्रान्सफॉर्मरच्या खरेदीत कोणतीही अनियमितता नव्हती.**

## चित्रपट वार्ता

### ‘धुरंधर’चा ओटीटीवर इतिहास



**मुंबई** : चित्रपटगृहांमध्ये घवघवीत यश मिळवल्यानंतर रणवीर सिंगचा ‘धुरंधर : द रिव्हेंज’ हा चित्रपट आता ओटीटी प्लॅटफॉर्मवरही प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे. डिजिटल प्रदर्शनानंतर अवघ्या काही दिवसांतच या चित्रपटाने विक्रमी प्रेक्षकसंख्या मिळवत आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. हिंदीसह तमिळ, तेलुगू, मल्याळम आणि कन्नड भाषांमध्ये उपलब्ध करण्यात आला आहे. त्यामुळे देशभरातील विविध भाषिक प्रेक्षकांपर्यंत चित्रपट पोहोचला. विशेष म्हणजे, चित्रपट पाहणाऱ्यांपैकी मोठ्या प्रमाणावर प्रेक्षकांनी स्मार्ट टीव्ही आणि कनेक्टेड स्क्रीनचा वापर केल्याचे दिसून आले आहे. यावरून घरच्या घरी मोठ्या पडद्यावर चित्रपट पाहण्याचा कल वाढत असल्याचे स्पष्ट होते.

### ‘कपबशी’ पथकाच्या वाहनाला अपघात







**सांगली** : सांगलीकडे चित्रपटाच्या प्रचारासाठी जात असताना मराठी अभिनेत्री पूजा सावंत आणि ‘कपबशी’ चित्रपटाच्या टीमला अपघाताचा सामना करावा लागला. सातारा जिल्ह्यातील काशीळ परिसरात महामार्गावर तीन वाहनांची एकमेकांना धडक बसल्याने ही घटना घडली. या अपघातामुळे काही काळ परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.चित्रपटाच्या प्रचार मोहिमेसाठी पुण्याहून सांगलीकडे निघालेल्या टीममध्ये अभिनेत्री पूजा सावंत, अभिनेता ऋषी मनोहर आणि चित्रपटाचे प्रसिद्धी प्रमुख दर्शन मुसळे यांचा समावेश होता. प्रवासादरम्यान अचानक झालेल्या अपघातात संबंधित वाहनांचे मोठे नुकसान झाले. मात्र सुदैवाने कुणाही जखमी झाले नाही. या दुर्घटनेनंतर चाहत्यांमध्ये चिंता निर्माण झाली होती. मात्र पूजा सावंत, ऋषी मनोहर आणि इतर सर्व सदस्य सुरक्षित असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर चाहत्यांनी सुटकेचा निश्वास सोडला.

### सलमानला मित्राच्या निधनाने धक्का



**मुंबई** : बॉलिवूड अभिनेता सलमान खानवर पुन्हा एकदा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. काही दिवसांपूर्वी जिवलग मित्राच्या निधनाचा धक्का सहन करत असतानाच आता कुटुंबाच्या अतिशय जवळच्या असलेल्या कुमुद राणे यांच्या निधनाने खान कुटुंब शोकसागरात बुडाले आहे. या अंत्यसंस्काराला सलमानसोबत त्याची आई सलमा खान, भाऊ अरबाज खान आणि सोहेल खानही उपस्थित होते. कुमुद राणे या खान कुटुंबाशी अनेक वर्षांपासून निकट संबंध ठेवून होत्या. अंत्यसंस्कारादरम्यान सलमान अत्यंत भावूक झालेला दिसला. यापूर्वीही सलमानला त्याचा दीर्घकाळचा मित्र सुशील कुमार यांच्या निधनाचा मोठा आघात बसला होता.

# भारताची ‘समृद्धी’कडे वाटचाल

## पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन, १२ वर्षे विश्वास, विकास

◆ **नवी दिल्ली, ९ जून**

१.४ अब्ज देशवासियांच्या आशीर्वादाने आणि राष्ट्र प्रथम या भावनेने सरकारने युवक, महिला, शेतकरी आणि गरिबांच्या सक्षमीकरणासाठी अथक परिश्रम घेतले, ज्यामुळे भारताने जागतिक स्तरावर एक नवीन ओळख निर्माण केली आहे. गेली १२ वर्षे विश्वास, विकास आणि लोककल्याणाने भरलेली होती. सेवा, सुशासन आणि समृद्धीच्या मार्गावर भारताची वाटचाव सुरू असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे.

पंतप्रधानपदावर आरुढ होण्यास १२ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने मोदी यांनी एक्सवरील म्हटले की, आमच्या सरकारची गेल्या १२ वर्षांची कारकीर्द विश्वास, विकास आणि लोककल्याणासाठी समर्पित राहिली आहे. गरीब कल्याण, महिला सक्षमीकरण, राष्ट्र उभारणी, युवाशक्ती, आरोग्य, राष्ट्र प्रथम, शेतकरी कल्याण, मध्यमवर्ग आणि वारसा व विकास याला प्राधान्य दिले. लोककल्याणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन, दरमहा ८१ कोटींहून अधिक लोकांना मोफत धान्य पुरवले जात आहे.

याशिवाय, ४ कोटींहून अधिक पंतप्रधान गृहनिर्माण योजना, १०.५ कोटींहून अधिक उज्ज्वला गॅस जोडण्या आणि १२० दशलक्ष शौचालयांच्या बांधकामामुळे लाखो कुटुंबांचे जीवन सुकर झाले. महिला सक्षमीकरण हे सरकारचे मोठे यश असल्याचे वर्णन करताना ते म्हणाले की, ३२ कोटींहून अधिक महिलांसाठी जन धन खाती उघडण्यात आली आहेत. महिलांना सैन्यात कायमस्वरूपी कमिशनची संधी देण्यात आली आहे. ३ कोटींहून अधिक महिला लखपती दीदी बनल्या, तर ९१ लाखांहून अधिक बचत गटांच्या माध्यमातून १० कोटी ग्रामीण महिला आर्थिक सक्षम झाल्या आहेत.



### अर्थव्यवस्थेची गरुडझेप

**१२ वर्षांतील विकास आणि विश्वासाच्या बळावर भारताने जागतिक अर्थव्यवस्थेत ११ व्या स्थानावरून थेट पहिल्या ५ अर्थव्यवस्थांमध्ये झेप घेत ४.१५ ट्रिलियन डॉलर्सचा टप्पा गाठला आहे. ‘मेक इन इंडिया’, ‘आत्मनिर्भर भारत’ यामुळे उत्पादनाचे नवीन युग सुरू झाले, ज्यामुळे जागतिक कंपन्यांसाठी भारत हा सर्वोत्तम पर्याय बनल्याचे मोदी म्हणाले.**

### २६ शहरांमध्ये मेट्रोचा विकास

**देशभरातील २६ शहरांमध्ये १,१०० किलोमीटरहून अधिक मेट्रो नेटवर्क विकसित करण्यात आले आहे. सध्या १६४ वंदे भारत ट्रेन कार्यरत आहेत. अटल सेतू, सुदर्शन सेतू, चिनाब रेल्वे ब्रिज, बोगीबील ब्रिज आणि पांबन सी ब्रिज यांसारख्या मोठ्या प्रकल्पांचे बांधकामही याच काळात झाले. देशातील विमानतळांची संख्या ७४ वरून १६४ झाली आहे. २ कोटी तरुणांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले, तर मुद्रा योजनेअंतर्गत ४० लाख कोटी रुपयांपेक्षा अधिकचे कर्ज वितरित करण्यात आले.**

### सांस्कृतिक वारशाचे जतन प्रमुख उपलब्धी

पंतप्रधानांनी शेतकरी कल्याण, राष्ट्रीय सुरक्षा, मध्यमवर्गीयांना कर सवलत आणि सांस्कृतिक वारशाचे जतन ही सरकारची प्रमुख उपलब्धी असल्याचेही सांगितले. अयोध्येतील राम मंदिराचे बांधकाम आणि काशी विश्वनाथ धाम, महाकाल महालोक व केदारनाथ धाम यांचा पुनर्विकास यांसारखे प्रकल्प भारताच्या एकीकरणाचे प्रतीक आहेत. (वृत्तसंस्था)

# व्याप्त काश्मिरात आंदोलन चिघळले

◆ **मुझफ्फराबाद, ९ जून**

प्रलंबित मागण्यांसाठी आंदोलन करणाऱ्या जॉईंट आवामी ॲक्शन कमिटी (जेएएसी) संघटनेवर सरकारने घातलेल्या बंदीच्या विरोधात व्याप्त काश्मिरात सलग दुसऱ्या दिवशी संघर्षाची परिस्थिती कायम आहे. आंदोलकांनी मंगळवारी शासकीय इमारती, वाहनांची तोडफोड आणि जाळपोळ केली. सुरक्षा दलासोबत झालेल्या संघर्षात ३५ ठार, तर १०० पेक्षा अधिक जखमी झाले. मृतकांमध्ये चार पोलिस कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

जेएएसी आणि सरकार यांच्यात विधानसभेच्या १२ आरक्षित जागांवरून वाद सुरू आहे. या जागा व्याप्त काश्मीरमधून पाकिस्तानच्या इतर भागांमध्ये स्थलांतरित झालेल्या निर्वासितांसाठी आरक्षित आहेत. जेएएसीने या जागा रद्द करण्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू केले असताना सरकारने ५ जून रोजी या संघटनेवर दहशतवादविरोधी कायद्यांतर्गत बंदी घातली. त्यानंतर या भागात तणाव वाढत आहे. जेएएसी कार्यकर्त्याचा पोलिसांच्या गोळीबारात मृत्यू झाल्यानंतर आंदोलन भडकले. रावलकोटचे आयुक्त सरदार वहीद खान यांनी सांगितले की, मंगळवारी आंदोलकांनी मुझफ्फराबाद, रावलकोट आणि विविध भागात शासकीय इमारती आणि वाहनांची जाळपोळ केली. पोलिसांवरही हल्ला करण्यात आला. यात चार पोलिस ठार झाले. याला प्रत्युत्तर म्हणून सुरक्षा दलांच्या कारवाईत ३१ आंदोलक मारले गेले आणि १०० पेक्षा अधिक जखमी झाले आहेत. दुसरीकडे जेएएसीच्या पदाधिकाऱ्यांनी आरोप केला की, शांततेत आंदोलन करणाऱ्यांवर सुरक्षा दलाने गोळीबार केला. (वृत्तसंस्था)

### शासकीय इमारती, वाहनांची जाळपोळ, हिंसक संघर्षात ३५ ठार, १०० पेक्षा अधिक जखमी



### बंदची हाक, बळाचा वापर

जॉईंट आवामी ॲक्शन कमिटीने मंगळवारी व्याप्त काश्मिरात बंदची हाक दिली. त्यानंतर सुरक्षा दलाने बंद मोडून काढण्यासाठी आंदोलकांची धरपकड केल्याने परिस्थिती चिघळली. आंदोलक आणि पाकिस्तानी सुरक्षा दलांमध्ये अनेक ठिकाणी संघर्ष झाला. आंदोलकांवर बळाचा वापर केल्याने आता आंदोलक दक्षिणेकडील जिल्हा असलेल्या भीमबरमधून लाँग मार्च सुरू करतील. हा मोर्चा मीरपूर, कोटली आणि पूंछमधून जाईल आणि १० जून रोजी मुझफ्फराबादला पोहोचेल, जिथे विधानसभेबाहेर धरणे आंदोलन केले जाईल.

### आम्ही मागे हटणार नाही



प्रशासनाने स्पष्ट केले की, कोणत्याही परिस्थितीत या मोर्चाला परवानगी दिली जाणार नाही. आंदोलनात सहभागी असलेल्या २०० हून अधिक लोकांना अटक करण्यात आली आहे. जेएएसीचे नेते शौकत मीर यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले की, सरकारने रावलकोटमध्ये लोकांचे हत्याकांड सुरू केले आहे. कोणत्याही परिस्थितीत आंदोलनातून आम्ही मागे हटणार नाही. पाकिस्तानी सरकारकडून दडपशाही केली जात आहे.

## फिलिपाईन्समधील भूकंपात ४१ जणांचा मृत्यू

◆ **मनाली, ९ जून**

फिलिपाईन्समध्ये सोमवारी झालेल्या ७.८ तीव्रतेच्या भूकंपामुळे प्रचंड विध्वंस झाला आहे. यात आतापर्यंत सुमारे ४१ लोकांचा मृत्यू झाला असून अनेक जण जखमी आहेत. त्यामुळे मृतकांचा आकडा आणखी वाढण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

हा शक्तिशाली भूकंप मिंडानाओच्या दक्षिणेकडील बेटाजवळ झाला. या भूकंपामुळे अनेक घरे कोसळली, शाळेच्या इमारती पडल्या, रस्ते आणि पूल उद्ध्वस्त झाले आहेत. (वृत्तसंस्था)

# नेपाळमध्ये भारतीय आंब्यावर बंदी

## दरवाढीच्या भीतीने व्यापाऱ्यांनी दिला आंदोलनाचा इशारा

◆ **काठमांडू, ९ जून**

जपानपाठोपाठ आता शेजारी देश नेपाळनेही भारतीय आंब्यांच्या आयातीवर पूर्णपणे बंदी घातली आहे. फळांवर प्रमाणाच्या बाहेर रासायनिक कीटकद्रव्ये आढळल्याचे कारण देत आंबे आयात थांबविली आहे. या निर्णयाचा नेपाळातील व्यापाऱ्यांनी तीव्र विरोध करणे सुरू केले आहे.

भारतावर अवलंबून असलेल्या नेपाळच्या या निर्णयाचा फटका आंबा उत्पादकांना होणार आहे. उत्तर प्रदेश, महाराष्ट्रासह दक्षिणेतील राज्यांमधून मोठ्या प्रमाणात नेपाळमध्ये आंबे निर्यात होतात. या निर्णयामुळे व्यापाऱ्यांचे नुकसान होणार नसून फायदा होणार आहे. स्थानिक आंबा उत्पादकांना चांगला दर मिळून नागरिकांना ताजे आंबे चाखायला मिळतील, असे नेपाळच्या फलोत्पादन मंत्रालयाने म्हटले आहे. नेपाळच्या मधेशी प्रांतात मोठ्या प्रमाणात आंब्यांचे उत्पादन होते. यातील बहुतांश आंबे निर्यात होतात. त्यामुळे स्थानिक बाजारपेठेत तुटवडा निर्माण होतो आणि तो भरून काढण्यासाठी व्यापारी भारतीय आंबे आयात करतात. आता आयातीवर बंदी घातल्याने आणि मागणी आणि पुरवठा यात ताळमेळ नसल्याने तुटवडा निर्माण होऊन आंब्यांचे दर वाढण्याची भीती व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे. (वृत्तसंस्था)

### आयातबंदीनंतर बाजारपेठांमध्ये दरवाढ

**भारतीय आंब्यांना नेपाळमध्ये मोठी मागणी आहे. स्वस्त आणि मुबलक प्रमाणात आंबे व्यापारी भारतातून आयात केले जातात. अचानक बंदी घातल्याने फळांचे दर वाढले आहेत. परिणामी ज्यांनी यापूर्वीच माल साठवून ठेवला किंवा आयातीचे पैसे दिले, असे व्यापारी अडचणीत आले आहेत.**

### भारताचे पाच मोठे ग्राहक देश

**भारताच्या आंबा निर्यातीच्या यादीत नेपाळचा समावेश नाही. भारताचे अमेरिका, ब्रिटन, नेदरलँड, संयुक्त अरब अमिरात आणि सौदी अरेबिया हे पाच देश महत्वाचे आयातदार आहेत. तथापि, काही शेजारी देशांच्या नादी लागून नेपाळ भारतविरोधी भूमिका घेत आहे. पंतप्रधान बालेन शहा यांच्या कार्यकाळात संबंधात सुधारणा होण्याऐवजी तणाव निर्माण होत आहे.**

CMYK


सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
सदाफुलीसह





| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



भारत हजारो वर्षांपासून हिंदू राष्ट्र आहे. हिंदू राष्ट्र काही नव्याने बनवायचे नाही. या हिंदू राष्ट्राचा आपणास सर्वांगीण विकास करायचा आहे. हिंदू समाजाला हिंदू म्हणून जागे करायचे आहे.

**- स्व. प्रो. राजेंद्रसिंह उपाख्य रज्जूभय्या**
रा. स्व. संघाचे चतुर्थ सरसंघचालक

## महत्त्वाचे

### शेअर बाजारात तेजी; दोन दिवसांच्या घसरणीला ब्रेक

**मुंबई :** भारतीय शेअर बाजाराने दोन दिवसांच्या घसरणीला ब्रेक लावला असून, मंगळवारी सेन्सेक्स ३९५ अंकांनी वधारला. कच्च्या तेलाच्या घसरलेल्या किमती, अमेरिका-इराणमधील तणाव निवळणे आणि बँकेच्या शेअर्समधील तेजीमुळे बाजाराला मोठा आधार मिळाला. जागतिक बाजारातील सकारात्मक वातावरणामुळेही देशांतर्गत बाजारात वाढ पाहायला मिळाली. दिवसभरातील बहुतांश सत्रात चढ-उतार पाहिल्यानंतर, मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स ३९५ अंकांच्या म्हणजेच ०.५४ टक्के वाढीसह ७३,९१९ अंकांवर बंद झाला.



झोजिला बोगद्याच्या दोन्ही बाजू मंगळवारी यशस्वीपणे जुळविण्यात आल्या. याप्रसंगी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, जम्मू-काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा आणि मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला उपस्थित होते

# वंचित शेतकऱ्यांनाही मिळणार कर्जमाफी

### राज्य मंत्रिमंडळाचे धडाकेबाज निर्णय

### प्रशासकीय रचनेत मोठे बदल

◆ **मुंबई, ९ जून**

मागील कर्जमाफी योजनेत तांत्रिक अडचणींमुळे लाभ घेण्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांना न्याय देणारा निर्णय घेत सरकारने त्यांनाही कर्जमाफीच्या कक्षेत आणण्याचे निश्चित केले आहे. त्यामुळे या शेतकऱ्यांनाही आता कर्जमाफीचा लाभ मिळणार असून यासाठी जवळपास १४ हजार कोटींचा खर्च येणार आहे.



प्रशासकीय विभागांच्या पुनर्रचनेपासून ते उद्योगांना बळकटी देण्यापर्यंतच्या निर्णयांवर शिक्कामोर्तब करत राज्य मंत्रिमंडळाने धडाकेबाज निर्णय घेण्याची परंपरा कायम ठेवली आहे.

राज्याच्या प्रशासकीय कामकाजात गतीमानता यावी, यासाठी मंत्रालयीन विभागांची पुनर्रचना करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. सध्या राज्यात ३३ प्रशासकीय विभाग कार्यरत होते, आता त्यांची संख्या १० ने वाढून ४३ होणार आहे. एकाच विभागात असलेल्या दोन उपविभागांचे आता स्वतंत्र विभाग केले जाणार आहेत. महत्त्वाची बाब म्हणजे, यासाठी कोणतीही नवीन पदे निर्माण केली जाणार नाहीत, तर केवळ कामकाजाची सुलभ विभागणी करून निर्णय प्रक्रिया अधिक वेगवान केली जाणार आहे. राज्याच्या औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या (एमआयडीसी) कर्ज उभारणीच्या अधिकारात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मध्ये सुधारणा करण्यात येणार असून, त्याकरिता अध्यादेश काढला जाणार आहे. तसेच, केंद्रीय वस्तू व सेवा कर (जीएसटी) अधिनियमाशी सुसंगत राहण्यासाठी महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यास आणि त्यासाठी नवीन विधेयक सादर करण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे.

राज्य सरकारच्या या निर्णयामुळे प्रशासकीय रचनेत एक प्रकारची शिस्त आणि गती येणार आहे. शिक्षण, उद्योग आणि शेती अशा विविध क्षेत्रांना स्पर्श करणाऱ्या या निर्णयांचे स्वागत होत असून, यामुळे आगामी काळात राज्याच्या विकासकामांना अधिक वेग येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. *(तभा वृत्तसेवा)*

### नवीन महाविद्यालयांना मिळणार गती

**राज्यातील उच्च शिक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मध्ये सुधारणा करण्यास मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. या निर्णयामुळे नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता देणे, तसेच अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नवीन विद्याशाखा, अभ्यासक्रम आणि तुकड्या सुरू करणे अधिक सुलभ होणार आहे.**

# भारताने प्रथमच तैनात केली १२ अण्वस्त्रे

### धोरणात मोठा बदल

◆ **नवी दिल्ली, ९ जून**

अण्वस्त्र धोरणात महत्त्वपूर्ण बदल करीत भारताने प्रथमच १२ अण्वस्त्रे तैनात केली आहेत. स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूटच्या (सिप्री) ताज्या अहवालातून ही माहिती समोर आली आहे.



भारताच्या पूर्वीच्या धोरणानुसार अण्वस्त्रे आणि ती वाहून नेणारी यंत्रणा स्वतंत्र गोदामात ठेवली जात होती. आता या धोरणात बदल झाला, असे जगातील सर्वोच्च शस्त्र निरीक्षण संस्था सिप्रीने आपल्या ताज्या अहवालात म्हटले आहे. भारताच्या शस्त्रास्त्रांचे वर्गीकरण केवळ साठा म्हणून न करता कार्यान्वित असे करण्याची ही पहिलीच वेळ आहे, असा दावा अहवालात करण्यात आला.

भूमिगत क्षेपणास्त्र कोठार आणि नवीन अणुपाणबुड्यांमध्ये त्वरित *(शेवटच्या पानावर)*

### भारताकडे १९० अण्वस्त्रे

**बॅलेस्टिक क्षेपणास्त्र पाणबुडीवर कमी संख्येने अण्वस्त्रे तैनात केल्यामुळे आणि प्रतिबंधात्मक गस्त घातल्यामुळे मागील वर्षी भारताच्या अण्वस्त्रांच्या साठ्यात किंचित वाढ झाली आहे. जानेवारी २०२६ पर्यंत भारताकडे जवळपास १९० अण्वस्त्रांचा वाढता साठा असल्याचा अंदाज होता. मागील वर्षाच्या तुलनेत ही एक किरकोळ वाढ आहे. ही शस्त्रे विमाने, जमिनीवरून क्षेपणास्त्रे आणि एसएसबीएन या परिपक्व होत असलेल्या आण्विक त्रिकुटाकडे सोपवण्यात आली होती, असे सिप्रीने अहवालात म्हटले आहे.**

## कुंभारी शिवारात वीटभट्टी मजुराचा मृतदेह आढळला

# कुत्र्यांनी मातीतून मृतदेह ओढून काढल्याने घटना आली उघडकीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

वीट भट्टीवर कामास असलेल्या एका मजुराचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथे मिळून आला. सिध्दू महादेव भोसले (वय-५१, रा.आगरखेडा, जि.विजापूर) असे मयत मजुराचे नाव आहे.



सोमवारी दुपारी कुंभारी येथील सिध्देश्वर विटभट्टी येथे काही कुत्रे माती व राखेच्या ढिगाऱ्याखालून ओढाताण करत होते. तेव्हा दुर्गंधी सुटल्याने आजूबाजूच्या लोकांनी जवळ जाऊन पाहिले असता कुजलेला मृतदेह आढळून आला. वळसंग पोलिसांना याची खबर मिळताच पोलिस हवालदार एस.व्ही.कुंवर यांनी घटनास्थळी धाव घेतली. मयताचे नातेवाईक संजीव होनमाने यांनी मयताच्या गळ्यातील व हातातील दोरी, कडा आणि एक तुटलेला दात पाहून ओळख पटली.

यातील मयत हा दि.३० मे रोजी कुंभार नावाच्या वीट भट्टी मालकाकडून २०० रुपये घेतले होते. सोमवारपर्यंत तो कामावर आला नव्हता. मालकांना वाटले की तो नेहमीप्रमाणे गावाला गेला असावा. परंतु सोमवारी दुपारी त्याचा कुजलेला अवस्थेतील मृतदेह आढळून आला. मयताचा प्राथमिक शवविच्छेदन अहवाल आला असून त्यात मृत्यूचे नेमके कारण दिलेले नाही. त्यामुळे मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होण्यासाठी मयताचा व्हिसेरा पुढील तपासणीसाठी पाठविले जाणार आहे, असे सांगण्यात आले.

## पडद्याच्या दोरीचा गळफास बसून ११ वर्षीय मुलाचा दुर्देवी मृत्यू



**सोलापूर, दि. ९ जून-**

घरात खेळत असताना पडद्याच्या दोरीचा गळफास बसून एका ११ वर्षीय मुलाचा दुर्देवी मृत्यू झाल्याची घटना न्यू पाच्छा पेठ परिसरातील क्रांती झोपडपट्टी येथे घडली. मिहिर शुभम इगवे असे त्या मुलाचे नाव आहे.

मिहिर हा सहावीच्या वर्गात शिकत होता. नेहमीप्रमाणे तो घरात खेळत असताना अचानक दरवाजाच्या पडद्याची दोरी त्याच्या गळ्याला वेटोळे घालून अडकली आणि त्याचा गळफास बसला.

त्याला एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले असता डॉक्टरांनी तपासणीअंती त्याला मृत घोषित केले. मिहिर हा इगवे कुटुंबातील मोठा मुलगा असून सर्वांचा लाडका होता. त्याला प्रेमाने लड्डू म्हणत असत.

# नरेंद्र मोदी आज मोडणार विक्रम



◆ **नवी दिल्ली, ९ जून**

निर्वाचित पंतप्रधान म्हणून सर्वाधिक काळ सत्तेवर राहण्याचा पंडित जवाहरलाल नेहरु यांचा विक्रम पंतप्रधान नरेंद्र मोदी बुधवार १० जूनला मोडणार आहेत. मोदी यांच्या सरकारचे तसेच पंतप्रधानपदाचे मंगळवार ९ जूनला १२ वर्ष पूर्ण झाले आहेत.

### पंडित नेहरू होते ४३९८ दिवस पंतप्रधान

निर्वाचित पंतप्रधान म्हणून नेहरु यांचा कार्यकाळ ४३९८ दिवसांचा होता, बुधवार १० जूनला मोदी निर्वाचित पंतप्रधान म्हणून आपले ४३९९ दिवस पूर्ण करत आहेत. असे करत मोदी देशात सर्वाधिक काळ पंतप्रधान राहण्याचा विक्रम आपल्या नावावर करणार आहेत.

देशात पहिल्या लोकसभेची स्थापना १७ एप्रिल १९५२ ला झाली होती. १३ मे १९५२ या लोकसभेची पहिली बैठक झाली. याचदिवशी नेहरु यांनी निर्वाचित पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा शपथ घेतली. २७ मे १९६४ पर्यंत ते पंतप्रधानपदावर होते.याआधी मोदी यांनी सर्वाधिक काळ पंतप्रधान राहण्याचा श्रीमती इंदिरा गांधी यांचा दुसऱ्या क्रमांकाचा ४०७७ दिवसांचा विक्रम मोडला होता.

मोदी यांचा पंतप्रधानपदाचा तिसरा कार्यकाळ सुरु आहे. २६ मे २०१४ ला मोदी यांनी पहिल्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. १० जूनला त्यांचा पंतप्रधान म्हणून ४३९९ दिवसांचा कार्यकाळ पूर्ण होणार आहे. ९ जून २०२४ ला मोदी यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

१५ ऑगस्ट १९४७ ला नेहरु यांनी देशाच्या अंतरिम सरकारचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली होती, या पदावर ते १९५२ ची लोकसभा निवडणूक होईपर्यंत म्हणजे पाच वर्ष होते. पण यावेळी ते लोकसभेवर निवडून आलेले पंतप्रधान नव्हते. निर्वाचित पंतप्रधान म्हणून नेहरु यांचा कार्यकाळ ४३९८ दिवसांचा होता. तो मोदी बुधवारी पूर्ण करणार आहेत. *(तभा वृत्तसेवा)*

### घटक पक्षांची राजधानीत बैठक

**मोदी यांच्या पंतप्रधानपदाची १२ वर्ष पूर्ण झाल्याचे औचित्य साधत बुधवार १० जूनला रालोआतील घटकपक्षांची बैठक राजधानी दिल्लीत बोलवण्यात आली आहे. या बैठकीत मोदी यांच्या पंतप्रधान म्हणून विक्रमी कारकीर्दीचा गौरव करणारा प्रस्ताव तेलगू देसमचे नेते आणि आंध्रप्रदेशाचे मुख्यमंत्री चंद्राबाबू नायडू मांडणार आहेत.**






## अग्रलेख...

# आत्मविश्वासपूर्ण वाटचालीची तप:पूर्ती

विकासाच्या वाटेवर धावण्यासाठी सर्वांत आवश्यक असते ते स्थैर्य, धैर्य आणि विचार. वैयक्तिक आयुष्य असो वा सार्वजनिक, स्थिरता कायम जगण्याला बळ देत असते आणि विचारांतून आलेले धैर्य आपल्याला पुढे नेत असते. आपल्या देशाच्या दृष्टिकोनातून विचार केला तर २०१४ ते २०२६ हा काळ जागतिक पातळीवर सर्वांनाच अस्वस्थ करणारा होता. या काळाने कोरोनासारख्या जागतिक महामारीपासून ते विविध देशांमधील बिघडत चाललेले आंतरराष्ट्रीय संबंध, युद्धजन्य परिस्थिती, आर्थिक अस्थिरता आणि हवामान बदलाच्या संकटांपर्यंत अशा अनेक प्रश्नांनी जगाला अस्वस्थ केले. अशा प्रतिकूल परिस्थितीतही भारताने विकासाचा मार्ग कधीही सोडला नाही. संकटांचा धैर्याने सामना करत विकासाच्या दिशेने पुढची पावले टाकत आपली वाटचाल कायम ठेवली. या १२ वर्षांच्या काळात केवळ आणि केवळ सर्वसामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवून प्रत्येक आव्हानात नव्या संधी शोधल्या गेल्या. पायाभूत सुविधांचा विस्तार करण्यात आला. डिजिटल परिवर्तन, कल्याणकारी योजना आणि आत्मनिर्भरतेवर भर देत देशाने प्रगतीचा वेग टिकवून ठेवला. केंद्रातील भाजपा सरकारला सलग १२ वर्षे, म्हणजेच एक तप पूर्ण झाले असून, हा काळ राष्ट्रीय विचारप्रवाहाला बळकटी देणारा ठरला आहे. या तप:पूर्तीबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन.

केंद्रात नरेंद्र मोदी पहिल्यांदा सत्तेवर आले ते २०१४ मध्ये. त्यांचा पहिला कार्यकाळ अत्यंत आश्वासक ठरला. त्या काळात त्यांनी जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान, उज्ज्वला योजना, डिजिटल इंडियासारख्या उपक्रमांमुळे विकासाचा लाभ तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला. भ्रष्टाचारमुक्त आणि कणखर व निर्णायक नेतृत्वाची प्रतिमा निर्माण करत सर्वसामान्य भारतीयांचा राज्यकर्त्यांवरील विश्वास पुन्हा दृढ केला. २०१९ ते २०२४ हा दुसरा कार्यकाळ तुलनेने आव्हानात्मक होता. या काळात जम्मू-काश्मीरमधील कलम ३७० हटविणे, नागरिकत्व सुधारणा कायदा, नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरण तयार करण्यात आले. याच काळात देशाला कोरोनासारख्या महामारीचा सामना करावा लागला. संकटाच्या काळात आत्मनिर्भर भारत, उत्पादनवाढ, डिजिटल सेवा आणि पायाभूत सुविधांच्या विस्तारावर भर देत देशाला नवी उभारी देण्यात मोदींचे सरकार यशस्वी ठरले. त्यामुळेच पुन्हा २०२४ ला मोदींना संधी मिळाली. २०२४ मध्ये सलग तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर भाजप सरकारने 'विकसित भारत २०४७' ही संकल्पना केंद्रस्थानी ठेवून पुढील वाटचाल सुरू केली. २०२४ ते २०२६ या कालावधीत पायाभूत सुविधा, तंत्रज्ञान, संरक्षण, हरित ऊर्जा, सेमीकंडक्टर उत्पादन, डिजिटल अर्थव्यवस्था आणि रोजगारनिर्मिती यासारख्या क्षेत्रांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. भारताला जागतिक अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाची शक्ती बनविण्याच्या उद्देशाने विविध धोरणात्मक निर्णय घेण्यात आले. त्यांचे परिणामही दिसत आहेत. आज संपूर्ण जग अस्थिरतेचा सामना करत आहे. रशिया-युक्रेन युद्ध, पश्चिम आशियातील संघर्ष, जागतिक अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता, पुरवठा साखळीतील अडथळे आणि नव्याने उद्भवणारी सुरक्षा संकटे या पृष्ठभूमीवर देशाने गेल्या १२ वर्षांत दाखविलेले राजकीय आणि धोरणात्मक स्थैर्य महत्त्वाचे आहे. स्थिर सरकार देशासाठी किती हितकारक असते, याचे उदाहरण देशाने जगासमोर ठेवले आहे. राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य देतानाच आर्थिक स्वावलंबन, सांस्कृतिक अस्मिता, सामाजिक एकात्मता आणि जागतिक स्तरावरील भारताच्या प्रतिष्ठेला बळकटी देण्याचे काम या काळात झाले. विशेष म्हणजे, देशाने आधुनिकतेकडे वाटचाल करताना सांस्कृतिक मुळांशी असलेले नाते अधिक घट्ट करण्याचा प्रयत्न केला. देशाच्या हजारो वर्षांच्या वारशाचा अभिमान बाळगत तंत्रज्ञान आणि विकासाची कास धरण्याची भूमिका सातत्याने घेतली. त्यामुळे बदलत्या जागतिक समीकरणांमध्ये स्वतःचे हित ठामपणे जपणारा, आत्मविश्वासाने निर्णय घेणारा आणि जागतिक पटलावर प्रभाव निर्माण करणारा देश म्हणून भारताची ओळख अधिक स्पष्ट झाली. त्यामुळेच आजचा भारत केवळ जगातील सर्वांत मोठी लोकशाही म्हणूनच नव्हे, तर संकटांना संधींमध्ये रूपांतरित करण्याची क्षमता असलेला आणि आत्मविश्वासाने उभा असलेला देश म्हणून जगासमोर उभा आहे.

या १२ वर्षांच्या प्रवासात सारे काही चांगलेच झाले, असा दावा करण्याचे कारण नाही. विकास व परिवर्तनाच्या प्रक्रियेत काही ठिकाणी यश मिळाले, तर काही ठिकाणी अपेक्षा पूर्ण झाल्या नाहीत. काही निर्णयांवर टीका झाली, काही क्षेत्रांमध्ये सरकारकडून अधिक चांगल्या कामगिरीची अपेक्षा होती. रोजगार, शेती, महागाई आणि प्रशासनातील काही बाबींमध्ये सुधारणा करण्याची गरज लक्षात आली. मात्र या सर्वांत एक गोष्ट सातत्याने अधोरेखित झाली, ती म्हणजे सरकारचा प्रांजळ हेतू. हेतू चांगला असेल तर बदल घडतोच. तो घडेलच. सर्वसामान्य नागरिकांना विकासाच्या प्रवाहात सहभागी करण्याची भावना महत्त्वाची आहे. देशहिताला प्राधान्य देत निर्णय घेण्याची भूमिका आणि आव्हानांना सामोरे जाण्याच्या तयारीमुळेच जनतेचा विश्वास सत्ताधाऱ्यांवर कायम राहिला आहे. त्यामुळे ज्या क्षेत्रांत अपेक्षित यश मिळाले नाही किंवा जिथे सुधारणा आवश्यक आहेत, त्या बाबींवरही येत्या काळात अधिक गांभीर्याने काम करण्याची गरज आहे. नरेंद्र मोदींसारखे ध्येयवादी, मेहनती आणि जागतिक स्तरावर भारताची भूमिका प्रभावीपणे मांडणारे नेतृत्व देशाला लाभणे ही अनेक अर्थाने महत्त्वाची बाब आहे. गेल्या बारा वर्षांत भारताने मोठ्या आत्मविश्वासासह मोठी स्वप्ने पाहण्यास सुरुवात केली आणि विकसित राष्ट्र बनण्याच्या ध्येयाकडे अधिक ठामपणे वाटचाल सुरू केली. या प्रवासाचा अंतिम निकाल भविष्यात ठरेल; मात्र भारताला नव्या आत्मविश्वासाची जाणीव करून देण्यात या कालखंडाची भूमिका निश्चितच महत्त्वाची आहे, हे विसरता येत नाही. सत्ताधाऱ्यांच्या १२ वर्षांतील कामांचे खरे मूल्यमापन म्हणजे सामान्य नागरिकांच्या मनात निर्माण झालेला विश्वास. गेल्या बारा वर्षांत भारतात घडलेला सर्वांत मोठा बदल कोणता, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर 'राष्ट्रीय अस्मिता आणि आत्मविश्वासाची पुन:प्राप्ती' असेच द्यावे लागेल. आज आपला देश जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांमध्ये गणला जातो, परंतु त्याहून महत्त्वाची बाब म्हणजे जग भारताकडे केवळ बाजारपेठ म्हणून पाहत नाही, तर भागीदार म्हणून पाहू लागले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचे मत ऐकले जाते, त्याची भूमिका महत्त्वाची मानली जाते आणि जागतिक प्रश्नांवर भारताकडून नेतृत्वाची अपेक्षा केली जाते. हा बदल म्हणजे नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील भाजप सरकारने १२ वर्षे केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे फलित आहे. आज एका बाजूला वेगाने बदलणारे तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, नव्या आर्थिक संधी आणि जागतिक नेतृत्वाची क्षमता आहे; तर दुसऱ्या बाजूला सामाजिक समरसता, पर्यावरणीय संतुलन, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि सर्वसमावेशक विकासाची जबाबदारी आहे. त्यामुळे पुढील वाटचालीत केवळ आर्थिक प्रगती पुरेशी ठरणार नाही, तर विकासाला मानवी मूल्यांची आणि राष्ट्रीय बांधिलकीची जोड द्यावी लागेल. खऱ्या अर्थाने विकसित भारताची निर्मिती तेव्हाच होईल, जेव्हा प्रगतीचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचेल आणि राष्ट्रहित हीच सर्व निर्णयांची प्रेरणा असेल. अंत्योदय हेच साऱ्यांचे ध्येय असले पाहिजे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील ही १२ वर्षे म्हणजे देशाच्या आत्मभानाचा आणि सामर्थ्याचा नवा सुवर्णकाळ आहे. 'राष्ट्र प्रथम' या मंत्राला केंद्रस्थानी ठेवून, देशाने एका तपात अगतिकता झटकून जागतिक नेतृत्वाची भूमिका स्वीकारलेली आहे. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत राष्ट्रीय एकात्मता भक्कम करतानाच, पायाभूत सुविधांचा झालेला कायापालट आणि थेट तळागाळापर्यंत पोहोचलेले डिजिटल व सामाजिक क्रांतीचे लाभ हे या सरकारचे सर्वांत मोठे यश आहे. प्रतिकूल परिस्थितीलाही प्रगतीची संधी बनवणाऱ्या या 'तपस्येने' प्रत्येक भारतीयाच्या मनात 'आम्ही जिंकू शकतो' हा आत्मविश्वास पेरला आहे. तोच आत्मविश्वास आपल्याला पुढे नेणार आहे.

## प्रासंगिक

डॉ. विजय चौथाईवाले

# मोदी आणि नेहरूवादी स्थिती-केंद्री दृष्टिकोनाचे विघटन करण्याची कला

नरेंद्र मोदी हे सर्वाधिक काळ सलग निवडून आलेले पंतप्रधान म्हणून नेहरूंना मागे टाकतील (अचूक सांगायचे तर ४३९९ सलग दिवस), हा केवळ आकडेवारीचा विषय नाही. या दोन्ही नेत्यांच्या आयुष्याच्या प्रत्येक पैलूत- वैयक्तिक, राजकीय, सामाजिक किंवा आध्यात्मिक- तीव्र विरोधाभास दिसून येतो. नेहरूंचा जन्म संपन्न कुटुंबात झाला, त्यांनी केंब्रिजमध्ये शिक्षण घेतले, त्यांनी तळागाळात कधीही काम केले नाही, ते पहिले नामनिर्देशित (निवडून न आलेले) पंतप्रधान होते, त्यांनी उदारमतवादी आणि समाजवादी विचारांचा पुरस्कार केला, हिंदू सांस्कृतिक मूल्यांशी संबंधित कोणत्याही गोष्टीपासून दूर राहिले आणि राष्ट्रीय सुरक्षेबाबत मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष (काही वेळा तुच्छताही) दाखवली.

याउलट, मोदींचा जन्म एका साध्या चहाविक्रेत्याच्या कुटुंबात झाला. त्यांनी गुजरात आणि दिल्लीमध्ये शिक्षण पूर्ण केले. संपूर्ण आयुष्याची जडणघडण करणारा जीवनकाल भारताला व्यापक प्रवासातून समजून घेण्यात घालवला (सुरुवातीला एकटे आणि नंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून). हजारो लोकांच्या मनात राष्ट्रीय कार्यासाठी समर्पणाची भावना रुजवली, लोकांच्या जनादेशावर पंतप्रधान झाले आणि देशाच्या प्राचीन वारशाचा अभिमान बाळगला.

नेहरू कोणत्याही स्वरूपातील भांडवलशाहीचे विरोधक होते. त्यांनी तिला शोषणाशी जोडले. त्यामुळे संपत्ती निर्मितीबाबतही त्यांना अनास्था होती. जे.आर.डी. टाटा यांच्याशी झालेल्या एका संभाषणात त्यांनी नफ्याला 'गलिच्छ शब्द' असे म्हटले होते. त्यांनी परवाना-राज निर्माण केला ज्यामुळे खाजगी गुंतवणूक हतोत्साहित झाली आणि सार्वजनिक क्षेत्रातील अनेक उद्योग उभारले जे कालबाह्य तंत्रज्ञान, अकार्यक्षमता आणि भ्रष्टाचारामुळे 'पांढरे हत्ती' ठरले.

मोदी मात्र नेहमी परिणामांवर लक्ष केंद्रित करतात- लघुउद्योजकांना आर्थिक बळ देणे, तोट्यातील सार्वजनिक उपक्रमांचे खाजगीकरण (उदा. एअर इंडिया, जी मूलतः टाटा एअरलाईन्स होती, पण १९५३ मध्ये नेहरूंनी त्याचे राष्ट्रीयीकरण केले), आणि इतर सार्वजनिक उपक्रमांना नफा कमावणारे बनवणे. त्यांनी ब्रिटिश राज आणि नेहरू काळातील हजारो कालबाह्य कायदे रद्द केले. तसेच स्टार्टअप आणि नवोपक्रम परिसंस्थेला चालना दिली, ज्यामुळे तरुण नोकरी शोधणारे न राहता नोकरी निर्माण करणारे बनत आहेत. आज भारतात १.५ लाखांहून अधिक स्टार्टअप्स आणि १०० पेक्षा जास्त युनिकॉर्न्स आहेत. गेल्या दशकात भारतीय स्टार्टअप्सनी अंदाजे १००-१५० अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक निधी उभारला आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबतीत हा फरक अधिक ठळक दिसतो. नेहरूंनी राष्ट्रीय सुरक्षेला कमी प्राधान्य दिले. हा दृष्टिकोन धोकादायक असल्याचे त्यांनी मान्य केले, तरीही तो कायम ठेवला. १९६२ मधील चीनच्या आक्रमणाने या धोरणाचे मोठे अपयश उघड केले आणि भारतीय सुरक्षाव्यवस्थेतील उणिवा समोर आणल्या. त्यांनी अक्साई चीनला ''जिथे गवताची एक काडीही उगवत नाही'' असे वर्णन केले होते.

याउलट, मोदींनी सुरक्षादलांचे आधुनिकीकरण आणि पुनर्रचना करण्याची दीर्घकाळ प्रलंबित योजना अंमलात आणली, सीडीएसच्या स्वरूपात एकात्मिक कमांड आणि नियंत्रण व्यवस्था निर्माण केली, आधुनिक युद्धसाहित्याने दलांना सज्ज केले, संरक्षण संशोधन व उत्पादनात खाजगी क्षेत्र, स्टार्टअप्स आणि नवोपक्रमकर्त्यांना सहभागी करून घेतले आणि त्याचवेळी सार्वजनिक क्षेत्रातील संरक्षण उद्योगांना बळकट केले.



मोदी सरकारच्या काळात, राष्ट्रीय सुरक्षा ही एका संकुचित लष्करी संकल्पनेतून विकसित होऊन संरक्षण, आर्थिक लवचीकता, तंत्रज्ञान, सायबर सुरक्षा, ऊर्जा सुरक्षा, पुरवठा साखळी आणि अंतर्गत स्थिरता यांना एकत्रित करणाऱ्या एका चौकटीत रूपांतरित झाली आहे. सामरिक संयमाकडून भर आता विश्वासार्ह प्रतिबंधाकडे वळला असून, लष्करी, राजनैतिक, गुप्तचर आणि आर्थिक साधनांद्वारे सीमापार धोक्यांवर दबाव आणण्याची अधिक तयारी दर्शवली जात आहे. संरक्षणाचे स्वदेशीकरण, सेमीकंडक्टर क्षमता, महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान, सायबर पायाभूत सुविधा आणि उत्पादन क्षमता यांना अधिकाधिक राष्ट्रीय सुरक्षेची संपत्ती मानले जात आहे. सुरक्षेकडे आता संपूर्ण-शासकीय आणि संपूर्ण-राष्ट्रीय दृष्टिकोनातून पाहिले जाते, जे लष्करी सज्जता, आर्थिक सामर्थ्य, तांत्रिक सार्वभौमत्व आणि जागतिक भागीदारी यांना जोडते.

ही तुलना हजारो पानांत मांडता येईल. परंतु खरी मोदींची कथा नेहरूंशी तुलना संपते तिथून सुरू होते.

**संपूर्ण सरकारचा दृष्टिकोन** : मोदी यांच्या कारभारातील हे मूलभूत तत्त्व आहे. यामुळे सर्व महत्त्वाचे भागधारक एका व्यासपीठावर आले आणि निर्णय प्रक्रिया जलद व परिणामकारक झाली. पायाभूत सुविधा, जीएसटी, डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर यासारख्या बहुविभागीय आणि आंतरराज्य प्रकल्पांचे आकडे थक्क करणारे आहेत. शासनाच्या कार्यपद्धतीत हा खरोखरच आमूलाग्र बदल आहे.

**गरजूंना मदत करणारा भारत** : कोविड काळातील लसींचे वितरण हे याचे ठोस उदाहरण आहे. 'व्हॅक्सिन मैत्री' अंतर्गत सुमारे १६ कोटी डोस जवळपास १०० देशांना पुरवले गेले- यात शेजारी देश, लहान बेट राष्ट्रे, तसेच आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील भागीदारांचा समावेश होता. याशिवाय, भारताने संघर्षग्रस्त भागांतून स्वतःच्या नागरिकांसह परदेशी नागरिकांची सुटका, तसेच अन्न, इंधन, औषधे आणि वैद्यकीय पथके पाठवण्यासारख्या अनेक मानवतावादी मोहिमा राबवल्या.

**आर्थिक यशोगाथा** : भारत आता जगातील सर्वांत वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था आहे, जी-२० देशांपैकी बहुतेकांना, चीनसह, मागे टाकते. या काळात २५ कोटींपेक्षा अधिक लोक बहुआयामी दारिद्र्यातून बाहेर आले आहेत, ज्याला सरकार वाढत्या सामाजिक आशावादाचा प्रमुख घटक मानते. 'फ्रॅजाईल फाईव्ह' अर्थव्यवस्थेतून बहुध्रुवीय जागतिक व्यवस्थेत उदयास येणाऱ्या आर्थिक शक्तीकडे हा मोठा बदल आहे.

**संधींची भूमी म्हणून भारत** : २०१४ च्या सुमारास सुमारे २५ कोटी असलेले इंटरनेट वापरकर्ते २०२० च्या दशकाच्या मध्यापर्यंत जवळपास १०० कोटींवर पोहोचले आणि प्रति वापरकर्ता मासिक डेटा वापर १ जीबीवरून २० जीबीपेक्षा अधिक झाला. स्वस्त मोबाईल डेटाच्या या झपाट्याने प्रसारामुळे शेकडो दशलक्ष लोक डिजिटल अर्थव्यवस्थेत सहभागी झाले, ज्यामुळे शिक्षण, सेवा आणि बाजारपेठांमध्ये प्रवेश वाढला.

अधिकृत आकडेवारीनुसार, २०१० च्या दशकाच्या मध्यापासून भारताने ग्लोबल इनोव्हेशन इंडेक्समध्ये ४० पेक्षा अधिक स्थानांची झेप घेतली आहे, संशोधन व विकास खर्च जवळपास दुप्पट झाला आहे आणि वार्षिक पेटंट मंजुरी दहापट वाढली आहे.

**राष्ट्रीय सुरक्षेत ठाम भारत** : मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने कृती आणि सुधारणा या दोन्ही माध्यमांतून अधिक ठाम सुरक्षा धोरण दाखवले आहे. ऑपरेशन सिंदूर, सर्जिकल स्ट्राईक्स, एअर स्ट्राईक्स, तसेच कलम ३७० आणि ३५ अ रद्द करणे (जी नेहरूंचीच एक वेदनादायी देणगी आहे) ही त्याची काही उदाहरणे आहेत.

**भारताच्या सांस्कृतिक वारशाचा अभिमान** : 'नवीन भारत' ही संकल्पना देशाच्या सांस्कृतिक ओळखीवर आधारित आहे आणि ती केवळ भाषणांपुरती मर्यादित नसून धोरणे आणि आंतरराष्ट्रीय उपक्रमांमध्येही दिसते. योग, आयुर्वेद, मिलेट्स यांचा प्रसार हा भारताच्या सॉफ्ट पॉवरचा महत्त्वाचा भाग झाला आहे. भारताचे विद्यमान पंतप्रधान अयोध्येत रामलल्ला आणि सोमनाथ येथे महादेव यांना नम्रतेने प्रार्थना करतात, अबूधाबीमध्ये मंदिराचे उद्घाटन करतात आणि जगभरातील मंदिरे, गुरुद्वारे, बौद्ध स्थळे, चर्च तसेच मशिदींना भेट देतात- नेहरूंनी सोमनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीत अनेक अडथळे निर्माण केलेत. पंतप्रधान मोदींनी भारताचा सांस्कृतिक वारसा, पारंपरिक ज्ञान, राष्ट्रीय प्रतीके आणि इतिहासाच्या प्रवाहातील विस्मृत झालेल्या तळागाळातील नायकांना मुख्य प्रवाहातील भाग बनवून सांस्कृतिक अभिमान परत आणला आहे.

याचे उदाहरणच द्यायचे असेल तर नवीन संसद भवनात स्थापित केलेला सेंगोल दंड. खरं तर हा सेंगोल पंडित नेहरूंना भेट करण्यात आला होता परंतु त्यांनी तो तळघरात जमा केला कारण अशा परंपरेवर त्यांचा विश्वास नव्हता. या उलट मोदींनी चोळ परंपरा आणि १९४७ मधील सत्ता हस्तांतरणाशी निगडित, कर्तव्य, सेवा आणि न्याय्य शासनाचे प्रतीक म्हणून नवीन संसद भवनात सेंगोल स्थापित केला. यातून हे दिसून आले की, भारताच्या संसदेने केवळ वसाहतवादी प्रतीकेच स्वीकारण्याची गरज नाही; ती शासनाच्या स्वदेशी परंपरांमधूनही प्रेरणा घेऊ शकते. त्यांचा दृष्टिकोन 'वारसा विरुद्ध विकास' हा नसून, 'विकासही, विरासतही' हा आहे. म्हणूनच, मोदींच्या नेतृत्वाखालील भारत जागतिक मंचावर सॅटेलाईट्स, ब्रह्मोस प्रक्षेपणास्त्र, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ग्रीन डायमंड्स, वाराणसी, अमृतसर किंवा महाबलीपुरम यांचे दर्शन घडवतो- साप खेळवणाऱ्यांची प्रतिमा नव्हे (जशी नेहरूंच्या काळात दाखवली जात होती).

## वेध

विजय निचकवडे

# 'ग्लॅमरस' होतेय धोंड्याची प्रथा

रीतिभाती त्याच आहेत, पण डिजिटल क्रांती आणि चंगळवादामुळे प्रथा-परंपरांनाही आता 'ग्लॅमर' प्राप्त होऊ लागले. ज्या 'धोंड्या'ला कुणी फारसं ओळखत नव्हतं, तो घरोघरी पोहोचलेला अधिकमास आणि त्याचे झालेले 'इव्हेंट' सोशल मीडियावर धूम करीत आहेत. बडेजाव, श्रीमंती दाखविताना अधिकाचे पावित्र्य अडगळीत पडले आणि भक्तीचा सोहळा 'स्टेटस'चा विषय झाला. जुन्याचा स्वीकार केला ही एक सकारात्मक बाब असली, तरी हे करताना 'धोंड्या'ची लागलेली 'वाट' पाश्चिमात्यीकरणाचा किती पगडा आमच्या डोक्यावर आहे, हे सांगून जाते.



गावागावातील जावई आणि लेकी सध्या सासरी निघाल्या आहेत. काय तर म्हणे, अधिकाचं वाण घ्यायला आणि धोंड्याच्या जेवणासाठी सासरचं बोलावणं आहे. तीन वर्षांनंतर एकदा येणाऱ्या अधिकमासात जावयाला वाण देण्याची प्रथा वर्षानुवर्षांपासून सुरू आहे. अधिक महिन्याचे पावित्र्य असल्याने याचे धार्मिक महत्त्वही आहे. पण आज अधिकाचे वाण म्हणजे प्रत्येकासाठी 'इव्हेंट' झाला असेच भासू लागले आहे. तो करतो, म्हणून आपण करावं. नुसतं करायचं नाही, तर त्याने जावयाचं कौतुक किती केलं, त्यापेक्षा वेगळं काय करता येईल, अशी मानसिकता ठेवून आज अधिकमासात सोहळे पार पडत आहेत. खरं तर अधिकमास म्हणजे भक्तीचा सोहळा! वैज्ञानिक दृष्टिकोनातून सौरवर्ष आणि चंद्रवर्ष यांची सांगड म्हणून या महिन्याकडे पाहिले जाते तर या महिन्याला धार्मिक परंपरेचीही जोड आहे. भगवान विष्णूच्या उपासनेचा काळ म्हणून विशेष महत्त्व आहे. दानधर्म आणि आत्मशुद्धीचा काळ म्हणून याकडे पाहिले जाते. त्यामुळे धार्मिक ग्रंथांचे वाचन आणि दान याचे विशेष महत्त्व आहे. आज अधिकमासानिमित्त ठिकठिकाणी भागवत सप्ताह होत असताना घराघरात जावयांचे कौतुक सोहळे पाहायला मिळत आहे. लेक-जावई म्हणजे लक्ष्मी-नारायणाचा जोडा, म्हणून जावयांना वाण देत पुण्य मिळविण्याची धडपड सासरच्या मंडळीची असते. मात्र, आज पुण्य मिळविण्याच्या नादात धार्मिकतेला अडगळीत टाकल्यात स्थिती आहे.

जावयाला दान देताना ३३ अनारसे देण्याची प्रथा होती; आज या दानालाही 'ग्लॅमर' निर्माण झाले आहे. अनारस्यांची जागा महागड्या मिठाईंनी घेतली आहे. तांब्याचे दिवे असलेले वाण सूपात दिले जायचे. आज तांब्याची जागा सोन्याने घेतली आहे. कुणी जावयाला सोन्याची अंगठी करतो, तर कुणी चांदीची चप्पलसुद्धा! एवढेच काय तर 'इंटरनॅशनल टूर्स'चे पॅकेजही वाणात मिळू लागले आहे. आधीचे जावई जरा सामान्यच होते, पण आजचा जावई मोठ्या पॅकेजचा असल्याने कदाचित वाणाचे स्वरूपही त्याला साजेसे झाले असावे. फाईव्ह स्टार हॉटेलात होणारे जावई जेवण, त्याचे फोटो काढून 'अधिकमास स्पेशल जेवण' असा हॅशटॅग वापरून समाज माध्यमांवर टाकलेले फोटो परंपरागत प्रथा-परंपरांचे 'सूप' वाजल्याचेच सांगते. आम्ही दानधर्म करतो, पण ते दाखवून. भागवतासारखे सोहळे करू, तेही बडेजाव दाखवूनच! मग खरंच अधिकमासाचे महत्त्व आपण जपतो आहोत का? कधीकाळी काही लोकांपर्यंत शिल्लक असलेल्या अधिकाच्या वाणाचे लोण घरोघरी पोहोचले. हे जरी सकारात्मक वाटत असेल, तरी त्याचे बदललेले स्वरूप विदारक आहे. दाखविण्यासाठी आणि इव्हेंट म्हणून जर धार्मिक सोहळे होत असतील तर त्यातून फक्त वेगवेगळ्या पद्धतीचे फोटोच निघू शकतील; त्या मागचा मूळ हेतू प्रवाहित होऊ शकणार नाही. अहंकार सोडून साधेपणाने वागणे शिकविणारा हा अधिकमासाचा काळ आहे. त्यात जर डिजिटल क्रांती आणि चंगळवादाच्या माध्यमातून अहंकारी वृत्तीचे प्रदर्शन केले जाणार असेल तर भक्तीच्या सोहळ्याचा बाजार झाल्याशिवाय राहणार नाही. ज्या पद्धतीने अधिकमासाच्या वाणाचे आणि जेवणाची व्याप्ती यावर्षीच्या अधिकमासात वाढली, त्यावरून जावई मंडळी नक्कीच समाधानी असतील, पण या समाधानात संस्कृती आणि धार्मिकतेचा ओलावा नसेल! जुन्या प्रथा-परंपरा पाळल्या जाणे नक्कीच पाश्चिमात्यीकरणाच्या काळात गरजेचे आहे. पण त्याचा धार्मिक भाव अबाधित ठेवूनच ते व्हावे, नाहीतर आता चंगळवाद आणि अहंकाराचा धोंडा कधी आपल्या संस्कृतीचे 'वाटोळे' करून नवीन पिढीला फक्त इव्हेंटपुरते मर्यादित करून बसेल, याचा नेम नाही.

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# परमात्म्याचे सगुण साकार रूप 'सप्त वन'

निर्गुण निराकार परमात्मा विश्वरूपाने नटून सगुण साकार रूपात दिसतो. त्याचे हे चराचर रूप प्रात:स्मरणीय म्हणून आपण सकाळी उठल्या उठल्या सृष्टिरूपात त्याचे स्मरण करतो. त्यात सप्तर्षी, सप्त नद्या, सप्त सागर, सप्त स्वर, सप्त भुवन इत्यादी आहेत. याच मालिकेत सप्त वन देखील आहेत.

सप्तर्षयो द्वीप वनानि सप्त ।

या वनांचे स्मरण आपण प्रात: समयी करतो.

विविध पुराणे, रामायण आणि महाभारत यांच्यानुसार सप्त वन तीन प्रकारची दिसतात.

त्यात अग्रक्रमाने पहिले सप्तक आहे १) दंडकारण्य २) खंडकारण्य ३) चंपकारण्य ४) वेदारण्य ५) नैमिषारण्य ६) ब्रह्मारण्य ७) धर्मारण्य.

दुसऱ्या सप्तकात वामनपुराण आणि महाभारतानुसार कुरुक्षेत्रातील वनांचा उल्लेख आहे. ज्यात १) काम्यक वन २) अदिती वन ३) व्यास वन ४) फलकी वन ५) सूर्य वन ६) मधुवन ७) शीत वन

तिसऱ्या सप्तकात रामायणादी ग्रंथातील उल्लेखनीय वने आहेत; ज्यात १) नंदनवन २) चैत्ररथ वन ३) वैभववन ४) सर्वतोभद्र वन ५) पारिजात वन ६) अशोक वन ७) विशाल वन

तिन्ही सप्तकातील वनांचे आपापले वैशिष्ट्य आणि गुणविशेष आहेत. सर्वच वनांना परमात्म्याचे सगुण साकार रूप म्हणता येईल. सर्वच वने प्रात:स्मरणीय आहेत. पण आज आपण यातील पहिल्या सप्तकातील वनांचा विचार प्रात:स्मरणीय म्हणून करूयात. त्या वनांची नावे ऐकताना देखील ईश्वरीय अनुभूती येते. वनांना अरण्य देखील म्हणतात. अरण्यातील नीरव शांतता आणि प्रासादिक वातावरणातील एकांतात बसून ऋषिमुनींनी हृदय आकाशाला जगत् आकाशाशी जोडून अनुभूती घेतली. त्यातून जगताचे कल्याण साधणाऱ्या कृती निर्माण केल्या. आरण्यके त्यातलाच एक भाग होय. असो.

या सप्त वनांचा म्हणजे सप्त अरण्यांचा थोडक्यात धांडोळा घेऊ.

**१) दण्डकारण्य** : या अरण्याचा उल्लेख भगवान रामांच्या चरित्रात विशेषत्वाने आढळतो. अभ्यासकांच्या मते विंध्याचल पर्वतापासून गोदावरी नदीच्या प्रदेशाला दण्डकारण्य म्हणतात. महानदी, गोदावरी, नर्मदा या प्रमुख नद्यांचा स्पर्श या अरण्याला आहे. दण्डक नावाची राक्षसांची जमात इथे निवासाला होती. रावण, रावणाचे भाऊबंद यांचेही इथे प्राबल्य होते. भगवान श्रीराम वनवासात असताना यातील अनेकांचा नि:पात भगवंतांनी केला आहे. इथेच अगस्ती ऋषी, जमदग्नी ऋषी इत्यादींची तपस्थळी देखील आहे. म्हणून दण्डक अरण्य प्रात:स्मरणीय आहे.

**२) नैमिषारण्य** : हे अरण्य सत्यनारायण कथेतून सर्वांना परिचित आहे. उत्तरप्रदेशातील गोमती नदीच्या तीरावरील हे अरण्य अनेक पुराणांत उल्लेख असलेले आहे.

प्रययुस्तस्य चक्रस्य यत्र नेमिर्व्यशीर्यत ।
तद् वनं तेन विख्यातं नैमिषं मुनिपूजितम् ॥

शौनकादी ऋषीसह अठ्ठ्याऐंशी हजार ऋषिमुनी याच अरण्यात एकत्रित आले होते. त्यांनी सुत महाशयांकडून पुराण श्रवण केले होते. ऋषिमुनींच्या विनंतीवरून अव्यत्यया साधनेसाठी भगवंतांनी एक चक्र म्हणजे रथाचे चाक शौनकादी ऋषींना दिले. ते चालवत नेताना त्याची निमी म्हणजे आस (चाकाला बाहेच्या परिघाला लावलेला लोखंडी कडा) जिथे पडेल त्या भागात कलीचा प्रभाव राहणार नाही. असा वर ऋषी शौनकांना दिला. जिथे या चाकाची निमी पडली ते ठिकाण म्हणजे नैमिषारण्य.

या अरण्यात गौरमुखाने एका निमिषात (निमिष म्हणजे डोळ्याची पापणी



लवण्याचा कालावधी) असुरसेनेला परास्त केले होते. म्हणूनही नैमिषारण्य म्हणतात. या अरण्यात निमिष म्हणजे कडुनिंबाची झाडे अधिक म्हणूनही नैमिषारण्य आहे.

**३) चंपकारण्य** : सध्याचे चंपारण्य म्हणजे चंपकारण्य होय. गंडकी नदीच्या स्पर्शाने पावन वनक्षेत्र म्हणजे चंपकारण्य. शाळीग्राम नावाचा दगड याच अरण्यातील गण्डकी नदीतून निर्माण होतात. पांडवांचा वनवास आणि अज्ञातवास काही काळ याच अरण्य परिसरात झाल्याचे उल्लेख आहेत. गजेंद्रमोक्ष कथा इथेच घडली. चंपा वनस्पती इथे भरपूर प्रमाणात होती म्हणून चंपकारण्य. इथेच भगवतीचे वास्तव्य असल्याचे पुढील श्लोकातून स्पष्ट होते.

पीत पद्म पद द्वंद्वां चंपकारण्य वासिनीं ।
पीतावतंसां परमां वन्दे पद्मज वन्दिताम् ॥

**४) वेदारण्य** : सप्तवनात स्मरणीय असलेल्या वेदारण्याचा स्कंद पुराणात उल्लेख आहे. कावेरी नदीचा परिसस्पर्श असलेले हे वन वेदांचे वन म्हणूनही प्रसिद्ध आहे. या अरण्यात चारही वेद दररोज भगवान शिवाची आराधना करीत असत. याच अरण्यात वेदतीर्थ आहे. रावण वधानंतर ब्रह्महत्येचे पातक दूर व्हावे म्हणून भगवान श्रीराम इथे स्नानाला आले होते. त्याची खूण म्हणून इथे ''रामार पदम'' म्हणजे राम पद आहे. देवीभागवतात या अरण्याचा उल्लेख आहे. त्यानुसार वेदारण्यात पार्वती सुंदरीचे मंदिर आहे.

**५) ब्रह्मारण्य** : प्रात:स्मरणातील ब्रह्मारण्याचा उल्लेख गरुडपुराणात, संत एकनाथांच्या भावार्थ रामायणात आढळतो.

''ब्रह्मणो वेदस्य अरण्यमिव'' जिथे वेदाचे पठन होते ते अरण्य म्हणजे ब्रह्मारण्य होय. ब्रह्मारण्याचा उल्लेख तीन ठिकाणी आढळतो. काहींच्या मते ब्रह्मारण्य म्हणजे बिहारमध्ये महानदी म्हणजे फाल्गु नदीच्या पश्चिमेचा भाग. तर काहींच्या मते तामिळनाडूत अरानी नदीचा परिसर. काही अभ्यासकांच्या मते आपले महाबळेश्वर म्हणजे ब्रह्मारण्य होय. इथे ब्रह्मा, विष्णू महेशांनी एकत्रित यज्ञ केला. यावेळी ब्रह्मदेवांचे आपली पत्नी सावित्रीशी भांडण झाले. रागाने ते तेथील अरण्यात निघून गेले. म्हणून हे ब्रह्मारण्य. पत्नी सावित्री शोध घेत नदी रूपात प्रवाहित झाली. म्हणून येथील नदीचे नाव सावित्री आहे.

**६) धर्मारण्य** : धर्मारण्यं हि तन् पुण्यमाद्यं च भरतर्षभ, यत्र प्रविष्टमात्रो वै सर्वपापै: प्रमुच्यते ।

सप्त वनातील एक असलेले धर्मारण्य महाभारत, वायुपुराण आणि स्कंद पुराणात त्याचा उल्लेख आहे. धर्मारण्य हे सरस्वती नदीच्या काठावर असल्याचे एक मत आहे. ज्या प्रदेशाला श्रीजुष्टम प्रदेश म्हणतात. इथे महर्षी कण्वांचा आश्रम असल्याचा उल्लेख आहे. तर दुसऱ्या मते धर्मारण्य महानदीच्या तीरावर गया क्षेत्राच्या आसपास आहे. जिथे युधिष्ठिर आपल्या भावांसह आले आणि तिथे त्यांनी पिंडदान केले. त्याच्या खुणा आजही तिथे आहेत.

**७) खंडकारण्य** : सप्त वनातील हे अरण्य म्हणजे खांडव वन असावे. यमुना नदीच्या तीरावर पसरलेले खंडकारण्य महाभारतात उल्लेखित आहे. यालाच खांडवप्रस्थ पुढे तिथे पांडवांची राजधानी इंद्रप्रस्थ उभी राहिली. महाभारतानुसार अग्नी देवता हविषान्न खाऊन त्यांना अपचन झाले. त्यामुळे त्यांनी उपाय म्हणून अग्निकाष्ठ ग्रहण करण्यासाठी खांडव वन ग्रहण करण्याचे ठरविले. याच अरण्यात तक्षकादी राहत होते. त्यांना इंद्राचे संरक्षण होते. त्यामुळे अग्निदेव असफल झाले. अग्निदेवांनी श्रीकृष्ण अर्जुनाची मदत घेतली आणि हे वन अग्निदेवाने खांडववन भक्षण केले. इंद्राचे प्रस्थ असल्याने राजधानीला नाव इंद्रप्रस्थ दिल्याचे वर्णन आहे.

आपल्या संस्कृतीत असलेली व्यष्टी, समष्टी, सृष्टी आणि परमेष्ठी यांची सुंदर गुंफण यातून दिसून येते. याची अनुभूती सर्वांना व्हावी, परिचय व्हावा म्हणून हा शब्दप्रपंच!

९८२२२६२७३५

## वाचक पत्र

### योग्य जलव्यवस्थापन काळाची गरज!

मागील वर्षी देशात सरासरीपेक्षाही जास्त पाऊस पडला. राज्यातील बहुतांश धरणे भरूनही मार्च-एप्रिलपासूनच पाणीटंचाईचे संकट घोंगावत आहे. यंदाचा कडक उन्हाळा आणि महाराष्ट्रातील धरणाच्या पाण्याची पातळी चिंतेची बाब आहे. यात भर म्हणजे यंदा हवामान खात्याने अल निनोचा प्रभाव असल्याने साधारण ९० ते ९२ टक्के पाऊस असणार म्हणजेच सरासरीपेक्षा कमी असा अंदाज वर्तवला. पाणी म्हणजे जल आणि जल म्हणजे जीवन. सकाळपासून ते रात्रीपर्यंत आपणास पाण्याची नितांत गरज भासते. पृथ्वीवरील प्रत्येक सजीवासाठी, त्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी पाण्याची नितांत गरज आहे. म्हणूनच पाण्याचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. भारतात संपूर्ण चार महिन्यांच्या पावसाच्या कालखंडात आपल्याला लागणाऱ्या गरजांपैकी ७० ते ८० टक्के पाणी पावसाच्या स्वरूपात उपलब्ध होते. असे असून देखील आजही आपल्या देशात पाण्याचा अपव्यय मोठ्या प्रमाणात होताना दिसतो. पाण्याचे योग्य व्यवस्थापन होणे ही काळाची आता खूप मोठी गरज आहे. म्हणूनच आतापासूनच पाण्याचे योग्य नियोजन करावे लागेल. योग्यरीत्या व्यवस्थापन झाले तरच भविष्यातील जल संकटावर आपण मात करू शकू.

**लोकेश बापट**/पुणे

# वृक्षतोड प्रकरणी दंडात्मक कारवाईचा प्राधिकरण घेणार निर्णय




## प्रति वृक्ष एक लाख दंडासह १.२२ कोटींच्या कारवाईचा प्रस्ताव

## प्राधिकरणाच्या निर्णयाकडे सोलापूरकरांचे लक्ष

## वन विभागाकडून साडेचार लाखांचे मूल्यांकन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

सलगर वस्ती परिसरातील खुल्या जागेत झालेल्या ११८ वृक्षतोड प्रकरणात संबंधितांवर मोठी दंडात्मक कारवाई होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वन विभागाने तोडण्यात आलेल्या वृक्षांचे सुमारे साडेचार लाख रुपयांचे मूल्यांकन महापालिकेला सादर केले असून, प्रति वृक्ष एक लाख रुपये दंड आणि वृक्षांचे मूल्यांकन अशी एकूण सुमारे १ कोटी २२ लाख ५० हजार रुपयांच्या कारवाईचा प्रस्ताव प्राधिकरणासमोर ठेवण्यात येणार आहे.

या संदर्भात महापालिका सभागृह नेते नरेंद्र काळे यांनी प्रशासनाकडे विचारणा केली असता सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी वन विभागाचा अहवाल प्राप्त झाल्याची माहिती दिली. वृक्ष समिती आणि प्राधिकरणाच्या बैठकीत या प्रस्तावावर चर्चा होऊन अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. शहरातील ५४ मीटर बाह्यवळण रस्त्यावरील सदर वस्ती परिसरात असलेल्या एका खासगी जागेतून मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करण्यात आली होती. अनेक वाहनांमधून वृक्षतोडीनंतर लाकडे विक्रीसाठी पाठविण्यात आल्यानंतर शेवटच्या क्षणी हा प्रकार उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर आणि काहींनी रंगेहात पकडून उघडकीस आणला होता. या प्रकरणावर मोठी ओरड सुरू झाल्यानंतर महापालिका उद्यान विभाग आणि प्रशासनाचे लक्ष केंद्रित करून यावर कारवाईचे पाऊल उचलले होते. या प्रकरणात प्रथम जागा मालकाचे नाव निष्पन्न होत नसल्याने पुढील कार्यवाही थांबविण्यात आली होती. मात्र पोलीस कारवाई नंतर या जागेच्या मालकांची नावे उजेडात आली होती. हजारे आणि पाटील या दोन कुटुंबातील चौघांविरोध आणि वृक्ष तोडून वाहनातून नेणाऱ्या आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले. या प्रकरणात प्राधिकरणाला नियमानुसार असलेल्या ५ हजारपासून ते १ लाख रुपयांपर्यंतच्या दंडाचा वापर करून ११८ वृक्षतोडी प्रकरणी प्रत्येक वृक्षाला सर्वाधिक १ लाख असे १ कोटी १८ लाखाचा दंड करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.या वृक्षतोडी नंतर एकूण मूल्यांकनाची माहिती म हापालिका उद्यान विभागाकडून वन विभागाकडे मागण्यात आली होती. यानुसार त्यांच्याकडून महापालिकेला एकूण मूल्यांकन ४ लाख ५० हजार रुपये असल्याचे कळविले आहे. यानुसार ११८ वृक्षांचे १ कोटी १८ लाख दंड आणि वृक्षांचे मूल्यांकन ४ लाख ५० हजार असे एकूण १ कोटी २२ लाख ५० हजार रुपये दंड वसूल करण्याची नोटीस संबंधित जागा मालकाला धाडण्यात येणार आहे. तत्पूर्वी वनविभागाची कारवाई तसेच समिती पुढे हा विषय तसेच वृक्ष संवर्धन प्राधिकरण यांच्यासमोर दंडा संदर्भातील सविस्तर प्रस्ताव उद्यान विभागाकडून ठेवण्यात येणार आहे.

### दंड न भरल्यास उताऱ्यावर बोजा

प्राधिकरणात यासंदर्भात निर्णय झाल्यानंतर पुढील कार्यवाहीची प्रक्रिया होणार आहे. शिवाय या संदर्भात जागा मालकाला म्हणणे मांडण्यासाठी संधी देखील देण्यात येणार आहे. दंड न भरल्यास संबंधित जागा मालकाच्या सातबारा उताऱ्यावर बोजा चढविण्यात येऊन पुढील सर्व प्रक्रियेनंतर लिलावातून दंड वसूल केला जाणार असल्याचेही सहाय्यक आयुक्त शशिकांत भोसले यांनी स्पष्ट केले.

### ठळक बाबी

- तोडलेली झाडे : ११८
- वन विभागाचे मूल्यांकन : सुमारे ४.५० लाख रुपये
- प्रस्तावित दंड : प्रति वृक्ष१ लाख
- एकूण प्रस्तावित कारवाई : १.२२ कोटींपेक्षा अधिक
- अंतिम निर्णय : वृक्ष समिती व प्राधिकरण घेणार

# गटशिक्षण अधिकाऱ्याचा अहवाल खोटा ठरविण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

सांगोला येथील जनजागृती प्रबोधन मंचच्या शाळेच्या वादाविषयी कोर्टाचा अवमान होईल अशी भीती घालत जिल्हा परिषदेच्या प्रशासनाने शिक्षण विभागाला न कळविताच सांगोल्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यास परस्पर पत्र व्यवहार करून त्या शाळेचा यु-डायस नंबर रद्द करण्याबाबत दबाव निर्माण केल्याबद्दल चर्चेचा विषय झाला आहे.

सांगोला येथील जनजागृती प्रबोधन मंच या संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या दिव्यांग शाळेबाबत वाद निर्माण झाला आहे. या संस्थेचे चेअरमन मरण पावल्यानंतर मुख्याध्यापिकेने ही संस्था टेंभुर्णी येथे स्थलांतरित केली आहे. या ठिकाणी येण्यास शाळेतील काही शिक्षकांनी विरोध केला आहे. बेकायदेशीरपणे सांगोला येथेच त्यांनी शाळा सुरू ठेवली आहे. याबाबत दोघांनीही न्यायालयात धाव घेतली आहे. थकीत वेतनाबाबत न्यायालयाने निर्णय दिला आहे. असे असताना या निर्णयाचा चुकीचा अर्थ लावीत जिल्हा परिषदेच्या प्रशासन विभागाने सांगोल्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांना पत्र पाठवून दबाव वाढविण्याचा प्रयत्न केला असल्याचा आरोप होत आहे. जिल्हा परिषदेच्या प्रशासन विभागाने सांगोल्याच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांना या वादाबाबत पत्र पाठवले आहे. उच्च न्यायालय मुंबई सर्किट बँच कोल्हापूर यांनी दि.१४ नोव्हेंबर २०२५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार यापूर्वी कार्यवाही केलेली नसल्यास तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही न केल्याने अवमान याचिका दाखल झाल्यास त्याची जबाबदारी आपणांवर राहील असे या पत्रात नमूद केले आहे.सांगोला तालुक्यातील चोपडी येथील जनजागृती प्रबोधन मंच संचलित मूक बधिर निवासी शाळा, सांगोला या शाळेचा बेकायदेशीर स्थलांतर आदेश रद्द होण्यासाठी उच्च न्यायालय मुंबई येथे याचिका दाखल आहे. यामध्ये दि. २८ नोव्हेंबर २०२४ पासून स्टेटस्कोचा आदेश पारित आहे.

### परवानगीनेच स्थलांतर केली

दिव्यांग आयुक्तांच्या परवानगीने आम्ही शाळा टेंभुर्णी येथे स्थलांतरित केली आहे. संबंधित शिक्षक येथे हजर न झाल्याने आम्ही त्यांना रीतसर समिती नेमून काढून टाकले आहे. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. थकीत वेतनाबाबत कोर्टाने निर्णय दिला आहे. चुकीचा आधार घेत जिल्हा परिषद प्रशासनाने आपल्या अधिकारात असे पत्र काढणे चुकीचे आहे. याबाबत आम्ही कायदेशीर दाद मागत आहोत, असे मुख्याध्यापिका शैलजा पाटील यांनी सांगितले.

## सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

**उपसंचालक, नगर रचना व बांधकाम परवानगी कार्यालय**
**'इंद्रभुवन', रेल्वे लाईन्स, सोलापूर ४१३००१**
**ई-मेल :- adtpsolapurl@gmail.com दुरध्वनी : ०२१७-२७३५२७३**

जा.क्र./उसंनर/नर/बा.प.-३८७ दि. ०९/०६/२०२५

**जाहीर नोटीस**

मौजे बाळे सोलापूर येथील गट. नं ७०/४, ७०/८ व ७०/९ मधील १२.०० मी व १८.०० मी. मी. रुंद रस्त्याने बाधित क्षेत्र ९६७३.७९ चौ.मी क्षेत्रापोटी टी.डी. आर. म.न.पा.चे ताब्यात घेऊन त्यापोटी विकास हस्तांतरण हक्क (टी.डी.आर.) मिळणेबाबत सदर जागेचे मालक श्री. बजरंग प्रभाकर कुलकर्णी व इतर सोलापूर यांचे दि. ०२/०८/२०२२ ने प्रस्ताव सादर केलेले आहे.

सबब, या जाहीर नोटीसीद्वारे सर्व नागरीकांना असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीचे मालकी हक्क अथवा हितसंबंध असल्याचे त्यांनी त्याबाबत तक्रार / हरकत ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या अधिकाऱ्यांच्या पत्त्यावर पाठवाव्यात. असे न केल्यास सोलापूर महानगरपालिका रितसर टी.डी.आर (हस्तांतरणीय विकास हक्क) देणेबाबत पुढील कार्यवाही करील व त्यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही. ही जाहीर नोटीस दिली

दि. ०९/०६/२०२६

सही/-
आयुक्त
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

**हरकत दाखल करणेचा पत्ता**
द्वारा मा. आयुक्त सोलापूर महानगरपालिका करिता,
सहाय्यक संचालक, नगर रचना, सो.म.पा
इंद्रभुवन, आप्पासाहेब वारद पथ. रेल्वे लाईन सोलापूर.

## सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि, शंकरनगर - अकलूज

पो. यशवंत नगर, ता. माळशिरस, जि. सोलापूर पिन - ४१३११८
फोन नं. (०२१८५) २२२०४८, २२२२४८ फॅक्स नं. (०२१८५) २२२२४९ Email : smsmpssk@gmail.com

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांना कार्यकारी संचालक यांचेकडून या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखाना लि., शंकरनगर - अकलूज या संस्थेचे खालील उत्पादक सभासद दुर्दैवाने मयत झाल्याचे समजते.

| अ.नं. | सभासदाचे नांव | गाव | मयत झाल्याची अंदाजे तारीख |
|---|---|---|---|
| १ | कै. साळुंखे मारुती तुकाराम | माळीनगर | २८/०९/२०२५ |
| २ | कै. साळुंखे सत्यवान विठ्ठल | माळीनगर | ११/०१/२०२४ |
| ३ | कै. माने-देशमुख मिनाक्षी विठ्ठलराव | वेळापूर | ०८/०५/२०२५ |
| ४ | श्री. माने-देशमुख प्रशांत, प्रविण, छाया विजयकुमार पैकी मयत छाया | वेळापूर | ११/०१/२०२६ |
| ५ | कै. एकतपुरे विष्णू नारायण | वेळापूर | १४/०५/२०२३ |
| ६ | कै. शिंदे सचिन विठोबा | वेळापूर | १४/११/२०२२ |
| ७ | कै. सुरवसे भिमराव गोविंद | विठ्ठलवाडी | १३/१२/२०२४ |
| ८ | कै. राचकर भिमराव ईश्वरा | विझोरी | ०२/०१/२०२५ |
| ९ | कै. राजगुडे भगवान धनाजी | तांदुळवाडी | २८/०१/२०२४ |
| १० | कै. कदम कांतीलाल गुलाब | तांदुळवाडी | २८/०९/२०१९ |
| ११ | कै. दुपडे नारायण सुखदेव | कोळेगांव | ०८/११/२०२३ |
| १२ | कै. आवताडे धोंडीबा हरी | फळवणी | २१/०४/२०२३ |
| १३ | कै. यादव सर्जेराव सखाराम | कोंडबावी | ३०/१२/२०१७ |
| १४ | कै. शिंदे अनंतराव साहेबराव | बावडा | ०५/०४/२०२५ |
| १५ | कै. शिंगाडे दत्तात्रय कृष्णा | लाखेवाडी | २४/०५/२०२५ |
| १६ | कै. गाजरे दत्तात्रय तुकाराम | वडापुरी | २२/०२/२०१७ |
| १७ | कै. शिंदे प्रभाकर रामा | वडापुरी | १६/१०/२०१९ |
| १८ | कै. मचाले यशवंत कृष्णा | चांदज | २७/०४/२०२१ |
| १९ | कै. वाळेकर देवराव यशवंत | वडोली | २६/०२/२०२६ |

महाराष्ट्र को. ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट कलम ३० रुल २५ (३) (१) च्या तरतुदी प्रमाणे या जाहीर नोटीसीने सर्व संबंधीत वारसांना अगर मयताचे कायदेशिर हक्क सांगणाऱ्या इसमांना कळविण्यात येते कि, मयत उत्पादक सभासदांचे शेअर्स, ठेवी, डिबेंचर्स वगैरे रक्कम मयताचे नावे आहेत. सबब ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत ज्या कोणा हित संबंधीतांना उपर निर्दीष्ट मयतास वारस आहोत असे कारखान्यास पटवून मयतांचे शेअर्स, ठेवी, डिबेंचर्स वर्ग करुन घेण्याचे असतील त्यांनी कायदेशीर वारस हक्क प्रस्थापित करण्यासाठी असणारे सर्व कागदपत्रे व पुरावे कारखान्याच्या रजिस्टर्ड ऑफीसमध्ये कामाच्या वेळेत सादर करावेत व पश्चात वारसाची शाबीदी करावी, दिलेल्या मुदतीनंतर आलेले अर्ज विचारात घेत्तले जाणार नाहीत व ते कारखान्यावर बंधनकारक राहणार नाहीत.

ही जाहीर नोटीस दिली असे.

**दिनांक : १०/०६/२०२६**

सही/-
**सुहास रघुनाथ यादव**
**कार्यकारी संचालक**

Classifieds

**विकणे आहे**

**विजापूर रोड, माशाळे नगर माता लक्ष्मी अपार्टमेंटमध्ये 2BHK फ्लॅट विकणे आहे. पार्किंग व पाण्याची मुबलक सुविधा आहे.**
**--- संपर्क ---**
**7498948451**
**9579030937**

दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.

## MAHATRANSCO – SRM E-Tender Notice

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-Tender Notice**

Digitally signed online bids are invited through E-tender process of MSETCL in two-bid system from bidders who are registered Contractors of MSETCL. **RFx No.7000040225 E-Tender No. SE/EHV/O&M/Circle/SHP/E-Tender: 09/2026-27, Particulars**: Work of supply, erection, testing commissioning of an additional 1X50 MVA 220/33kV Power Transformer along with HV, LV bay & 33kV Bus extension at 220kV Jejuri S/s under the EHV O&M Circle Solapur. **Estimated cost:** Rs. 1,46,36,573/- **E.M.D. (Approx. 1% of est. cost):** Rs 1,46,365/- **Tender cost in Rs.** 5000.00+ GST, **Sale period:** 08.06.2026 to 24.06.2026 **Last Date of Submission:** 24.06.2026 up to 23:59 Hrs, **Date of opening (Tech. bid):** 25.06.2026 at 12:00 Hrs. (If possible). **Contact person:** Executive Engineer - 7447440852. For further details

**Subsequent call intimations (2nd / 3rd calls, if any) will not be re-published in newspapers and will only be available on the e-tender portal: please visit.**

1) **https://srmetender.mahatransco.in.**
2) **https://mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Superintending Engineer, EHV O&M Circle Solapur.**

## जाहीर समन्स

रे.मु.नं. ५१/२०१४
नि.४५

**करमाळे येथील मे. सि. ज. ज्यु. डि. सो. यांचे कोर्टात.**

**१) श्री. सुलतान अल्लाबक्ष मुजावर, वगैरे-५, - वादी**
विरुध्द
**१) सिलेमान बलवंड मुजावर, वगैरे,**
**१२) मुबारक कपील शेख,**
उ. वय ३५, धंदा - मजुरी,
रा. पांडे, ता. करमाळा,
ह.मु. संजयनगर, मनोहर शिंदे चाळ, एम.के.ई. कंपनीजवळ, मुंब्रा, जि. ठाणे, ४००६१२. — **प्रतिवादी**

ज्याअर्थी वर नमुद वादी यांनी प्रतिवादी विरुध्द दावा रे.मु.नं. ५१/२०१४ चा मौजे पांडे, ता. करमाळा, जि. सोलापूर येथील जमीन गट नं. ३१ व ३४ चे सरसनिरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी केला आहे. या दाव्यात जाहीर समन्स देणेसाठी अर्ज दाखल केला आहे. त्याकामी प्रतिवादी नं. १२ यांना वेळोवेळी समन्स बजावणीसाठी पाठविले असता ते न बजावता परत आलेले आहे. त्यासाठी हे जाहीर समन्स दिले आहे.

त्याअर्थी या जाहीर समन्सने कळविणेत येते की, सदरचे जाहीर समन्स प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आत किंवा मे. कोर्टाने नेमलेली ता. १८/०७/२०२६ रोजी स्वतः किंवा वकिलामार्फत हजर राहून म्हणणे मांडावे अन्यथा मे. कोर्ट पुढील योग्य तो आदेश तुमचे विरुध्द करतील याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली असे. ता. ०२/०६/२०२६

**सही/-**
**(क.लिपिक)**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर, करमाळा.**

## Format C-1

**Declaration about criminal cases**

(As per the judgement dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No.536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate : RAJENDRA VITTHAL RAUT**
3809, Raut Chawl, Ashoknagar, Barshi, Tal. Barshi, Dist. Solapur 413 401

**Name of political party : Bharatiya Janata Party**
(Independent candidates should write "independent" here)

**Name of Election : Maharashtra Legislative Council from Solapur Local Authorities Constituency**

**Name of Constituency : Solapur Local Authorities Constituency**

I **RAJENDRA VITTHAL RAUT,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil | Nil |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**
**Date : 02.06.2026**

Name & Signature of Candidate
**(RAJENDRA VITTHAL RAUT)**

# नेपतगाव येथे महिलेस मारहाण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.९ जून-**

नेपतगाव (ता. पंढरपूर) येथे एका महिलेला शिवीगाळ करून मारहाण केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी पंढरपूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अश्विनी सुनील क्षीरसागर (वय २४, रा. नेपतगाव) या आपल्या घराबाहेर सासू-सासरे व पतीसोबत बसल्या होत्या. त्यावेळी गावातीलच कदीर मुलाणी आणि त्याच्यासोबत असलेल्या व्यक्तींनी तिथे येऊन अश्विनी यांना त्यांच्या पतीबद्दल विचारणा केली. अश्विनी यांनी याबद्दल विचारले असता, त्यांनी अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. दरम्यान, त्यांचे पती सुनील तिथे आले असता, आरोपींनी त्यांनाही हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या प्रकरणी अधिक तपास एएसआय करे हे करत आहेत.

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि. अर्ज नं. १३/२०२६
पुढील नेमलेली दि. ०६/०७/२०२६
निशाण नं. ५

**बार्शी येथील मे. सिव्हील जज्ज ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात**

१) **सुषमा सुशिल पानसे,**
वय ४९ वर्षे, धंदा - खासगी नोकरी,
रा. हुडको कॉलनी, धाराशिव रोड,
ता. तुळजापुर, जि. धाराशिव
२) **जयेश सुशिल पानसे,**
वय २३ वर्षे, धंदा - शिक्षण, रा. सदर
३) **हर्षदा सुशिल पानसे,**
वय २५ वर्ष, धंदा - शिक्षण, रा. सदर — **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील अर्जदार नं. १ ही मयत सुशिल दिनकर पानसे यांची पत्नी व अर्जदार नं.२ व ३ हे मयत सुशिल दिनकर पानसे यांचे मुले आहेत. मयत सुशिल दिनकर पानसे हे दि. २२/११/२०२५ रोजी पानगाव, ता. बार्शी येथे मयत झाले आहेत. मयत सुशिल दिनकर पानसे यांना अर्जदार नं. १, २ व अर्जदार न. ३ हेच कायदेशीर वारस असून त्यांच्या शिवाय अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. यातील सुशिल दिनकर पानसे हे मयत झाल्यानंतर यातील अर्जदार हे सदर मिळकतीबाबत वारस नोंदणी करण्याकरीता शासकिय कार्यालय येथे गेले असता सदर अधिकारी यांनी त्यांना मयत सुशिल दिनकर पानसे यांचे कायदेशीर वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. म्हणून त्यांनी सदरचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता यातील अर्जदाराचा सदरचा अर्ज आहे.

त्या अर्थी सदर अर्जदार यांचे व्यतिरिक्त मयत सुशिल दिनकर पानसे यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रकटीकरणापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली ता. ०६/०७/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

हे जाहिर प्रकटीकरण कोर्टाचे सहि शिक्क्यानिशी प्रसिध्द केले असे दि. ०५/०६/२०२६

**सही/-**
**कनिष्ठ लिपीक**
**दिवाणी न्यायालय**
**क स्तर, बार्शी**

**कोर्टाचा शिक्का**

**सही/-**
**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**व स्तर, बार्शी**

## Format C-2

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgement dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**
***Name of Election : Maharashtra Legislative Council from Solapur Local Authorities Constituency**
**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending criminal cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | | | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| 1. | Solapur Local Authorities Constituency | RAJENDRA VITTHAL RAUT | NIL | NIL | NIL | NIL | NIL |

**Name of constituency : Solapur Local Authorities Constituency**

**Place : Mumbai**
**Date : 04.06.2026**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation.......
**Ravindra Chavan**
**President,**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

## महत्त्वाचे

### विजेतेपद जिंकण्याची मालिका कायम ठेवू : हरमनप्रीत कौर

**नवी दिल्ली** : गत वर्षी आयसीसी महिला क्रिकेट विश्वचषकांत मिळवलेल्या ऐतिहासिक विजयामुळे भारतीय महिला क्रिकेट संघाचा दृष्टिकोन पूर्णपणे बदलला आहे. एकदिवसीय विश्वचषकानंतर आयुष्य पूर्णपणे बदलले आहे. आता आमचा हा संघ आगामी आयसीसी महिला टी-२० विश्वचषक स्पर्धेत जागतिक स्तरावर पुन्हा एकदा यश मिळवण्यासाठी सज्ज होत आहे. विजेतेपद जिंकण्याची मालिका कायम ठेवू, असा विश्वास भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौर हिने व्यक्त केला. या महत्त्वपूर्ण यशामुळे संघाचा आत्मविश्वास आणि स्वतःवरील विश्वास मोठ्या प्रमाणात वाढला आहे, असे ती म्हणाली. विजेतेपद जिंकण्याची ही मालिका अशीच सुरू ठेवू. कर्णधार म्हणून मला हेच हवे आहे आणि संघातील प्रत्येकाचे हेच स्वप्न आहे. आम्ही याच दिशेने वाटचाल करत राहू, असेही हरमनप्रीत म्हणाली. गेल्या दशकात भारतीय महिला क्रिकेटच्या प्रगतीत या अनुभवी कर्णधाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहिली आहे. अनेक आयसीसी स्पर्धांमध्ये सहभाग आणि काही मोहिमांचा निराशाजनक शेवट पाहिल्यानंतर, हरमनप्रीत आता अशा संघाचे नेतृत्व करत आहे ज्यांच्याकडे मोठ्या मंचावर विजय मिळविण्याचा आत्मविश्वास आहे.



# भारत 'अ'चा श्रीलंकेवर ८ धावांनी रोमांचक विजय

## तिरंगी अ वन-डे मालिका ● ऋतुराज गायकवाडचे शतक, तिलक वर्माचे अर्धशतक




**डाम्बुला, ९ जून**

मंगळवारी डाम्बुला येथील रंगिरी डाम्बुला आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर सुरू झालेल्या तिरंगी 'अ' वन-डे मालिकेतील सलामीच्या सामन्यात ऋतुराज गायकवाडचे शतक व कर्णधार तिलक वर्माचे अर्धशतक आणि त्यानंतर डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शद खानने डावातील ४९ व्या षटकात घेतलेल्या तीन महत्त्वपूर्ण बळींमुळे भारत 'अ' संघाने श्रीलंका 'अ' संघावर ८ धावांनी रोमहर्षक विजय मिळविला. या मालिकेत अफगाणिस्तान 'अ' हा तिसरा संघ सहभागी झाला आहे.

भारत अ संघाने ५० षटकांत ६ बाद २७७ धावा उभारल्या आणि श्रीलंका अ संघासमोर विजयासाठी २७८ धावा काढण्याचे आव्हान ठेवले. परंतु धावांचा पाठलाग करताना श्रीलंकेचा अ संघ ४८.५ षटकांत २६९ धावांतच गारद झाला.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या भारत अ संघाच्या सलामी जोडीने- प्रभसिमरन सिंग (२) व वैभव सूर्यवंशीने (१४) निराश केले. भारताने ४.१ षटकांत १६ धावांत हे दोन भरवशाचे खेळाडू गमावले. त्यानंतर प्रियांश आर्यने ३२ चेंडूंत ३२ धावांचे योगदान देऊन आपली निवड सार्थकी लावली. त्यानंतर ऋतुराज गायकवाड व कर्णधार तिलक वर्मने चौथ्या गड्यासाठी १५० धावांची भागीदारी केली आणि भारत अ संघाला ४३.५ षटकांत २१९ धावांचा टप्पा गाठून दिला. याचवेळी ऋतुराज डावखुरा वानुजा सहानच्या फिरकीला बळी पडला. ऋतुराज गायकवाडने ११४ चेंडूंत ६ चौकार व ३ षटकारांसह १०१ धावांची शतकी खेळी केली. पुढे तिलक वर्मा शतकाकडे वाटचाल करीत असतानाच त्याचा शिराजने त्रिफळा उडविला. तिलक वर्मने ९७ चेंडूंचा सामना करत २ चौकार व एका षटकारासह ६० धावांचे योगदान दिले.

आयुष बदोनी (२४) व सूर्यांश शेडगेने (नाबाद २८) श्रीलंकेच्या गोलंदाजांचा खंबीरपणे सामना करत भारत अ संघाला ५० षटकांत ६ बाद २७७ धावा रचून दिल्या. श्रीलंका अ संघाकडून मोहम्मद शिराजने २ बळी, तर चामिका करूणारत्ने, गारुका संकेथ व वनुजा सहानने प्रत्येकी १ बळी टिपण्यात यश मिळविले.

धावांचा पाठलाग करताना श्रीलंका अ संघाच्या पहिल्या फळीतील फलंदाजांनी भारतीय गोलंदाजांना चोख प्रत्युत्तर देत आपल्या संघाच्या विजयाचा आशा पल्लवीत ठेवल्या, परंतु तळाच्या फळीतील फलंदाज भारतीय गोलंदाजांसमोर विशेषतः अर्शद खानच्या वेगवान माऱ्यापुढे टिकाव धरू शकले नाही. निरोशन डिकवेला (४७) व अविष्का फर्नांडो (४५) या सलामी जोडीने ९३ धावांची भागीदारी करत श्रीलंका अ संघाच्या डावाची चांगली सुरुवात केली. नंतर सदीरा समरविक्रमा (४६) व कर्णधार सहान अराचचिगेने (७४) चौथ्या गड्यासाठी ७८ धावांची भागीदारी करून श्रीलंकेच्या विजयाच्या आशा पल्वीत ठेवल्या. मात्र त्यानंतर श्रीलंका अ संघाची घसरगुंडी उडाली व त्यांचा डाव ४८.५ षटकांत २६९ धावांवर आटोपला. ४९ व्या षटकांदरम्यान अर्शद खानने जबरदस्त वेगवान मारा केला, त्याच्या एका चेंडूवर वनुजा सहान (२३) धावबाद झाला, तर त्याने विजयकांत वियासकांतला (५) पायचित केले व मोहम्मद शिराजला निगमकडून झेलबाद केले.

भारत अ संघाकडून अर्शद खान, अनुकूल रॉय, आयुष बदोनी व विप्रज निगमने प्रत्येकी २ बळी टिपले. अंशुल कम्बोजने एक बळी मिळविला. (वृत्तसंस्था)

# सिराजच्या जागी प्रसिध कृष्णा

## आयर्लण्ड, इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी बदल

**नवी दिल्ली, ९ जून**

जून आणि जुलैमध्ये होणाऱ्या आयर्लण्ड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकेसाठी मोहम्मद सिराजच्या जागी प्रसिध कृष्णाची निवड करण्यात आली आहे.

बीसीसीआयचे वैद्यकीय पथक व संघ व्यवस्थापन यांच्यातील चर्चेनंतर, कामाचा ताण व्यवस्थापन कार्यक्रमाचा एक भाग म्हणून सिराजला विश्रांती घेण्याचा सल्ला देण्यात आला आहे. दीर्घ आंतरराष्ट्रीय हंगामापूर्वी त्याला पूर्णपणे सावरण्यासाठी आणि तंदुरुस्त होण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून हा निर्णय घेण्यात आला आहे, असे बीसीसीआयने मंगळवारी सांगितले.

सिराजला समावेश भारताच्या मागील टी-२० मोहिमेत टी-२० विश्वचषकात उशिरा करण्यात आला होता; तसेच त्याने आयपीएल २०२६ मध्ये गुजरात टायटन्ससाठी सर्व १७ सामने खेळले आणि १९ बळी घेतले होते. हा उजव्या हाताचा वेगवान गोलंदाज अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यातही खेळला होता. हा कसोटी सामना सोमवारी तीन दिवसांतच संपला.

आयपीएल २०२६ मध्ये गुजरात टायटन्ससाठी १२ सामन्यांत १६ बळी घेणाऱ्या प्रसिध कृष्णाने यापूर्वी नोव्हेंबर २०२३ मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध शेवटचा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना खेळला होता.



भारत २६ आणि २८ जून रोजी बेलफास्ट येथे आयर्लंडविरुद्ध दोन २० सामने खेळणार आहे आणि त्यानंतर १ ते ११ जुलै दरम्यान यजमान इंग्लंडविरुद्ध पाच टी-२० सामने खेळणार आहे.

**आयर्लण्ड व इंग्लंड दौऱ्यांसाठी अद्ययावत संघ** : श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टिरक्षक), ईशान किशन (यष्टिरक्षक), शिवम दुबे, तिलक वर्मा (उपकर्णधार), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, वैभव सूर्यवंशी व प्रसिध कृष्णा. (वृत्तसंस्था)

### लॉर्ड्स, गद्दाफी स्टेडियमच्या खेळपट्ट्या असमाधानकारक

**दुबई** : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) लंडनमधील लॉर्ड्स आणि लाहोरमधील गद्दाफी स्टेडियमला प्रत्येकी एक डीमेरिट पॉइंट (दोष गुण) दिला आहे. अलीकडील आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये वापरण्यात आलेल्या खेळपट्ट्या आयसीसीच्या पिच आणि आउटफील्ड मॉनिटरिंग प्रक्रियेअंतर्गत असमाधानकारक असल्याचे आढळल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. लॉर्ड्सवर इंग्लंड व न्यूझीलंड यांच्यातील पहिली कसोटी आणि लाहोरमध्ये पाकिस्तान व ऑस्ट्रेलिया यांच्यातील तिसरा एकदिवसीय सामना झाल्यानंतर सामना पंचांनी सादर केलेल्या अहवालांच्या आधारे ही कारवाई करण्यात आली आहे.

# मडिवाळ ऑरेंज आर्मी संघास विजेतेपद

## श्री वीरशैव मडीवळेश्वर प्रीमियर लीग क्रिकेट

**सोलापूर, दि. ९ जून-**

मडिवाळ ऑरेंज आर्मी संघाने श्री वीरशैव मडीवळेश्वर प्रीमियर लीग पर्व ७चे विजेतेपद पटकाविले.

अंतिम सामन्यात त्यांनी मडिवाळ रॉयल संघास हरविले. याचे बक्षीस वितरण आ. विजय देशमुख यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, मंडल अध्यक्ष महेश देवकर, किसन गर्जे, श्री वीरशैव मडीवळेश्वर ज्ञाती मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष नागनाथ बापट, अनिल कंदलगी, तुळशीदास कुडगुंडे, शंकर दौलताबाद, मधुकर चिनकेरी, शशिकांत कानकुर्ती, अनिल तगडेकर, विजय होनगुंटी, सुनील पेदरपट्टी, किशोर होनगुंटी, साई इंब्रापुरे, आकाश पेदरपट्टी, शिवकांत कानकुर्ती, दशरथ बापट, रवि बिज्जरगी, विनायक हंग्रोळे, नितीन इंब्रापुरे आदी उपस्थित होते.




### सुप्रीत घनाते यास आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त

**सोलापूर, दि. ९ जून-**



पुणे इंटरनॅशनल स्पीड चेस फेस्टिवल या स्पर्धेत सुप्रीत सचिन घनाते याने भाग घेऊन अन्वित वाले व राहुल महाजन या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडूंचा पराभव केला. त्यामुळे त्याला १५२९ असे आंतरराष्ट्रीय रॅपिड गुणांकन जागतिक बुद्धिबळ संघटने कडून जाहीर झाले आहे. सुप्रीत हा बालपणापासून ईशांत्रा जमादार यांच्याकडे बुद्धिबळाचे प्रशिक्षण घेत आहे. या त्याच्या यशाबद्दल त्याला रमा जगदीश बहुउद्देशीय संस्थेचे अध्यक्ष मधुकर नाईक, सचिव शरद नाईक, राजू राजपूत, नीता तांबोळकर, शिरीष नाईक व प्रशांत पिसे यांनी अभिनंदन करत कौतुक केले आहे

### भारतीय ज्यूदो महासंघाच्या कोषाध्यक्षपदी शैलेश टिळक


**पुणे, दि. ९ जून-**



ज्यूदो फेडरेशन ऑफ इंडिया या भारतातील ज्यूदो खेळातील सर्वोच्च संघटनेच्या कोषाध्यक्षपदी महाराष्ट्राच्या शैलेश टिळक यांची बहुमताने निवड झाली. दिल्ली येथे झालेल्या निवडणुकीत टिळक यांना ३७ मते मिळाली तर त्यांचे प्रतिस्पर्धी केरळ ज्यूदो संघटनेचे अध्यक्ष श्रीकुमार याना २३ मते प्राप्त झाली. टिळक हे महाराष्ट्र ज्यूदो संघटनेचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र ऑलिम्पिक संघटनेचे सहसचिव आहेत. ज्यूदो महासंघावर चार वर्षांपासून लागू असलेले 'प्रशासकीय राज' या निवडणुकीमुळे संपुष्टात येऊन लोकशाही पद्धतीने झालेल्या निवडणुकीतून राज्य ज्यूदो संघटनांच्या प्रतिनिधींचे प्रशासन स्थापन झाले आहे. नव्या कार्यकारीणीमध्ये फेडरेशनचे अध्यक्ष मुकेश कुमार (मध्य प्रदेश) महासचिव बानी बात्रा दास (आसाम) हे प्रमुख पदाधिकारी आहेत.

### राज्य स्केटिंग स्पर्धेत संयुक्ता पोतदारला सुवर्ण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ९ जून-**



रोलर स्केटिंग फेडरेशन ऑफ पुणे यांच्या वतीने विमाननगर पुणे येथील आंतरराष्ट्रीय स्केटिंग ट्रॅकवर झालेल्या महाराष्ट्र स्टेट ओपन चॅम्पियनशिप स्पर्धेत येथील विनर्स फाउंडेशनची अवघ्या सहा वर्षांची स्केटर संयुक्ता पोतदार हिने इनलाईन स्केटिंग प्रकारातील लाँग रेसमध्ये रौप्य आणि शॉर्ट रेसमध्ये सुवर्ण पदक पटकाविले. या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक सम्यक मोहोळकर, सागर राठोड, सिद्धू सुतार आणि वासुदेव कैरमकोंडा यांचे मार्गदर्शन लाभले. संयुक्ताच्या या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी प्रकाश मोहार, मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी दत्तात्रय वरकड दयानंद महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी विजयकुमार उबाळे यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# बार्शी सायकलिंग क्लबचे अमृत खेडकर द्वितीय

## सोलापूर सायक्लोथॉन स्पर्धेतील कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ८ जून-**

सायकल रायडर्स सोलापूर आयोजित सायक्लोथॉन स्पर्धेत बार्शी सायकलिंग क्लबच्या ६ सायकलपटूंनी शर्यत पूर्ण केली. यात अमृत खेडकर यांनी ५० कि.मी. अंतर अवघ्या १ तास ३२ मिनिटांत पूर्ण करत सरासरी ३२ कि.मी./ताशी वेग राखून द्वितीय क्रमांक पटकावला.

सोलापूरच्या सोनी कॉलेज येथून सुरु झालेल्या या सायक्लोथॉनमध्ये डॉ. कुमार जगताप, डॉ. नवदीप लोकरे, अमोल ताकभाते, रणजीत पाटील आणि लक्ष्मण नलवडे यांनीही स्पर्धा यशस्वीरीत्या पूर्ण केली. स्पर्धेची सुरुवात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षाला पाणी घालून करण्यात आली.



द्वितीय स्थान मिळविलेले अमृत हे सायकलिंग व फिटनेस क्षेत्रातील एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहे. काश्मीर ते कन्याकुमारी हा देशव्यापी सायकलिंग प्रवास त्यांनी यशस्वीरित्या पूर्ण करुन त्यांनी जिद्द, चिकाटी आणि साहसाचे दर्शन घडवले आहे. तसेच प्रतिष्ठेची आयर्नमॅन स्पर्धा पूर्ण करणारे सोलापूर ग्रामीण पोलिस दलातील पहिले पोलिस कर्मचारी म्हणून त्यांनी मानाचा बहुमान मिळवला आहे. याशिवाय त्यांनी 'बीआरएम'सारखी अत्यंत आव्हानात्मक लांब पल्ल्याची सायकलिंग स्पर्धा यशस्वीपणे पूर्ण केली आहे.

# 'लोकनाथ' मीडिया चषक स्पर्धेच्या किटचा लॉंचिंग समारंभ उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सोलापुरातील सेवालय फाउंडेशनचे अध्यक्ष तथा शिंदेसेनेचे जिल्हाध्यक्ष मनीष काळजे यांच्या सहकार्याने पत्रकार बांधवांसाठी १२ ते १४ जून या तीन दिवसात रेल्वे मैदान येथे 'लोकनाथ' मीडिया चषक २०२६चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेचा किट (टी शर्ट व पॅन्ट ) लाँचिंग समारंभ उत्साहात पार पडला.

मंगळवारी सकाळी सोलापूर श्रमिक पत्रकार संघात आयोजित 'लोकनाथ' मीडिया चषक स्पर्धेच्या किट (टी शर्ट व पॅन्ट ) चे लाँचिंग समारंभास महापालिकेचे क्रीडा अधिकारी नजीर शेख, सेवालय फाउंडेशनचे प्रमुख मनीष काळजे, सोलापूर श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे, खजिनदार किरण बनसोडे, डिजिटल मीडिया असोसिएशनचे अध्यक्ष विजयकुमार बाबर आदी मान्यवर उपस्थित होते. सोलापुरात होत असलेल्या 'लोकनाथ' मीडिया स्पर्धेत लोकमत, संचार, दिव्य मराठी, सकाळ, तरुण भारत संवाद, डिजिटल मीडिया, सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, राज्य मराठी पत्रकार संघ, मेट्रो सोलापूर या संघांनी सहभाग नोंदविला आहे.



सर्व संघास विविध रंगाचे किट देण्यात येत आहेत. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त वर्षभर विविध सामाजिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. 'लोकनाथ' मीडिया चषक हा त्याचाच एक भाग असून त्याची जय्यत तयारी करण्यात आली असल्याचे काळजे यांनी सांगितले. यावेळी सर्व संघांचे प्रशिक्षक, कर्णधार, खेळाडू व पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### लेखणीनंतर आता मैदानातही पत्रकारांची दमदार बॅटिंग होणार

महापालिकेचे क्रीडा अधिकारी नजीर शेख म्हणाले, पत्रकारांनी केवळ लेखणीतूनच नव्हे तर मैदानावरही आपली क्रीडाक्षमता दाखवतील. लेखणीनंतर आता मैदानातही पत्रकारांची दमदार बॅटिंग होणार आहे. 'लोकनाथ चषक'मधून क्रीडा संस्कृतीला चालना मिळेल. पत्रकारांच्या दैनंदिन धावपळीच्या जीवनात शारीरिक तंदुरुस्ती म हत्त्वाची आहे. आयपीएलच्या धर्तीवर पत्रकारांच्या ध्येही क्रीडा संस्कृती रुजावी. पत्रकार मैदानावरही तितक्याच जोमाने खेळतील, जितक्या जोमाने ते बातम्यांच्या माध्यमातून समाजासमोर सत्य मांडतात.

# साऊथ सोलापूर आपटे ब्ल्यू व मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट अंतिम फेरीत



## ७९ वी रेल्वे स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धा : अर्शीन कुलकर्णी, प्रवीण देशेट्टी सामनावीर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

रेल्वेच्या ७९व्या स्कॉट मेमोरियल प्रिसिजन क्रिकेट स्पर्धेत मंगळवारी झालेल्या अटीतटीच्या उपांत्य सामन्यांमध्ये विजय मिळवून साऊथ सोलापूर आपटे ब्लू आणि मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर या संघांनी अंतिम फेरीत धडक मारली आहे.

सकाळच्या सत्रात झालेल्या पहिल्या उपांत्य सामन्यात साऊथ सोलापूर आपटे ब्लू संघाने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना मॉडेल क्रिकेट ॲकॅडमीने २० षटकांत सर्वबाद १२३ धावा केल्या. यात वैष्णव जावळेने ४५ आणि विवेक अंचीने २९ धावांचे योगदान दिले. साऊथ सोलापूरकडून गोलंदाजीत संकेत काखंडकीने ५ धावांत २ बळी, तर अतुल चौधरी आणि हर्षल कुलकर्णी यांनी प्रत्येकी १ बळी घेतला. स्वप्निल हंचाटे, बाळकृष्ण काशीद व नारायण डोके यांनीही प्रत्येकी एक गडी बाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना साऊथ सोलापूर आपटे ब्लू संघाने १८.२ षटकांत ७ गड्यांच्या मोबदल्यात १२४ धावा करत ३ गडी राखून विजय मिळवला. अरशीन कुलकर्णीने नाबाद ६७ धावांची मॅचविनिंग खेळी केली, तर निरंजन कदमने १७ व संकेत काखंडकीने १६ धावा केल्या. मॉडेल क्रिकेट क्लबकडून सुधनव मनुरे २ आणि यश बोरामणी, स्वराज वाले, सुदेश राठोड व ओंकार रोकडे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

६७ धावांच्या नाबाद खेळीसाठी अरशीन कुलकर्णीला पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य अजितकुमार संगवे यांच्या हस्ते सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. यावेळी विक्रांत पवार, अंबादास तोरा, लियाकत शेख, सतपाल सिंग उपस्थित होते. या सामन्यात सचिन गायकवाड व दया नवले यांनी पंच म्हणून तर विशाल कुलकर्णी यांनी गुणलेखक म्हणून काम पाहिले.

दुपारच्या सत्रात झालेल्या दुसऱ्या उपांत्य सामन्यात मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत ७ बाद १६८ धावांचा मजबूत धावसंख्या उभारली. सलामीवीर प्रवीण देशेट्टीने ९५ धावांची वादळी खेळी केली. वेदांत काळेने १७ तर जसन सिंगने ११ धावा केल्या. परेल मेकॅनिकल इन्स्टिट्यूटकडून इम्रान हाकने ३, प्रेम देवकरने २, तर आर्यन देशमुख व करुणेश उनवे यांनी प्रत्येकी १ बळी घेतला.

१६९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना परेल मेकॅनिकल इन्स्टिट्यूटचा डाव १६.३ षटकांत १२६ धावांवर आटोपला. आर्यन देशमुखने सर्वाधिक ४८ धावा केल्या, तर इम्रान हकने १४ आणि प्रेम देवकरने ११ धावा केल्या. मध्य रेल्वे सोलापूरकडून सिद्धार्थ नका याने ३ बळी, तर लखन गावडे आणि आदित्य दडे यांनी प्रत्येकी २ बळी घेत संघाच्या ४२ धावांनी विजयावर शिक्कामोर्तब केले.



९५ धावांच्या धडाकेबाज खेळीसाठी प्रवीण देशेट्टीला साम नावीर पुरस्कार देण्यात आला. सोलापूर जिल्हा क्रिकेट निवड समितीचे चेअरमन राहिलेले वरिष्ठ क्रिकेटपटू के. टी. पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यापसंगी विक्रांत पवार, राजा पटेल, गौतम बनसोडे आणि सचिन गायकवाड उपस्थित होते. सामन्यात महेश सोनवाने व अशोक डोंबाळे यांनी पंच म्हणून तर सचिन गायकवाड यांनी जबाबदारी सांभाळली.

कै. सुरेश मालप यांच्या स्मरणार्थ सुदेश व सुनील मालप यांनी या स्पर्धेच्या ट्रॉफी पुरस्कृत केल्या आहेत.

### आज अंतिम महामुकाबला

सकाळी ११:०० वाजता : मध्य रेल्वे इन्स्टिट्यूट सोलापूर विरुद्ध साऊथ सोलापूर आपटे ब्लू ब्यू.


CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# जुगार अड्ड्यावर कारवाई; ३ लाख ८६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ जुन -**

अनवली (ता.पंढरपूर) येथे लिंबाच्या झाडाखाली जुगार खेळताना सहाय्यक पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी धाड टाकून ८ जणांना ताब्यात घेतले आहे. तर त्यांच्याकडून ५६ हजार ५५० रू. रोख रक्कम, ५ मोबाईल, पत्याची पाने, ५ दुचाकी मोटार सायकल असा एकुण ३ लाख ८६,५५० रूपयाचा मुद्देमाल जप्त केल्याची घटना दि. ८ रोजी सायंकाळी ५.३० वा. घडली आहे.



दि.८ रोजी प्रशांत डगळे सहायक पोलीस अधीक्षक पंढरपूर यांना अनवली (ता.पंढरपूर) येथील गायरानामध्ये पाण्याचे टाकीजवळ येथे काही इसम मन्ना नावाचा पत्याचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली.त्यानुसार पोलीस पथकाने ५.३० वा.छापा टाकला असता, एका लिंबाच्या झाडाखाली मोकळया जागेत काही इसम गोलाकर बसुन मन्ना नावाचा पत्याचा जुगार खेळत असल्याचे दिसले. त्यांना गराडा घालून जागीच पकडले. त्यांच्या समोरच वेगवेगळया दराच्या नोटा पडलेल्या दिसल्या.

पकडलेल्यांमध्ये महादेव पांडुरंग रूपनर (वय ३४) रा. अनवली, हरी वासुदेव कुंभार (वय ३९) रा. चळे, योगेश शामराव ढोले (वय २८) रा. रांझणी, अनिल साधू डिसले (वय ५६) रा.अनवली, उमेश विठठल कोळी (वय ३८) रा. बठाण, प्रविण ईश्वर कांबळे (वय ३७) रा. गोपाळपूर, सोमनाथ दिलीप गुंड (वय ३५) रा. गोपाळपूर, ज्ञानेश्वर नाम देव गांजाळे, रा. अनवली (फरार) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांच्याकडून ५६ हजार ५५० रू. रोख रक्कम, ५ मोबाईल, पत्याची पाने, ५ दुचाकी मोटार सायकल असा एकुण ३ लाख ८६ हजार ५५० रूपयाचा मुद्देमाल मिळून आला आहे. पकडलेल्या ८ आरोपी विरूध्द पंढरपूर तालुका पोलीस ठाणे येथे पो.ना. काकडे यांनी फिर्याद दिली आहे.

ही कारवाई सहाय्यक पोलीस अधीक्षक प्रशांत डगळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ रोंगे, पोकॉ हुलजंती, पोकॉ सावंत, पोकॉ कुचेकर, पोकॉ घायाळ, पोकॉ लोंढे यांनी पार पाडलेली आहे.

## महत्वाचे...

### शिवाजी पॉलिटेक्निकच्या ४४ विद्यार्थ्यांची डेना आनंद इंडिया कंपनीत निवड

**सांगोला, दि. ९ जून-**

शिवाजी पॉलिटेक्निक कॉलेजमधील मेकॅनिकल व इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन या विभागातील ४४ विद्यार्थ्यांची धारवाड येथील डेना आनंद इंडिया या कंपनीमध्ये निवड झाली आहे. मुलाखतीमध्ये मेकॅनिकल विभागातील सागर चोरमले, प्रतीक व्हनमाने, अभिषेक सांगोलकर, तेजस गंगाधरे, शुभम चौगुले, शंतनु शिंदे, प्रसाद बाबर, शुभम खुळे, अक्षय यादव, विश्वजीत पाटील, अजय घोडके, गंगाधर बंडगर, विकास सरगर, रामचंद्र दुधाळ, इम्रान आतार, स्वप्नील जाधव, विकास शास्त्री, रोहित शिंदे, विवेक शिंदे, दत्ता शिंदे, सिद्धेश्वर लेंडवे, आदिनाथ पाटोळे, दादासो भोसले, सुखदेव सोपे, अजय सातपुते, स्वरूप इंगळे तसेच इलेक्ट्रॉनिक्स अँड टेली कम्युनिकेशन विभागातील स्वप्नाली शिंदे, शुभम स्वामी, यश बळवंतराव, सायली मोरे, धीरज पवार, हर्षद तेली, गौरी काटे, पूजा बाबर, अपूर्वा झांबरे, श्रीकृष्ण कारंडे, सोमनाथ शिंदे, साक्षी नलवडे, स्वप्निल खांडेकर, श्रद्धा भाकरे, संचिता अवताडे, सोन्याबापु देवकते, संजना गायकवाड व धनश्री चव्हाण यांची निवड झाली. संस्थेचे अध्यक्ष बाबुराव गायकवाड, उपाध्यक्ष इंजि. महादेव गायकवाड, सचिव अंकुशराव गायकवाड, प्राचार्य डॉ.रणजीत देशमुख, प्रा.संदीप बावचे यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

### अपघात करुन मृत्युस कारणीभूत झाल्याप्रकरणी शिक्षकाची निर्दोष मुक्तता

**सोलापूर, दि. ९ जून-**

गाडी चालवून अपघातास कारणीभूत असलेबाबत सरकारपक्षाने ठोस पुरावा दिला नाही असा निष्कर्ष काढून शिक्षकाची निर्दोष मुक्तता केली. आरोपी अमित रामचंद्र बोधे (वय-४० वर्षे, धंदा-नोकरी, रा. करमाळा) हा महात्मा गांधी विद्यालय, करमाळा येथे सहशिक्षक म्हणून कार्यरत आहे. तो शाळेच्या कामानिमीत्ताने २३ सप्टेंबर २०१९ रोजी सोलापूर येथे काम संपवून तो त्याची स्वतःची कार टाटा इंडिका विस्टा गाडीने परत करमाळा येथे निघाला असता, केगाव ब्रिजवरती विस्टा कारने मोटार सायकल गाडीस पाठीमागून धडक दिली. त्यामध्ये किसन सोपान गोसावी (वय-६५ वर्षे, रा. केगाव, उत्तर सोलापूर) हा जखमी झाला व नंतर त्याच रात्री उपचारा दरम्यान मयत झाला. मयताचा मुलगा पांडुरंग किसन गोसावी याने आरोपी विरुध्द फिर्याद दिली. या खटल्याची सुनावणी प्रथम न्यायदंडाधिकारी नवले यांच्यासमोर झाली. त्यामध्ये सरकार पक्षातर्फे १० साक्षीदार तपासण्यात आले. घटना प्रत्यक्ष पाहिलेले फिर्यादी पांडुरंग गोसावी याने उलट तपासामध्ये मयत हे हायवेवरुन जात असताना त्याने उत्तरेकडे केगावकडे जाणाऱ्या रस्त्यावर जाण्यासाठी त्याने वळण घेतले व रस्त्याच्या मध्यभागी आले असे कबूल केले. त्यामुळे पुराव्याअभावी त्याची निर्दोष मुक्तता केली. यात आरोपीतर्फे ॲड. भारत कट्टे, ॲड. बिभीषण सोरटे (करमाळा), ॲड. राही पवार, ॲड. निलम वाडेकर यांनी कामकाज पाहिले.

### व्यवसायासाठी माहेरुन ३ लाख आण म्हणून छळ; पतीसह सहा जणांवर गुन्हा

**सोलापूर, दि. ९ जून-**

नणंदेच्या पतीच्या व्यवसायासाठी माहेरून ३ लाख रुपये आण म्हणून विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी पतीसह सहा जणांविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. चनबसप्पा-पती, सुरेखा-सासू, अल्लप्रभु दिर, कावेरी- जाऊ, जयश्री- नणंद, रामसागर-नणंदेचा पती (सर्व रा. जी ५२, आदर्श नगर, विजापूर, कर्नाटक) अशी गुन्हा दाखलची नावे असून याबाबत प्राजक्ता चनबसप्पा चनगोंड (रा.२६, मुक्ती नगर, सैफुल,) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी ३० मे २०२१ रोजी ते आजतागायत सासरी नांदत असताना वरील आरोपींनी मिळुन फिर्यादीस शारीरीक व मानसिक त्रास देवून मारहाण केली व नंदोइला खासगी व्यवसाय सुरु करण्यासाठी माहेरुन ३ लाख रुपये घेवून ये म्हणून मानसिक छळ केला आहे. तसेच फिर्यादीला माहेरी निघून जा असे म्हणून शिवीगाळ, दमदाटी केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक फौजदार पवार हे गुन्ह्याचा पुढील तपास करीत आहेत.

## निधन वृत्त...


### अमोल पाटील



**मोडनिंब, दि. ९ जून-**

मोडनिंब (ता.माढा) येथील अमोल सुनील पाटील (वय २९) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आजी, आई, वडील, एक भाऊ, एक बहीण असा परिवार आहे.

### मंदाकिनी हिबारे



**सोलापूर, दि. ९ जून-**

नीलम नगर येथील रहिवासी मंदाकिनी सुरेश हिबारे (वय ५०) यांचे दि. ९ जून रोजी सकाळी ७ वाजता निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, काकू, भाऊ, बहीण, भावजाई असा परिवार आहे.


### सरोज शहा



**सोलापूर, दि. ९ जून-**

सरोज प्रोविजन किराणा स्टोअर्सचे मालकीण व संजय इलेक्ट्रॉनिक्सचे संजय शहा यांच्या मातोश्री सरोज शहा (वय ८५) यांचे वृद्धापकाळ व अल्पशा आजाराने मंगळवार ९ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर तुळजापूर रोड येथील स्मशानभूमीत विद्युत दाहिनीत अंत्यसंस्कार करण्यात आले.


### निलाबाई झळकी



**सोलापूर, दि. ९ जून-**

शेगांव (ता. अक्कलकोट) येथील रहिवासी निलाबाई तुकाराम झळकी (वय ८०) यांचे सोम वार दि. ८ जून रोजी दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात ४ मुले, सुना नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर मंगळवारी दि ९ जून रोजी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

### गणेश पोतदार



**सोलापूर, दि. ९ जून-**

कंदलगाव (ता. दक्षिण सोलापूर) येथील गणेश काशिनाथ पोतदार (वय ६४) यांचे मंगळवारी हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा व मुलगी असा परिवार आहे. जिल्हा परिषद शाळेचे केंद्र प्रमुख दत्तात्रय पोतदार यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

## बिबट्यासदृश प्राण्याने पाडला दोन शेळ्या, बोकडाचा फडशा

### गादेगाव परिसरात घटना, वनविभागाची पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.९ जून -**

पंढरपूर परिसरात गेल्या काही दिवसांपासून वन्य प्राण्यांच्या वावरामुळे दहशतीचे वातावरण असतानाच, रविवारी मध्यरात्री बिबट्यासदृश प्राण्याने धुमाकूळ घातला आहे. या हिंस्र प्राण्याने केलेल्या हल्ल्यात गादेगाव येथील दोन शेळ्या आणि एक बोकड जागीच ठार झाले असून, एक बोकड हा प्राणी सोबत घेऊन गेला आहे. या घटनेमुळे गादेगाव आणि परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, गादेगाव येथील शंकर बागल यांच्या घरासमोर मध्यरात्री एक वा सुमारास बिबट्यासदृश प्राण्याने अचानक या जनावरांवर हल्ला चढवला. अचानक झालेल्या हल्ल्यात दोन शेळ्या आणि एक बोकड जागीच गतप्राण झाले, बोकडाला फरफटत नेले. वनपाल बापू भोई, वनरक्षक राजाभाऊ जाधवर, वनसेवक अतुल सावंत, शकील मनेरी आणि युवराज काळे यांनी घटनास्थळी धाव घेतली.

रात्री कोणीही कंदील किंवा बॅटरी घेतल्याशिवाय बाहेर पडू नये, हातात काठी घेऊन जावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## प्रा.बाळकृष्ण लावंड राज्य गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि.९ जून-**

गुरुवर्य सि. बा. यादव प्रतिष्ठान, मंगळवेढा यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय 'गुणवंत शिक्षक पुरस्कार' प्रदान सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सोहळ्यात करमाळा तालुक्यातील सालसे येथील लाल बहादूर शास्त्री विद्यालयाचे शिक्षक प्रा. बाळकृष्ण अर्जुनराव लावंड यांना राज्य गुणवंत शिक्षक पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले.




जवाहरलाल हायस्कूल, मंगळवेढाचे माजी मुख्याध्यापक गुरुवर्य सि . बा. यादव यांचे गौरवार्थ स्थापन केलेल्या सि. बा. यादव प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी या सोहळ्याचे आयोजन केले होते. या सोहळ्याचे संयोजन प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. गणेश यादव आणि पदाधिकारी व माजी विद्यार्थी समन्वय समिती यांचे सहकार्याने केले होते. सोहळ्याचे हे ११ वे वर्ष होते. यंदाच्या सोहळ्यात कोल्हापूर येथील ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यामंदिर हायस्कूल, लक्ष्मी दहिवडी येथील माजी मुख्याध्यापक आनंद जोशी होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून मंगळवेढा नगरपरिषदेचे उपनगराध्यक्ष मा .येताळा भगत, व राजमाता अर्बन को-ऑप. बँक, मंगळवेढाचे चेअरमन डॉ. अशोक सुरवसे उपस्थित होते.

प्रा. लावंड यांनी इंग्रजी विषय अध्यापन, विद्यार्थी-केंद्रित उपक्रम, शिक्षक प्रशिक्षण, शैक्षणिक नेतृत्व आणि इंग्लिश लँग्वेज टीचर्स असोसिएशनच्या माध्यमातून केलेल्या कार्याची दखल घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या गौरवाबद्दल यशकल्याणी सेवाभावी संस्था, पुणेचे अध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा इंग्लिश लँग्वेज टीचर्स असोसिएशनचे प्रमुख सल्लागार प्रा. डॉ. गणेश करे-पाटील, विद्या विकास मंडळाचे सचिव विलासराव घुमरे, अक्कलकोट श्री स्वामी समर्थ मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे, विश्वस्त भारतराव शिंदे, ॲड. बाळासाहेब मुटके, प्रा. मिलिंद फंड, ब्रिटिश कौन्सिल इंडियाचे मेंटॉर अश्पाक काझी, माजी जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मुचंडे, इंग्लिश अँड फॉरिन लँग्वेजेस समन्वयक सुल्तानचाँद शेख, शिक्षक भारती संघटनेचे सोलापूर जिल्हा प्रवक्ते विजयकुमार गुंड, प्रा. बाळासाहेब नरारे, असोसिएशनचे सचिव धनाजी राऊत, उपाध्यक्ष अगतराव भोसले, आबासाहेब दाढे, शशिकांत चंदनशिवे, प्रा. जयेश पवार, प्रा. विष्णू शिंदे तसेच पक्षीमित्र कल्याणराव साळुंके यांनी प्रा. लावंड यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व सामाजिक कार्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.




## रेल्वे विभागातर्फे आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरुकता दिवस साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने आंतरराष्ट्रीय लेव्हल क्रॉसिंग जागरूकता दिवस साजरा केला. या अंतर्गत सोलापूर-वाडी, सोलापूर-दौंड, कुर्डुवाडी-लातूर आणि कुर्डुवाडी-मिरज या सेक्शनमधील विविध ठिकाणी व्यापक जागरूकता कार्यक्रम आणि संपर्क उपक्रम राबविण्यात आले. रेल्वे मार्ग ओलांडण्यापूर्वी नेहमी 'थांबा, पहा आणि ऐका' या तत्त्वाचे पालन करावे; गेट्स बंद असताना किंवा बंद होत असताना मार्ग ओलांडू नये; मोबाईल फोन आणि इअरफोन्ससारख्या गोष्टींमुळे होणारे दुर्लक्ष टाळावे; गेटकीपर्सच्या सूचनांचे पालन करावे आणि रेल्वे मार्गांवर वाहने उभी करणे टाळावे. तसेच, विद्युतीकरण झालेल्या रेल्वे मार्गांवर ओव्हरहेड उपकरणांपासून सुरक्षित अंतर राखण्यावर आणि अति-उंचीची किंवा ओव्हरलोड वाहने चालवताना विशेष खबरदारी घेण्यावर भर देण्यात आला.

## रामेश्वर बुक बँक, चंद्रकांत रेम्बर्सु यांच्या वतीने पाटी-पेन्सिल व पुस्तकांचे वाटप



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

गोरगरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे मोफत वाटप करणाऱ्या रामेश्वर बुक बँक या संस्थेच्या वतीने अक्कलकोट रोडवरील समाधान नगर कामगार वस्तीतील अंगणवाडीमध्ये बालकांना पाटी, पेन्सिल, खडू आणि पुस्तकांचे मोफत वाटप करण्यात आले.

जिल्हा क्रिकेट संघटनेचे संयुक्त सचिव चंद्रकांत रेम्बर्सु यांच्या सहकार्यातून हा उपक्रम पार पडला. काही दिवसांपूर्वी ९ वी, १० वी आणि ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी पुस्तके, तसेच ५० लहान मुलांसाठी पाटी-पेन्सिलची आवश्यकता असल्याचा संदेश सोशल मीडियावर टाकण्यात आला होता. या आवाहनाला तातडीने प्रतिसाद देत श्री. रेम्बर्सु यांनी सर्व साहित्य संस्थेकडे सुपुर्द केले. या साहित्याचे वाटप समाधान नगर येथील अंगणवाडीत संजय पाटील यांच्या हस्ते व मल्लिनाथ याळगी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.


कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रेखा चिकशेट्टी, आरती जाधव, पूनम उपाडे, ज्योती जाधव, माधवी जाधव, सिद्धाराम याळगी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अंगणवाडी शिक्षिका पूनम पाटील यांनी केले. मदतनीस रेखा भोसले यांनी आभार मानले.

## विडी कामगारांच्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

### प्री-मॅट्रिकसाठी ३१ ऑगस्ट आणि मॅट्रिकोत्तरसाठी ३१ ऑक्टोबर अंतिम तारीख

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया १ जून २०२६ पासून सुरु झाली आहे. विडी/चुनखडी आणि डोलोमाईट/लोह-मईगनीज-क्रोम खनिज खाण कामगारांच्या मान्यताप्राप्त शैक्षणिक संस्थांमध्ये शिकणाऱ्या मुला-मुलींना आर्थिक सहाय्य योजनेअंतर्गत इयत्ता पहिली पासून ते उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्तीची रक्कम भारत सरकारने या योजनेअंतर्गत लाभ मिळविण्यासाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टल https://scholarships.gov.in वर विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ज्याची अंतिम तारीख प्री-मॅट्रिकसाठी ३१.०८.२०२६ आणि मॅट्रिकोत्तरसाठी ३१.१०.२०२६ आहे. अर्ज केल्यानंतर आपण शिकत असलेल्या शैक्षणिक संस्थेशी संपर्क साधून आपल्या अर्जाची पडताळणी करून घ्यावी लागेल. अर्जाची पडताळणी करून घेण्याची जबाबदारी



विद्यार्थ्याची असेल.

ऑनलाइन अर्ज करण्यासाठी किंवा इतर कोणत्याही प्रकारच्या समस्या/निदानासाठी नागपूर मुख्यालय दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५१०४७४ किंवा ई-मेल wcngp.labour@nic.in वर संपर्क साधता येईल. तसेच कामगार कल्याण संस्थेद्वारे चालवल्या जाणाऱ्या जवळच्या दवाखान्याचे/रुग्णालयाचे प्रभारी वैद्यकीय अधिकारी/डॉक्टर यांच्याकडून वैयक्तिकरित्या माहिती मिळवता येईल. शेवटच्या तारखेनंतरप्राप्त झालेले अर्ज आणि संस्थेने सत्यापित न केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, असे नागपूरचे कल्याण आयुक्त ए, माधवन यांनी कळविले आहे.

### अशी मिळणार वार्षिक शिष्यवृत्ती

पहिली ते चौथी : एक हजार, पाचवी ते आठवी : पंधराशे, नववी ते दहावी: दोन हजार, अकरावी ते बारावी: तीन हजार, आयटीआय, पॉलिटेक्निक, पदवी अभ्यासकम : सहा हजार, व्यावसायिक अभ्यासक्रम : २५ हजार

### अर्ज करताना विद्यार्थ्यांनी 'या' बाबी लक्षात ठेवाव्यात

१. पहिल्यांदा अर्ज करताना ओटीआर OTR-One Time Registration (एक वेळ नोंदणी) निर्माण करा.
२. अर्ज करताना आधार कार्ड आवश्यक आहे. आधार बँक खात्याशी लिंक (सिडिंग) असणे अनिवार्य आहे.
३. विद्यार्थ्यांचे स्वतःते बँक खाते असावे. संयुक्त खाते असल्यास पहिले नाव विद्यार्थ्यांचे असावे.
४. पालकास एकापेक्षा जास्त मुले असल्यास प्रत्येक मुलाचे स्वतंत्र बँक खाते असावे.
५. प्रत्येक विद्यार्थ्यांचा वेगळा मोबाईल नंबर असावा.
६. बिडी कामगाराच्या ओळखपत्रावर आश्रित सदस्यांचे नाव व अवलंबून असलेल्या कुटुंबातील सदस्यांची माहिती दिलेली असावी.
७. महसूल प्राधिकरणाने जारी केलेले वर्ष २०२५-२६ चे उत्पन्न प्रमाणपत्र जोडावे. उत्पन्न प्रमाणपत्रावर सहीच्या ठिकाणी पिवळे प्रश्नचिन्ह चालणार नाही त्याऐवजी हिरवे चिन्ह असावे.
८. आधिक माहितीसाठी सोलापूर येथील औषधी संयोजक चिंतेश्वर मोवाडे (मो.९४२०७३६८०६) यांच्याशी संपर्क साधा.



## मुख्यमंत्री समृध्द अभियानामुळे उंदरगावात फुलल्या परसबागा

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर दि. ९ जून-**

उंदरगाव (ता.करमाळा) या गावाने समृद्ध पंचायतराज मध्ये सहभाग घेतला असून या सहभातांर्गत प्रत्येक घराच्या सभोवताली ग्रामस्थांनी लोकसहभागातून परसबाग फुलवल्या आहेत .गावातील पालेभाज्यांची गरज या परसबागेमधून भागवली जात आहे आणि या पालेभाज्या संपूर्णपणे सेंद्रिय पद्धतीने तयार केल्या जात आहे या परसबांगांचे कुतूहल आसपासच्या गावातील लोकांमध्येही झालेले आहे व अनेक सभोवतालच्या भागातील ग्रामस्थ उंदरगाव मध्ये चालवल्या जाणाऱ्या नाविन्यपूर्ण उपक्रमासाठी मोठ्या प्रमाणामध्ये भेट देऊन उदंरगावांमधील या उपक्रमाची माहिती घेत आहे, अशी माहिती उंदरगावचे सरपंच युवराज मगर व उपसरपंच प्रभावती रामहरी गरदडे, यशवंत कुदळे यांनी दिली आहे. तसेच या गावांमध्ये ५० पेक्षा जास्त कुटुंबाने आपल्या घराशेजारी परसबाग करण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच फळझाडांची ही लागवड मोठ्या प्रमाणामध्ये केलेली आहे संपूर्ण गाव हिरवेगार कोकणासारखे फुललेले आहे त्यामुळे संपूर्ण ग्रामस्थांमध्ये या अभियानाच्या माध्यमातून नवचैतन्य निर्माण झालेली आहे व ग्रामपंचायतीकडून राबवले जाणारे नाविन्यपूर्ण उपक्रम पाहून ग्रामस्थांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत आहे यासाठी या गावाला यशवंतराव चव्हाण महाविद्यालय करमाळा राष्ट्रीय सेवा योजना +२ स्तरचे स्वयंसेवक सहकार्य करत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



# महत्वाचे...

## दारूच्या नशेत गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ९ जून-**

दारूच्या नशेत एका ३६ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आत्महत्याचा प्रयत्न केला. ही घटना बुधवार पेठ परिसरातील रामजी चौकाजवळ सोमवारी रात्रीच्या सुमारास घडली . बापू सिद्राम सोनवणे (वय ३६ वर्ष ,रा. रामजी चौकाजवळ, सोलापूर) असे गळफास घेतलेल्या इसमाचे नाव आहे.त्याने सोमवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास घरातील छताच्या पंख्याला मंडपाला लागणाऱ्या कापडाच्या सहाय्याने गळफास घेतला होता. त्याला फासातून सोडवून बेशुद्ध अवस्थेत आकाश कदम यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## सरस्वती चौकात आत्महत्येचा प्रयत्न

**सोलापूर, दि. ९ जून-**

अज्ञात कारणावरून एका २३ वर्षीय तरुणाने टॉवेलने गळफास घेऊन आत्महत्येचा प्रयत्न केला. ही घटना शहरातील सरस्वती चौक परिसरात असलेल्या सिटीकॉर्नर येथे सोमवारी सायंकाळच्या सुमारास घडली. पंकज यादव (वय २३ मुळ रा. लखनऊ उ.प्रदेश. सध्या सिटीकॉर्नर सरस्वती चौक, सोलापूर) असे त्या तरुणाचे नाव आहे. त्याने सोमवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास राहत्या ठिकाणी घरगुती वादातून टॉवेलने गळफास घेतला होता.त्याला फासातून सोडवून दिलीप यादव (मित्र) याने शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## जाब विचारल्याने महिलेस सत्तुरने मारहाण

**सोलापूर, दि. ९ जून-**

शिवीगाळ केल्याचा जाब विचारल्याने एका महिलेस सत्तुर आणि लाथाबुक्क्याने मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील कुरुल येथे सोमवारी दुपारच्या सुमारास घडली. रेखा तानाजी जाधव (वय ३४, रा.कुरुल) असे जखमी महिलेचे नाव आहे. त्यांना विठ्ठल गुंड, भिवा गुंड आणि इतर दोघांनी मिळून मारहाण केली.त्यांना म ोहोळ येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात हरिदास चटके यांनी दाखल केले.

## मित्राच्या मृत्यूस कारणीभूत; मित्रावर गुन्हा

**सोलापूर, दि. ९ जून-**

भर वेगात व बेदरकारपणे दुचाकी चालवून, अपघात करुन मि त्राच्या मृत्यूला कारणीभूत झाल्याप्रकरणी दुचाकीस्वार मित्रावर विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. करण शाम भणगे असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. अपघातात मयत झालेल्या तरुणाची पत्नी प्रिया विशाल जाधव (रा. सनत नगर, लिमयेवाडी, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादीचे पती विशाल व त्यांचा मित्र तथा यातील आरोपी करण भणग हे दि. १ जून २०२६ रोजी पहाटे २.३० वाजण्याच्या सुमारास सैफुल येथून जेवण करुन आरोपीच्या एम.एच.१३ डी.एन.९०१४ या क्रमांकाच्या दुचाकीवरुन येत होते. सैफुल येथील शगुप्ता दालचावल जवळ दुचाकीवरील ताबा सुटल्याने दुचाकी घसरुन रस्त्यावर पडली. यात फिर्यादीच्या पतीचा गंभीर जखमी होऊन उपचारादरम्यान मृत्यु झाला. पोलिस हवालदार जाधव हे पुढील तपास करीत आहे.

## कोयत्याने मारून उचलून आपटले, महिला जखमी

**सोलापूर, दि.९ जून-**

अज्ञात कारणावरून एका महिलेस कोयत्याने मारून उचलून आपटल्याने सदर महिला जखमी झाल्याची घटना पंढरपूर तालुक्यातील होळे गावात सोमवारी घडली. शितल संतोष उडाळ (वय-३४, रा.होळे) असे जखमी महिलेचे नाव आहे. सोमवारी दुपारी घराजवळ असताना गणेश शिंदे व त्याची बायकोने कोयत्याने मारून उचलून आपटले. यात डोक्याला जखम व सर्व अंगाला मुकामार लागल्याने त्यांना येथील शासकीय रुग्णालयात मुलगी ज्ञानेश्वरी हिने रात्री दाखल केले.

## बॉयलर आगीच्या भडक्यात मजूर जखमी

**सोलापूर, दि. ९ जून-**

दाल मिल मधील काम करत असताना बॉयलर मधील आगीचा भडका उडाल्याने लकी पासवान (वय ३२ वर्ष, रा. दोड्डी फाटा, हैदराबाद रोड सोलापूर) हा कामगार भाजून जखमी झाला . ही घटना आज मंगळवारी पहाटे दोन वाजे च्या सुमारास हैदराबाद रोडवरील दोड्डी फाटा येथे घडली. त्याला उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयात मिल सुपरवायझर सागर निम्बर्गी यांनी दाखल केले.

## झाड का तोडले म्हणून वृद्ध महिलेस मारहाण

**सोलापूर, दि.९ जून-**

घराजवळील सीताफळाचे झाड का तोडले म्हणून एका वृद्ध महिलेस लाकडाने मारहाण करण्यात आल्याची घटना मोहोळ तालुक्यातील मुंढेवाडी येथे सोमवारी दुपारी घडली. भामबाई लक्ष्मण चटके (वय-६०, रा.मुंडेवाडी) असे मारहाण झालेल्या महिलेचे नाव आहे. विठ्ठल गुंड व इतर तीन जणांनी मिळून लाकडाने मारहाण केली. यात सर्व अंगाला मुका मार लागल्याने त्यांना उपचाराकरिता येथील शासकीय रुग्णालयात जावई विशाल यांनी दाखल केले.

# नाल्यांची सद्यस्थिती, पाणी निचरा व्यवस्थेची कार्यक्षमता आदींची जाणून घेतली माहिती

### महापालिका आयुक्त सचिन ओम्बासे यांनी केली नाल्यांची पाहणी

### अमन हॉटेल ते मजरेवाडी परिसरात अतिक्रमणाची घेतली गंभीर दखल




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

सोलापूर शहरातील विविध नाल्यांच्या पाहणीदरम्यान महापालिका आयुक्त नाल्यांची सद्यस्थिती, गाळ काढण्याची प्रगती, पाणी निचरा व्यवस्थेची कार्यक्षमता आदींविषयीची माहिती जाणून घेतली. दरम्यान, स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या समस्या ऐकून घेतल्या.

मान्सूनपूर्व कामे तातडीने पूर्ण करावीत. पावसाळ्यापूर्वी नालेसफाईची सर्व कामे वेळेत आणि दर्जेदार पध्दतीने पूर्ण करण्याचे आदेश त्यांनी दिले. अतिक्रमणे तात्काळ हटवून नालेसफाईची कामे पूर्ण करावीत. या कामात अडथळा निर्माण करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

ब्रह्मदेव नगर आणि मुलतानी बेकरी परिसरातील नाल्यांची पाहणी करताना नाल्यांची उंची रस्त्याच्या पातळीशी सुसंगत ठेवण्याच्या सूचना दिल्या. जेणेकरुन पावसाचे पाणी रस्त्यावर न साचता थेट नाल्यात जाईल. नाल्यांची इनवर्ट लेव्हल निश्चित करुन त्याचे मार्किंग करण्याचे निर्देशही देण्यात आले.

नाला क्रमांक १३ व १४ तसेच अमन हॉटेल ते मजरेवाडी मार्गावरील नाल्यांजवळ झालेल्या अतिक्रमणांची आयुक्तांनी गंभीर दखल घेतली. अमन हॉटेल ते मजरेवाडी परिसरात स्ट्रॉम वॉटर लाईन असतानाही काही ठिकाणी नाले कोसळल्यामुळे पावसाचे पाणी रस्त्यावर येत असल्याच्या तक्रारी समोर आल्या.

रवींद्र नगर, ताई चौक (नाला क्र. १४) तसेच विजयनगर ते शोभानगर परिसरातील नाल्यांचीही पाहणी करण्यात आली. पावसाळ्यात घरांमध्ये पाणी शिरण्याच्या घटना टाळण्यासाठी या भागांतील गाळ काढणे आणि नालेसफाईची कामे युध्दपातळीवर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले.

### सर्व नाल्यांची स्वतंत्र नोंदणी करा

शहरातील नकाशावरील आणि नकाशावर नोंद नसलेल्या सर्व नाल्यांची माहिती संकलित करुन स्वतंत्र नोंदणी करण्याचे आदेशही आयुक्तांनी दिले. भविष्यातील नाला विकास प्रकल्प, पाणी निचरा व्यवस्थेचे नियोजन आणि केंद्र शासनाच्या विविध योजनांतून निधी मिळिवण्यासाठी सविस्तर प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका आकुलवार, विभागीय अधिकारी पी.एस. सावंत, कनिष्ठ अभियंता संजय पाटील, सूफियान पठाण, विष्णू कांबळे, प्राची मेटे यांच्यासह नगरसेवक अझहर हुंडेकरी, अझर जाहीगीदार, बसवराज कैय्यकार, अनिसा मोगल उपस्थित होते.

## मोडनिंब येथे सातत्याने बत्ती गुल; नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा,**
**मोडनिंब, दि. ९ जून-**

माढा तालुक्यातील मोडनिंब येथे गेल्या काही दिवसांपासून वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले असून 'महावितरण'च्या कारभारावर तीव्र नाराजी व्यक्त करीत आहेत.

दुपारच्या वेळी वीज नसल्यामुळे नागरिकांना उकाड्याचा त्रास सहन करावा लागत आहे. सायंकाळच्या वेळीही वीजपुरवठा खंडित होत असल्याने अंधाराचा सामना करावा लागत आहे.

रात्री वीज खंडित होत असल्याने झोपेचा खोळंबा होत आहे. अचानक वीज ये-जा होत असल्याने घरगुती वापराच्या इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या सुरक्षिततेबाबतही नागरिकांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे.

वीज पुरवठ्यात वारंवार होणाऱ्या खंडितमुळे घरगुती कामे, व्यावसायिक व्यवहार यांसह विद्यार्थ्यांच्या अभ्यासावरही परिणाम होत असल्याचे सांगण्यात येते.

शेटफळ ३३ kv लाईनची कंडक्टर तुटल्यामुळे व वादळी वाऱ्यामुळे काही ठिकाणी तारा तुटल्यामुळे व पोल मोडल्यामुळे ते जोडण्यासाठी सप्लाय काही काळ बंद होता. सध्या सर्व लाईन सुरळीत केलेल्या आहेत, असे महावितरणचे मोडनिंब येथील सहायक अभियंता संतोष सुळ यांनी सांगितले.

उन्हाळ्याच्या दिवसांत पिकांना पाण्याची सर्वाधिक गरज असताना शेतीपंपाचा वीजपुरवठा खंडित होत आहे. शेतकऱ्यांचे नियोजन कोलमडले आहे. रात्रभर जागून पाणी देण्याची वेळ येते. तातडीने पूर्ण करून वीजपुरवठा सुरळीत करावा, असे आप्पा पाटील या शेतकऱ्याने सांगितले.




## विद्यार्थी साहाय्य बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने २३२ विद्यार्थ्यांना पुस्तक संच भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

येथील विद्यार्थी साहाय्य बहुउद्देशीय संस्था सोलापूर यांच्या वतीने दहावीच्या २३२ विद्यार्थ्यांना पुस्तक संच भेट देण्यात आले. स्वीकृत नगरसेवक, संस्थेचे संचालक ज्ञानेश्वर म्याकल यांनी स्वागत केले.

संस्थेचे अध्यक्ष शाम येमूल यांनी प्रास्ताविकात सांगितले की, ज्या पालकांची ऐपत नसते अशा पालकांच्या पाल्यांसाठी सन २०१४ सालापासून हा उपक्रम राबविण्यात येत आहे. नवीन पुस्तक संच छापण्यासाठी वृक्षतोड करावी लागते. वृक्षसंवर्धन करण्यासाठी पाठपुस्तक अभ्यासक्रम बदलेपर्यंत पुर्नवापर केले पाहिजे. यासाठी राज्य सरकार आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्यात आले

या उपक्रमासाठी शाम, संदीप आणि रोहित यांचे WIT सोलापूर व १९९७ {roduction Engineering चे मित्रांचे सहकार्य लाभले. अमेरिकेतून मिलींद शेगुणशी यांनी सर्वात मोठी देणगी दिली. डॉ.शैलेश पाटील, डॉ. सूर्यप्रकाश कोठे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी इस्कॉन सोलापूरच्या वतीने एका भक्ताकडून प्रत्येक विद्यार्थ्यास भगवद्गीता सार पुस्तक, १४ शाळांना भगवतगीता ग्रंथ भेट देण्यात आले

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शुभम शेरला, बाळू इंजामुरे, देवराज विटकर, सोहम येमूल, सोहेल पटेल, सोनाली येमूल आदींनी परिश्रम घेतले.

## नूमवि शाळेच्या वतीने ब्रम्हणस्पती याग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**



शि.प्र.मंडळी संचलित नू .म.वि. शिशु शाळेने ६० व्या वर्षात नुकतेच पदार्पण केले. यानिमित्ताने शाळेत बुद्धीची देवता ब्रह्मणस्पती याग आणि अधिकम ासाचे औचित्य साधून श्री पुरुष सूक्ताचे पठण करून दोन्ही देवतां कृपाशीर्वाद असावा यासाठी हवन केले.

माझी अध्यक्ष राजेश पटवर्धन यांनी सपत्नीक यजमानपद स्वीकारले. राजेश पटवर्धन यांच्या हस्ते हीरक महोत्सवाच्या वर्षानिमि त्ताने प्रतीक चिन्हाचे अनावरण करण्यात आले. मनोज भालेराव, सुरेश बाबू मंकणी, यांनी शुभेच्छा दिल्या. शि.प्र .मंडळी संचलित सोलापूरातील सर्व संस्था प्रमुख, मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी, सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी वर्ग,मोठ्या गटाचे विद्यार्थी यांची प्रमुख उपस्थिती होती.

## सर्वांच्या सहकार्यामुळेच जिल्ह्यातील विकासकामांची पूर्तता : आशीर्वाद

### दै.'तरुण भारत'चे मुख्य संपादक प्रशांत माने यांच्या हस्ते सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**



सोलापुरात जवळपास तीन वर्षाच्या कालावधीत जिल्ह्यातील विविध प्रश्न, कामे हाताळण्यात आली. येथील पत्रकारबांधव, नागरिक, लोकप्रतिनिधी तसेच सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचारी यांच्या सहकार्यातून हाती घेतलेली जवळपास सर्व कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. सर्वांच्या सहकार्यामुळेच हे शक्य झाल्याची भावना नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी व्यक्त केली.

नागपूरचे जिल्हाधिकारी आशीर्वाद हे आज सोलापुरात आल्यानंतर त्यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधताना आपल्या भावना व्यक्त केल्या. तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नागपूर येथे बदली झाल्या निमित्त दैनिक तरुण भारतचे मुख्य संपादक प्रशांत माने, वरिष्ठ उपसंपादक अविनाश गायकवाड यांनी त्यांचा सत्कार केला.

जिल्हाधिकारी आशीर्वाद पुढे म्हणाले की, जिल्हाधिकारी पदाची यशस्वी कारकीर्द ही येथील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या कामावर अवलंबून असते. नव्याने रुजू झाल्यानंतर पहिल्या दोन-तीन महिन्यातच कोणत्या अधिकाऱ्याकडून कोणत्या प्रकारची कामे करून घेता येतील याची माहिती होणे गरजेचे असते.

येथील पत्रकारांच्या सहकार्यामुळे पंढरपूर कॉरिडॉर, विमान सेवा सुरू करणे, आषाढी वारीचे यशस्वी आयोजन, पूर परिस्थितीत सर्व प्रशासकीय यंत्रणेने केलेले कामकाज तसेच प्रत्येक सोम वारी व शुक्रवारी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना भेटून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी केलेले प्रयत्न, यामुळे येथे आपण काहीतरी सर्वसाम ान्यांसाठी काम करू शकलो याचे समाधान वाटते, असे त्यांनी सांगितले.

नागपूर येथे बदली झाली असली तरी सोलापूर जिल्ह्याच्या कोणत्याही प्रकारच्या कामासाठी आपण सांगितले तर ते काम करण्यासाठी तत्पर असल्याचेही त्यांनी यावेळी सूचित केले. यावेळी सोलापूर श्रमिक पत्रकार संघ, महसूल बीट पत्रकार संघाच्या वतीनेही जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

## श्री विठ्ठल रूक्मिणीमातेच्या चंदनउटी पुजेची सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर दि.९ जुन -**



ग्रीष्मऋतूतील वाढत्या उन्हापासून श्रीविठुरायाला शीतलता मिळावी, यासाठी दरवर्षी चैत्र पाडव्यापासून मृग नक्षत्राने पावसाळ्याची सुरुवात होईपर्यंत दररोज दुपारी चंदनउटी पूजेची परंपरा आहे. त्यानुसार यंदाच्या या पूजेला गुढीपाडव्यापासून पासून सुरुवात करण्यात आली होती व आज दि.९ जून रोजी सांगता पुजा मंदिर समि तीचे सदस्य व अधिकारी यांच्या शुभहस्ते करण्यात आल्याची माहिती व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

श्रीविठ्ठलाला उन्हाचा त्रास होऊ नये, त्याची तीव्रता कमी व्हावी, थंडावा मि ळावा या भावनेतून ही पूजा केली जाते. विठुरायाप्रमाणे रुक्मिणी मातेला देखील यापद्धतीने चंदन उटी लावण्यात येते. या चंदनउटी पुजेची आज दि.९ जून रोजी सांगता पुजा झाली. त्यामध्ये श्री विठ्ठल व श्री रूक्मिणीमातेची चंदनउटी पुजा अनुक्रमे सदस्य संभाजी शिंदे व लेखा अधिकारी मुकेश अनेचा तसेच सदस्या शकुंतला नडगिरे व व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांच्या शुभहस्ते संपन्न झाली. यावेळी विभाग प्रमुख भिमाशंकर सारवाडकर, सहायक विभाग प्रमुख संदीप कुलकर्णी व पांडूरंग दशपुत्रे उपस्थित होते.

मागील वर्षी प्रमाणे भाविकांना श्रींची चंदनउटी पुजा ऑनलाईन पध्दतीने बुकींग करण्यास उपलब्ध करून दिली होती. त्यास भाविकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. या पूजेच्या माध्यमांतून मंदिर समितीला सुमारे १४ लक्ष ६४ हजार इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे. त्यामध्ये श्री विठ्ठल व श्री रुक्मिणीमातेकडे अनुक्रमे रूपये २१००० व ९००० इतके देणगी मुल्य होते. दि.१९ मार्च ते ९ जून कालावधीत एकूण पुजेचे ८२ दिवस उपलब्ध झाले होते. त्यामध्ये अधिक मास वगळता इतर दिवशी श्री विठ्ठलाकडे ५० व रूक्मिणीमातेकडे ४६ पुजा भाविकांसाठी उपलब्ध झाल्या होत्या. यापूजेसाठी अंदाजे ९० ते ९५ किलो चंदनाचा वापर करण्यात आला आहे. यंदा चंदनउटी पुजा कालावधीत अधिकमास आल्याने, अधिकमास कालावधीतील पुजा मंदिर समिती मार्फत करण्यात आल्या होत्या.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

# दूध, गुटखा, बनावट औषधांवर प्रशासनाचा प्रहार

## ■ सोलापुरात दुधाचे १३ नमुने संकलित ■ भेसळखोरांमध्ये उडाली एकच खळबळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी अवघ्या आठ दिवसांत राज्यभर धडक कारवायांची मालिका राबवत भेसळ आणि बेकायदा अन्नव्यवसायाविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. सोलापूर विभागानेही दूध भेसळीविरोधातील मोहिमेला गती दिली आहे. जिल्ह्यातील अनेक दूध उत्पादक आस्थापनांची तपासणी करण्यात आली. या तपासणीत १३ दुधाचे नमुने संकलित करुन प्रयोगशाळेकडे विश्लेषणासाठी पाठविण्यात आले आहेत. प्रशासनाच्या या आक्रमक भूमिकेमुळे भेसळमाफियांमध्ये खळबळ उडाली असून, नागरिकांमधून या मोहिमेचे स्वागत होत आहे.

राज्यातील गुटखा व पानमसाला विक्री, भेसळयुक्त दूध व तूप, रासायनिक प्रक्रियेद्वारे पिकवलेली फळे, अस्वच्छ खाद्य




उत्पादन केंद्रे, बनावट औषधनिर्मिती तसेच दिशाभूल करणाऱ्या औषध जाहिरातींवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या कारवाईदरम्यान ३३ जणांना अटक करण्यात आली. २७ आस्थापनांवर सीलची कारवाई करण्यात आली आहे. २५ गुन्हे दाखल करुन कोट्यवधी रुपयांचा संशयित व भेसळयुक्त माल जप्त करण्यात आला आहे.

या कारवायांमुळे ग्राहकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्नांबाबत प्रशासन गंभीर असल्याचा संदेश गेला आहे. विशेषतः दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत वाढलेल्या चिंतेच्या पार्श्वभूमीवर ही मोहीम महत्त्वाची मानली जात आहे. भेसळ रोखण्यासाठी केवळ छापेच नव्हे, तर सातत्यपूर्ण तपासणी, प्रयोगशाळा विश्लेषण आणि दोषींवर कठोर कारवाई ही त्रिसूत्री प्रभावीपणे राबविण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे सांगण्यात येते.

### दूध उत्पादकांच्या हिताच्या उपाययोजना

राज्य दूध उत्पादक व प्रक्रिया व्यावसायिक कल्याणकारी संघाच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच तुकाराम मुंढे यांची भेट घेतली. दूध व्यवसायासमोरील आव्हाने, बनावट पनीर, भेसळीचे प्रकार, तपासणी यंत्रणा आणि दूध उत्पादकांच्या हिताच्या उपाययोजना आदींविषयी यावेळी चर्चा करण्यात आली.

### दुग्ध प्रक्रिया क्षेत्रातील संस्थांची संयुक्त बैठक

दूध भेसळीविरोधातील कारवाई अधिक प्रभावी करण्यासाठी दूध पावडर प्रकल्प, पाऊच पॅकिंग उद्योग, दुग्ध प्रक्रिया क्षेत्रातील संस्थांची संयुक्त बैठक जून महिन्यात आयोजित करण्यात येणार आहे, असे तुकाराम मुंढे यांनी या शिष्टमंडळाला सांगितले.

### अनुदान संदर्भात करुन देण्यात आली आठवण

राज्यात दूध दर घसरल्याच्या काळात शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट अनुदान जमा करण्याचा निर्णय मुंढे दुग्धविकास विभागाचे सचिव असताना घेण्यात आला होता. त्या निर्णयामुळे लाखो दूध उत्पादकांना थेट आर्थिक दिलासा मिळाल्याची आठवण संघाच्या पदाधिकाऱ्यांनी यावेळी करुन दिली.

---

**महत्वाचे...**

### श्रीवास्तव नाभिक समाज संस्थेच्या अध्यक्षपदी मालतुमकर

**सोलापूर, दि. ९ जून-**

श्रीवास्तव नाभिक समाजाच्या अध्यक्षपदी विठ्ठल मालतुमकर यांची तर सचिवपदी सिद्राम रुद्रार यांची बिनविरोध निवड करण्यात आली. लष्कर येथील श्रीवास्तव नाभिक समाज मंदिरात झालेल्या सभेत सन २०२६ ते २०२७ या कालावधीसाठी ही निवड करण्यात आली. यावेळी निवडण्यात आलेले अन्य पदाधिकारी याप्रमाणे; उपाध्यक्ष- परशुराम श्रीमंगले, खजिनदार-महेश श्रीमंगले, सहसचिव-मनोज मॅकलवार. यावेळी प्रकाश सदगुरे, सुधीर वड्डेपल्ली, राजू शुक्लवार, नंदकिशोर सदगुरे, प्रकाश जोगीपेठकर, विजय शुक्लवार, विनायक वड्डेपल्ली यांच्यासह समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.





### शेतीपंप जप्त करण्याची कारवाई थांबविण्यात यावी

**सोलापूर, दि. ९ मे-**

पंढरपूर तालुक्यातील भीमा नदीवर असलेल्या गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर, पटवर्धन कुरोली येथील बंधाऱ्यातील पाणी विविध गावच्या पाणी पुरवठा योजनांसाठी राखीव ठेवले आहे. हे पाणी नदी काठच्या शेतकऱ्यांनी पिकांसाठी उचलू नये; याकरिता जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने दररोज केवळ २ तास वीजपुरवठा सुरु ठेवला आहे. विविध मार्गाने जे शेतीपंप चालतील ते जप्त करण्याची कारवाई करण्यात येत आहे. पूर्वीप्रमाणे आठ तास वीज पुरवठा करण्यात यावी आणि शेतीपंप जप्त करण्याची कारवाई थांबविण्यात यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली. सध्या पंढरपूर तालुक्यातील उन्हाचा कडाका वाढलेला असून पारा ४० अंशाकडे निघालेला आहे. अशा परिस्थिती पायथ्याला पाणी असूनही वीजपुरवठा बंद असल्याने सर्व शेतीपंप बंद आहेत. केवळ दोन तासाच्या काळात पिकांना पाणी देणे शक्य नसल्याने शेतातील उभी पिके जाळून जात आहेत. जनावरांना सुध्दा पिण्याचे पाण्याची टंचाई निर्माण होत आहे, असेही या निवेदनात म्हटले आहे. यावेळी शाम कदम, संभाजी भोसले, दीपक कवडे, सनी घुले, विक्रम वानकर, नितीन देशमुख, शैलेश चव्हाण, विजय भोसले, रविकांत माने आदी उपस्थित होते.

---

## शेतात सर्पदंश; शाळकरी मुलीचा मृत्यू

### नुकतीच पास झाली होती इयत्ता नववीची परीक्षा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील औज आहेरवाडी येथील एका शेतात सर्पदंश झालेल्या एका १४ वर्षीय शाळकरी मुलीचा सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मंगळवारी पहाटे १ वाजता मृत्यू झाला. श्रावणी अभय पाटील असे मयत मुलीचे नाव आहे.



श्रावणी पाटील ही ७ जून रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या सुमारास औज आहेरवाडी येथील शेतातून म्हशीला घेऊन जात असताना तिच्या डाव्या पायास साप चावला होता. त्यामुळे ती चक्कर येऊन पडली. तिला काका रामदास सलगर यांनी एका खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन पुढील उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.

श्रावणी पाटील ही नुकतीच इयत्ता नववीची परीक्षा पास झाली होती आणि चालू शैक्षणिक वर्षात दहावीला प्रवेश करणार होती. तिच्या पश्चात आई, वडील, दोन लहान भाऊ असा परिवार आहे.

---

## कस्तुरबा उद्यानात समाजकंटकांचा वावर; भाजी मंडईतही स्वच्छतेचा अभाव

**नगरसेविका वंदना गायकवाड यांनी वेधले लक्ष**

**महापालिका आयुक्त ओम्बासे यांनी केली पाहणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

न्यू बुधवार परिसरातील कस्तुरबा उद्यान बंद अवस्थेत असून याठिकाणी समाजकंटकांचा वावर वाढला आहे. तसेच येथील भाजी मंडईतही स्वच्छतेचा अभाव आहे. याकडे नगरसेविका वंदना गायकवाड यांनी लक्ष वेधले असता महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी कस्तुरबा उद्यान व कस्तुरबा भाजी मंडईची पाहणी केली.

कस्तुरबा उद्यानात झुडपे वाढलेली आहेत. सर्वत्र कचरा साचलेला आहे. वॉकिंग ट्रॅक, ओपन जिम आणि चिल्ड्रन पार्कची दुरवस्था झालेली आहे. कस्तुरबा भाजी मार्केटमधील शौचालयांची दुरवस्था झालेली असून स्वच्छतेचा अभाव आहे. यामुळे येथील व्यापाऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, असे सांगण्यात आले.



### नगरसेवक, नगरसेविकांकडून सहकार्याची अपेक्षा

शहरातील उद्याने, सार्वजनिक स्थळे आणि भाजी मंडई परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी महानगरपालिका प्रशासन कटिबध्द आहे. सार्वजनिक सुविधांच्या दर्जात्मक वाढीसाठी आणखी उपाययोजना राबविण्यात येणार आहे. याकामी नगरसेवक-नगरसेविका यांनी आपापल्या वार्डवाईज निधीतून सहकार्य करण्याची अपेक्षा आहे, असे महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांनी यावेळी सांगितले.

### अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षावर आयुक्तांनी नाराजी

कस्तुरबा मार्केट परिसरातील जुन्या इमारतीवर वाढलेली झाडे आणि गळणारे पत्रे यामुळे अपघाताचा धोका निर्माण झाल्याची बाबही पाहणीदरम्यान समोर आली. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षावर आयुक्तांनी नाराजी व्यक्त करत धोकादायक झाडे तात्काळ हटवून परिसर सुरक्षित करण्याचे निर्देश दिले. नागरिकांच्या सुरक्षिततेशी तडजोड केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

या पाहणी दौऱ्याप्रसंगी नगरसेविका वंदना गायकवाड, अजित गायकवाड, नगर अभियंता सारिका आकुलवार, विभागीय अधिकारी सुनीता हिबारे, उद्यान प्रमुख कोमल काशीद, आरोग्य निरीक्षक खाजाप्पा कट्टीमनी, सामाजिक कार्यकर्ते जोशी बुवा यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

---

### आजपासून दमाणी नगरात कीर्तन महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

अधिक मासनिमित्त ह.भ.प.माऊली महाराज बचुटे मित्र परिवारच्या वतीने बुधवार, दि.१० ते रविवार, दि.१४ जून २०२६ या कालावधीत दमाणी नगर येथील गडदर्शन समाज मंदिर येथे कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती ह.भ.प. माऊली महाराज बचुटे-सवाळकर यांनी दिली. बुधवार, दि.१० जून रोजी रात्री ८ वाजता ह.भ.प.भागवत महाराज शिरवळकर यांचे कीर्तन. गुरुवार, दि.११ जून रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प.माधव महाराज नामदास यांचे तर रात्री ८ वाजता ह.भ.प.गहिनीनाथ महाराज औसेकर यांचे कीर्तन. शुक्रवार, दि.१२ जून रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प.हरी महाराज राशिनकर तर रात्री ८ वाजता ह.भ.प.योगीराज महाराज गोसावी यांचे कीर्तन. शनिवार, दि.१३ जून रोजी रात्री ८ वाजता ह.भ.प.पांडुरंगबाबा महाराज घुले यांचे कीर्तन. रविवार, दि.१४ जून रोजी सकाळी १० वाजता ह.भ.प.कान्होबा महाराज देहुकर यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

---

## १०वी, १२वी फेरपरीक्षा; ६ हजार विद्यार्थ्यांची दुसऱ्या संधीसाठी धाव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

दहावी आणि बारावीच्या परीक्षेत अपेक्षित यश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने फेरपरीक्षांचे वेळापत्रक जाहीर केले आहे. यानिमित्ताने जिल्ह्यातील ६ हजार ३१२ विद्यार्थी दुसऱ्या संधीसाठी धाव घेणार आहेत.



दि.१६ ते दि.३० जून २०२६ या कालावधीत सोलापूर, करमाळा, कुर्डुवाडी, अकलूज, गादेगाव, अक्कलकोट असे एकूण आठ परीक्षा केंद्रांवर इयत्ता दहावीची परीक्षा घेतली जाणार आहे. यासाठी २ हजार ९६ विद्यार्थी नोंदणीकृत आहेत.

दि.१६ जून ते ४ जुलै २०२६ या कालावधीत सोलापूर, पंढरपूर, अक्कलकोट, मोहोळ, अकलूज, बार्शी, सांगोला, करमाळा या केंद्रांवर इयत्ता बारावीची परीक्षा घेतली जाणार आहे. यासाठी ४ हजार २१६ विद्यार्थी नोंदणीकृत आहेत.

केंद्रस्तरावरील यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा, सुरक्षा व्यवस्था, परीक्षेच्या नियमांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत, असे शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांनी सांगितले.

### फेरपरीक्षा : सुधारणा आणि शैक्षणिक प्रगती

फेरपरीक्षा ही केवळ अपयशी विद्यार्थ्यांसाठी नसून गुण सुधारणा आणि शैक्षणिक प्रगतीसाठीही महत्त्वाची संधी मानली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उर्वरित कालावधीत नियोजनबध्द अभ्यास करुन या संधीचे सोने करावे, असे आवाहन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

---

## काशी जगद्गुरु यांच्या धर्मसभेची सोलापुरात होणार सांगता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

अधिक मासानिमित्त काशीपीठाचे जगद्गुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांचे अनेक ठिकाणी ईस्टलिंग महापूजा, धर्मसभा होत असून सोलापुरातील अक्कलकोट रस्त्यावरील श्रीबृहन्मठ होटगी संस्था येथे सांगता समारभ होणार असल्याचे सांगण्यात आले.

रविवार, दि.१४ जून रोजी दुपारी ४ वाजता अक्कलकोट रोडवरील विष्णुपंत नगर येथील श्रीबमलिंगेश्वर बृहन्मठ येथून रंभापुरी उज्जैन व उभय काशी जगद्गुरु यांचा रथोत्सव, १००८ जलकुंभ, ग्रंथदिंडी व पारंपारिक वाद्यांसह मिरवणूक काढण्यात येणार आहे. याचदिवशी अक्कलकोट रोडवरील श्रीबृहन्मठ होटगी संस्था येथे बृहन्मठाध्यक्ष चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या नेतृत्वाखाली शिवाचार्य व भक्तगणांच्या उपस्थितीत धर्मसभा होणार आहे. सोमवार, दि.१५ जून रोजी सकाळी ६ वाजता महिला मंडळाकडून रुद्रपठणासह काशी जगद्गुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी यांची महापूजा संपन्न होणार आहे. यावेळी महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. या सर्व कार्यक्रमांना भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन श्रीबृहन्मठ होटगी संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.



---

## सोलापूर माझ्या मनात कायमस्वरुपी राहील : आशीर्वाद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

मी सोलापूर येथे २२ जुलै २०२३ ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत जिल्हाधिकारी म्हणून काम केले. जवळपास या तीन वर्षाच्या कालावधीत जिल्ह्यातील विविध प्रश्न, कामे हाताळण्यात आली. येथील नागरिक, लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या सहकार्यातून हाती घेतलेली जवळपास सर्व कामे पूर्ण करण्यात आलेली आहेत. या कालावधीत सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांनी जे प्रेम व सहकार्य केले त्याबद्दल त्यांचा खूप आभारी आहे. ३ एप्रिल २०२६ रोजी माझी बदली नागपूर येथे झाली असली तरी सोलापूर जिल्हा कायमस्वरुपी माझ्या मनात आहे व राहील, असे भावनिक उद्गार तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी त्यांच्या निरोप समारंभप्रसंगी काढले.

सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या वतीने तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांची नागपूर येथे बदली झाल्यानिमित्त आयोजित निरोप समारंभात ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन, मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन, अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, सुशांत बनसोडे, सुमित शिंदे, सदाशिव पडदुणे, विजया पांगारकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, अन्नधान्य वितरण अधिकारी ओंकार पडोळे यांच्यासह महसूल विभागाचे सर्व अधिकारी-कर्मचारी तसेच प्रशासनातील अन्य विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



जिल्हाधिकारी पदाची यशस्वी कारकीर्द ही येथील अधिकारी कर्मचाऱ्यांच्या कामावर अवलंबून असते. नव्याने रुजू झाल्यानंतर पहिल्या दोन-तीन महिन्यातच कोणत्या अधिकाऱ्याकडून कोणत्या प्रकारची कामे करून घेता येतील याची माहिती होणे गरजेचे असते. वेळप्रसंगी अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या गरजेप्रमाणे त्यांना रजाही देणे आवश्यक असते. परंतु जिल्हाधिकारी यांनी कठोर असणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी कठोर राहिले तर प्रशासनातील सर्व अधिकारी कर्मचारी अधिक गतीने कामे करतात व त्याचा लाभ सर्वसामान्य जनतेला लवकर मिळण्यात होऊन शासन व प्रशासनाची चांगली प्रतिमा तयार होण्यास मदत होते, असेही नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी एस.कार्तिकेयन याप्रसंगी बोलताना म्हणाले, मागील दोन महिन्यापासून जिल्हाधिकारी म्हणून आपण सोलापूरमध्ये काम करत आहोत. सोलापूरचे तत्कालीन व नागपूरचे विद्यमान जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी येथे जी प्रशासकीय कामकाजाची चौकट निर्माण केली आहे, त्यामुळे कामे करताना कोणतीही अडचण येत नाही. येथील सर्व अधिकारी व कर्मचारी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पडतात. आशीर्वाद सरांनी जे आपले अनुभव मला सांगितलेले आहेत त्या पद्धतीने कामकाज करून सोलापूर जिल्हा विविध विकासकामात अग्रेसर ठेवण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुशल जैन यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या कामाचे व कार्यपध्दतीचे कौतुक केले. दरम्यान, सर्व संघटनाचे पदाधिकारी व सर्व अधिकारी, कर्मचारी यांनी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. उत्तर सोलापूर तालुक्याचे तहसीलदार नीलेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अपर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी आभार मानले.


### सर्वसामान्यांसाठी काम केल्याचे समाधान

पंढरपूर कॉरिडॉर, सोलापूर येथील विमानसेवा, आषाढी वारीचे आयोजन, पूर परिस्थितीतील कामकाज, प्रत्येक सोमवारी व शुक्रवारी जिल्ह्यातील सर्वसामान्य नागरिकांना भेटून त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी केलेले प्रयत्न यांसारख्या गोष्टींमुळे सोलापुरातील सर्वसामान्यांसाठी काम केल्याचे समाधान वाटते, असेही नागपूरचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले.

## ज्ञानामृत आनंदलहरी - १४६७

**दया करणें जे पुत्रासी। तेच दासा आणि दासी।।**

इतरांनी आपल्यावर प्रेम करावे असे आपणाला वाटते. त्याचप्रमाणे इतरांनाही आपण त्यांच्यावर प्रेम करावे असे वाटत असते. पण प्रेमाच्या, दयेच्या बाबतीत माणूस कांही प्रमाणात का होईना पण स्वार्थ जोपासतोच. म्हणूनच माणूस प्रेम, दया करताना आप-पर असा भेद करतो. आपला असेल तर हृदयपूर्वक दया, प्रेम केले जाते आणि परका असेल तर केवळ औपचारिकता म्हणून प्रेम केले जाते. कांही ठिकाणी तर निव्वळ प्रसिध्दीसाठी किंवा दाखविण्यासाठी प्रेमाचे नाटक केले जाते. पण समाजात असे कांही लोक आहेत की जे प्रेम, दया करताना कसलाही भेद जोपासत नाहीत. प्रसिध्दी किंवा दिखावा म्हणून प्रेम न करता सहजप्रवृत्ती म्हणून हृदयपूर्वक प्रेम, दया करतात. ज्याला कोणाचाही आश्रय नाही किंवा जो निराधार आहे त्याला हे निस्वार्थी महात्मे हृदयाला लावून घेतात. आपल्या पुत्रावर ज्याप्रमाणे प्रेम केले जाते, त्याप्रमाणे दासदासीवरही निस्वार्थपणे प्रेम करतात. अशा व्यक्ती ह्याच साक्षात भगवंताच्या मूर्ती असतात. हे सांगतांना तुकाराम महाराज म्हणतात,



**ज्यासि अपंगिता नाहीं। त्यासि धरी जो हृदयीं।।**
**दया करणें जे पुत्रासी। तेचि दासा आणि दासी।।**
**तुका म्हणे सांगू किती। त्याची भगवंताच्या मूर्ती।।**

चालत्या-बोलत्या जीवाला लाथाडून दगडा-धोंड्याची पूजा, सेवा केल्याने भगवंताची प्राप्ती होत नाही. कारण भगवंत हा केवळ दगडा-धोंड्यात नसून तो प्राणीमात्रात आहे. प्राणीमात्रात पाहून झाल्यास जळी स्थळी पहायला हवे. त्यामुळे ज्या जीवाला मदतीची, दयेची, प्रेमाची गरज आहे, त्या जीवात कसलाही भेद न करता नि:स्वार्थपणे त्याची ती गरज पूर्ण करण्यातच खरा आनंद आहे. अशा पध्दतीने वागणारा माणूसच खरा संत, साधू, देव आहे. यावरून आपल्या लक्षात येते की, आपणही चालते-बोलते भगवंत होऊ शकतो. असा भगवंत होण्यासाठी आपण आपल्या घरातील सदस्यांपासून व्यवस्थित वागायला प्रारंभ करणे आवश्यक आहे. आपली मुलगी आणि सून, सासू-सासरे आणि आई-वडील, सख्खा आणि सावत्र यांच्यात भेद करता कामा नये. घरातील एखाद्याला उच्च वागणूक व एखाद्याला हीन वागणूक देऊन बाहेर ईश्वरभक्तीचा दिखावा करणे व्यर्थ असते. दारावर येणाऱ्या भुकेल्या जीवाला हाकलून घरातील मूर्तीसमोर पंच पक्वान्न ठेवणे उचित नाही. आपल्या हातून कोणत्याही जीवाचा मत्सर घडता कामा नये. प्रसंगानुरुप माघार घेण्याणे कमीपण येत नाही. माझेच खरे म्हणून वागू लागल्यास मत्सर, द्वेष, ईर्षा, अहंकार आपली भूमिका बजावू लागतात. अर्थात, यामुळे आपोआप आप-पर असा भेद निर्माण होऊ लागतो. म्हणून या सर्वांवर मात करून आपण समत्व दृष्टी जोपासायला हवी. ज्ञानोबा-तुकोबांच्या वचनावर विश्वास ठेवणारा व्यक्ती आपोआप समत्व दृष्टी जोपासतो याची आम्हास खात्री वाटते.

जय राम कृष्ण हरी।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : बुधवार,
दि. १० जून २०२६
विक्रम संवत् २०८३ ।
शके -१९४८
संवत्सर - पराभव
मास - अधिक, कृ. दशमी
ऋतु - ग्रीष्म ।
नक्षत्र- उ. भाद्रपदा (०९.२१)
योग - सौभाग्य (२८.०२)
करण - वणिज (१३.५१)
राहू काल : बुधवार
दु. १२.०० ते ०१.३०

दिनविशेष : ✲ जागतिक दृष्टी दिन.
१९६४: लाल बहादूर शास्त्री यांनी भारताचे दुसरे पंतप्रधान म्हणून सूत्रे हाती घेतली.
१९३८: भारताचे ख्यातनाम उद्योगपती राहुल बजाज यांचा जन्म.
१९५५: भारताचे सुप्रसिद्ध बॅडमिंटनपटू आणि पद्मश्री विजेते प्रकाश पदुकोण यांचा जन्म.
१९९९: उस्ताद झाकीर हुसेन यांची अमेरिकेतील प्रतिष्ठाप्राप्त 'नॅशनल हेरिटेज' गौरववृत्तीसाठी निवड झाली.

# मोहरम उत्सव शांततेत व सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा करा

## कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सर्व घटकांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे : पोलिस आयुक्त एम. राजकुमार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

आगामी मोहरम उत्सवाच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस आयुक्तालयात आज सोमवार रोजी शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती.

पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त कारंजे, पोलिस उपायुक्त वृष्ठी जैन, डॉ. अश्विनी पाटील, प्रीतम यावलकर, आरटीओ अधिकारी आसिफ मुलाणी, अग्निशामक अधिकारी रावसाहेब सलगर शांतता समिती सदस्य, महानगरपालिका अधिकारी, शहर काझी, मुस्लिम धर्मगुरू, मौलाना उपस्थित होते.

यावेळी पोलीस आयुक्तांनी मोहरमच्या दोन्ही समितया बरखास्त असून त्यांना वर्गणी गोळा करण्याचा कोणताही अधिकार नाही. याबाबतचे पत्र वक्फ बोर्ड कार्यालयाकडून प्राप्त झाले असून हे पत्र दोन्ही कमिट्यांना दिले जाणार असल्याचे सांगितले . शिवाय मोहरम सण शांततेत साजरा करावा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले. आयुक्त पुढे म्हणाले, कोणत्याही धार्मिक स्थळी आक्षेपार्ह भाष्य किंवा वक्तव्य केले जाणार नाही, याची संबंधितांनी काळजी घ्यावी. पंजे व सवारीच्या संरक्षणासाठी संयोजकांनी आपापले स्वयंसेवक नेमावेत आणि मोकाट जनावरांपासून त्यांना धोका होणार नाही, याची खबरदारी घ्यावी. विनापरवाना कोणतीही मिरवणूक काढता येणार नाही.



नागरिकांनी कोणत्याही स्थितीत चुकीच्या अफवांवर विश्वास ठेवू नये आणि सामंजस्याने वागावे. सोशल मीडियाद्वारे कोणत्याही प्रकारचे आक्षेपार्ह मेसेजेस, फोटो किंवा व्हिडिओ फॉरवर्ड न करता ते त्वरित डिलिट करावेत आणि जातीय सलोखा अबाधित राखावा. शिवाय, वक्फ बोर्ड कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार, सध्या कार्यरत असलेल्या दोन्ही मोहरम समित्यांना वर्गणी जमा करण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही.

या बैठकीत उपस्थित शांतता समिती सदस्य व इतरांनी आपल्या समस्या आणि सूचना मांडल्या, ज्यावर उपस्थित महानगरपालिका अधिकाऱ्यांनी कामाची रूपरेषा पाहून समस्या सोडविण्याचे आश्वासन दिले.


> मोहरम मिरवणुकीदरम्यान विनापरवाना मिरवणूक काढू नये, मिरवणूक मार्गावरील धार्मिक स्थळांचा आदर राखावा, कोणत्याही धार्मिक स्थळासमोर आक्षेपार्ह कृत्य किंवा नाच-गाणी करू नयेत, तसेच सोशल मीडियावर अफवा, आक्षेपार्ह संदेश, फोटो अथवा व्हिडिओ प्रसारित करू नयेत, असे आवाहन करण्यात आले. संशयास्पद अथवा अनुचित घटना निदर्शनास आल्यास तात्काळ स्थानिक पोलिस ठाणे किंवा नियंत्रण कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

## २२ लोकसंचलित साधन केंद्रामार्फत पर्यावरण दिन साजरा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), सोलापूर अंतर्गत कार्यरत २२ लोकसंचलित साधन केंद्रांमार्फत जागतिक पर्यावरण दिनानिमित्त संपूर्ण जिल्ह्यात विविध पर्यावरणपूरक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. माविमच्या व्यवस्थापकीय संचालक राजलक्ष्मी शहा यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण, हवामान बदल विषयक मार्गदर्शन, प्लास्टिकमुक्त गाव अभियान, स्वच्छता अभियान, सेंद्रिय शेती, पोषण परसबाग, पर्यावरण जनजागृती व वृक्षसंवर्धन अशा उपक्रमांद्वारे व्यापक जनजागृती करण्यात आली. दक्षिण सोलापूर, अक्कलकोट, पंढरपूर, मोहोळ व माळशिरस तालुक्यातील साधन केंद्रांनी ग्रामपंचायत, वन विभाग, शाळा-कॉलेज व सामाजिक संस्थांच्या सहकार्याने शेकडो महिलांच्या सहभागातून शेकडो वृक्षांची लागवड केली. काही ठिकाणी १०१ पेक्षा अधिक वृक्षारोपण, रोपे व बियाणे किट वाटप तसेच झाडे लावा - झाडे जगवा हा संदेश देत झाडांचे संगोपन करण्याचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमात जिल्हा सम न्वय अधिकारी मन्सुर पटेल, सहा. जिल्हा समन्वय अधिकारी दीपक टेकाळे यांनी सहभाग नोंदविला.



## नांदेडचे ग्रामीण टेक्निकल अँड मॅनेजमेंट कॅम्पस प्रथम; पुण्याचे विश्वकर्मा द्वितीय, डी.वाय. पाटील तृतीय

### ए.जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय हॅकाथॉन स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

राष्ट्रीय हॅकाथॉन स्पर्धेत ग्रामीण टेकनिकल अँड मॅनेजमेण्ट कॅम्पस विष्णुपुरी नांदेड प्रथम क्रमांक पटकाविला. विश्वकर्मा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी पुणे आणि डी.वाय.पाटील कॉलेज लोहगाव पुणे यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय स्थान मिळविले.

ए.जी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी येथे दोन दिवसीय राष्ट्रीयस्तरावरील २.० या हॅकाथॉन स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत देशभरातील विविध महाविद्यालयांमधून ९५ हून अधिक टीम्सनी सहभाग घेतला.

यामध्ये प्रामुख्याने, सायबर सुरक्षा, कृषी, आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील समस्यांवर नाविन्यपूर्ण डिजिटल सोल्यूशन्स सादर केली गेली.

यामध्ये विद्यार्थ्यांनी सतत २४ तास प्रॉब्लेम स्टेटमेंट्स वर काम केले. ही स्पर्धा दोन टप्प्यात घेण्यात आली. पहिल्या फेरीत देशभरातून सुमारे ९५ संघांनी सहभाग नोंदवला त्यात प्रामुख्याने दिल्ली, हैद्राबाद, तामिळनाडू,कर्नाटक, महाराष्ट्र यांचा समावेश होता.दुसऱ्या फेरीसाठी ३० संघांची निवड करण्यात आली.

याचे उदघाटन संस्थेचे अध्यक्ष एस.ए. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य डॉ.व्ही.व्ही. पोतदार व कॅम्पस डायरेक्टर डॉ. एम. ए. चौगुले यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांनी विद्यार्थ्यांना स्टार्टअप संस्कृतीचा स्वीकार करून नवउद्योजक होण्यासाठी प्रेरणा दिली.

कार्यक्रमाचे आयोजन संगणक विभागातील कोड क्लब अंतर्गत करण्यात आले होते. मुख्य समन्वयक प्रा. एस. व्ही कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. प्रा.एम.एन. देशमुख व प्रा.ए.बी. हळ्ळे यांनी को-ऑर्डीनेटर म्हणून काम पाहिले. स्पर्धेचे परीक्षण डॉ. उदय बळगार, डॉ. सुजाता तेरढाळ यांनी केले.

## रस्त्यावरील अतिक्रमित पत्रा शेड, आजोरा काढण्याची मागणी

### अन्यथा महापालिका आवारात आत्मदहन करण्याचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

जुना विडी घरकुल येथील सहस्रार्जुन मार्कंडेय गृहनिर्माण संस्था, हैदराबाद रोड येथे रस्त्यावरच अतिक्रमण करून पत्रा शेड आणि आजोरा टाकण्यात आला आहे. ते हटवून रस्ता मोकळा करावा अन्यथा महापालिका आवारात आत्मदहन करण्याचा इशारा संजीव मिठ्ठा यांनी पत्रकार परिषदेत दिला आहे.

जुना विडी घरकुल येथील सहस्रार्जुन मार्कंडेय गृहनिर्माण संस्था येथे रहदारीच्या रस्त्यावर अतिक्रमण करून पत्रा शेड मारण्यात आले आहे. या ठिकाणी आजोरा टाकण्यात आला आहे. यामुळे या नगरातील लोकांना रस्त्यावरून ये-जा करणे अडचणीचे ठरत आहे. महापालिका प्रशासनाकडे अनेक वेळा तक्रार अर्ज, निवेदन दिले मात्र कार्यवाही झाली नाही.

चार गृहनिर्माण संस्थांचा येण्या-जाण्याचा रस्ता हाच आहे. यापूर्वी येथील अतिक्रमित रूम पाडली मात्र इतर एक पत्रा शेड आणि आजोरा जैसे थे ठेवण्यात आला आहे. त्यामुळे अनेक अडचणींना येथील नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे तातडीने हा रस्ता पूर्णपणे अतिक्रमण मुक्त करून वाहतुकीसाठी मोकळा करावा, अशी मागणी संजीव मिठ्ठा यांनी केली आहे. या पत्रकार परिषदेस अँड. राजेंद्र चव्हाण उपस्थित होते.



## अरकाल आंध्र भद्रावती मराठी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जन्याराम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

पूर्व विभागातील कै. आशया इरया अरकाल आंध्र भद्रावती म राठी विद्यालयाचे मुख्याध्यापिका म्हणून भाग्यलक्ष्मी जन्याराम यांची निवड झाली आहे. यावेळी शाळेतर्फे त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी संस्थेचे सचिव वेंकटेश दुडम, मुख्याध्यापक दिलीप चव्हाण मोर्डे, सहशिक्षिका चौगुले, श्री लोखंडे, श्री कांबळे व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

मुख्याध्यापिका जन्याराम म्हणाल्या, या शाळेत आजुबाजूच्या झोपडपट्टीतील गोरगरीब विद्यार्थी शिकायला येतात त्यांना घडवण जिकिरीचं आहे. या शाळेतून शिकून अनेक विद्यार्थी उच्च शिक्षित, सरकारी व खाजगी कंपनीत मोठ्या हुद्द्यावर कार्यरत आहेत.





## कायदा सोबती कार्यशाळेत जिल्ह्यातील कार्यकर्त्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**

भटके-विमुक्त आणि आदिवासी समाजामध्ये कायद्याविषयी जागरूकता निर्माण करून तळागाळात कायदेशीर नेतृत्व विकसित करण्याच्या उद्देशाने पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या भारतातील पहिल्या कायदा सोबती नेतृत्व विकास प्रशिक्षण कार्यशाळेत सोलापूर जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

५ ते ८ जून दरम्यान पुण्यातील कोथरूड येथील आयआयईजेपी नाईक सेंटर येथे झालेल्या या चार दिवसीय निवासी कार्यशाळेचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पुणे, कोरो इंडिया, भटके-विमुक्त आदिवासी संयोजन समिती (महाराष्ट्र राज्य) आणि एस.एम.एस.सी. फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. महाराष्ट्रातील अकोला, अमरावती, ठाणे, नांदेड, नागपूर, नाशिक, परभणी, पालघर, बीड, मुंबई उपनगर, यवतमाळ, लातूर, वाशिम, सांगली, सोलापूर आणि पुणे जिल्ह्यांतील कार्यकर्ते या प्रशिक्षणात सहभागी झाले होते. सोलापूर जिल्ह्यातून भटके विमुक्त आदिवासी संयोजन समितीचे यशवंत फडतरे, अंधरुढी संस्थेच्या वैशाली बनसोडे, लोक वंचित संस्थेचे अशोक कांबळे एसएम एससी फाउंडेशनचे अशोक मरिआईवाले, सोलापूर महिला संस्थेच्या योजना कामतकर यांनी सहभाग नोंदविला.

भटके-विमुक्त आणि आदिवासी समाजातील सामान्य नागरिकांना माहिती अधिकार, मानवाधिकार, लोकसेवा हमी कायदा, विधी सेवा प्राधिकरण कायदा आणि इतर महत्वाच्या कायद्यांचे ज्ञान मिळावे, तसेच प्रत्येक गाव, तांडा आणि वस्तीमध्ये कायदेविषयक मार्गदर्शन करणारे स्थानिक नेतृत्व तयार व्हावे या उद्देशाने कायदा सोबती ही संकल्पना मनीष देशपांडे यांनी मांडली.

कार्यशाळेत माहिती अधिकार क्षेत्रातील अभ्यासक विवेक वेलणकर, मानवाधिकार कायदेतज्ञ अँड. असीम सरोदे, निवृत्त अप्पर जिल्हाधिकारी प्रल्हाद कचरे आणि जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सरकारी वकील तेजल बडवे यांनी मार्गदर्शन केले. माहिती अधिकार कायदा, मानवाधिकार, दप्तर दिरंगाई कायदा, महाराष्ट्र लोकसेवा हमी कायदा, मोफत कायदेशीर मदत, पुरावे संकलन, तक्रार प्रक्रिया आणि न्यायप्रवेश याविषयी सहभागींचे प्रत्यक्ष प्रशिक्षण घेण्यात आले. कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी भटके-विमुक्त आदिवासी संयोजन समितीच्या कार्याचा आढावा मुमताज शेख यांनी सादर केला.

सूत्रसंचालन आप्पाराव राठोड यांनी केले. कार्यशाळेचे डॉक्युमेंटेशन आणि व्हिडिओ चित्रीकरण शरद बारावे यांनी केले. समारोप प्रसंगी ग्रामीण विकास केंद्राच्या उमा जाधव, एसएमएससी फाउंडेशनचे डायरेक्टर अँड. तृणाल टोणपे आणि प्रोग्राम मॅनेजर निकिता आनंद यांच्या हस्ते प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

प्रशिक्षणानंतर सोलापूर जिल्हातील सहभागी आता कायदा सोबती प्रशिक्षक म्हणून जिल्हा, तालुका, तांडा आणि वस्ती स्तरावर माहिती अधिकार, मानवाधिकार, लोकसेवा हमी कायदा, दप्तर दिरंगाई कायदा आणि विधी सेवा प्राधिकरण कायद्याबाबत प्रशिक्षण व जनजागृती करणार आहेत. त्यामुळे भटके-विमुक्त, आदिवासी आणि वंचित समाजातील नागरिकांना त्यांच्या हक्कांबाबत जागरूक करून न्यायप्रवेश अधिक सुलभ करण्यासाठी मदत होणार आहे.

## तळभंडारे फाउंडेशनतर्फे वृक्ष संवर्धन मोहिमेचा शुभारंभ

**सोलापूर, दि. ९ जून-**

जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून तळभंडारे फाउंडेशनतर्फे हिप्परगा तलाव परिसरात देशी झाडांचे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. आजचा एकच दिवस वृक्षारोपण न करता येथून पुढे महिनाभर वृक्षारोपण, वृक्ष संवर्धनाची मोठी चळवळ उभी केली जाणार असल्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.

यावेळी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.सिध्दार्थ तळभंडारे, नागेश तळभंडारे, डॉ.पुष्पांजली इंगळे, मंदाकिनी तळभंडारे, डॉ.सचिन इंगळे, प्रशांत सोनवणे उपस्थित होते.

## यू डायसच्या पटसंख्येनुसार पुस्तके दाखल

### १० ते १२ जूनला चंडक प्रशालेत वितरणाचे नियोजन

### उत्तर तालुकास्तरावरून केंद्रस्तरापर्यंत वितरणाची जबाबदारी निश्चित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२६-२७ च्या सुरुवातीलाच मोफत पाठ्यपुस्तके उपलब्ध व्हावीत यासाठी पंचायत समिती शिक्षण विभागाने व्यापक आणि सूक्ष्म नियोजन केले आहे. तालुक्यात प्राप्त झालेली इयत्ता पहिली ते आठवीची मोफत पाठ्यपुस्तके केंद्रस्तरावर वेळेत पोहोचवून शाळेच्या पहिल्या दिवशीच विद्यार्थ्यांच्या हाती देण्याचे उद्दिष्ट प्रशासनाने निश्चित केले आहे.

गटशिक्षणाधिकारी अविचल महाडिक यांनी याबाबत आदेश जारी करत विषय साधनव्यक्ती, विशेष शिक्षक आणि संबंधित केंद्रप्रमुखांना वितरण प्रक्रियेत सक्रिय सहभाग घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. बालभारती, पुणे यांच्याकडून प्राप्त झालेल्या पाठ्यपुस्तकांचा यू डायस वरील पटसंख्येनुसार ताळमेळ घालून वितरण केले जाणार आहे. ज. रा. चंडक प्रशाला, बाळे येथे १० ते १२ जून दरम्यान केंद्रनिहाय वेळापत्रक आखण्यात आले असून प्रत्येक केंद्राने आवश्यक मनुष्यबळ आणि वाहनासह उपस्थित राहून पुस्तके स्वीकारायची आहेत. त्यानंतर केंद्रस्तरावरून शाळांना तात्काळ वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.



पाठ्यपुस्तक वितरण प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये, म्हणून इयत्तानिहाय जबाबदाऱ्या विषय साधनव्यक्ती व विशेष शिक्षकांमध्ये वाटण्यात आल्या आहेत. पुस्तकांची मोजणी, वर्गीकरण, वितरण तक्ते तयार करणे, बिलांची पूर्तता, केंद्रनिहाय वाटप, अहवाल सादरीकरण तसेच कमी-जादा पुस्तकांचे समायोजन यासाठी स्वतंत्र कार्यविभाजन करण्यात आले आहे.विशेष म्हणजे, विद्यार्थी लाभाच्या या महत्वाच्या योजनेत कोणताही हलगर्जीपणा होऊ नये यासाठी संबंधित कर्मचाऱ्यांना वितरण कालावधीत विनापरवानगी गैरहजर राहू नये, तसेच तक्रारींना वाव मिळणार नाही याची दक्षता घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी विद्यार्थ्यांना वेळेत पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी उत्तर सोलापूर शिक्षण विभागाने केलेले हे नियोजन शिक्षण व्यवस्थेतील सुयोग्य प्रशासनाचे उदाहरण मानले जात आहे. यामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पाया पहिल्याच दिवसापासून भक्कम होण्यास मदत होणार आहे.

## महत्वाचे...

### झिंजेवस्ती येथील वर्षाराणी जाधवची मुंबई शहर पोलिसपदी निवड



**पिलीव, दि. ९ जून-**
माळशिरस तालुक्यातील झिंजेवस्ती येथील वर्षाराणी धनाजी जाधव हिची नुकतीच मुंबई शहर पोलीसपदी निवड झाली आहे. तिच्या या निवडीबद्दल झिंजेवस्ती, पिलीव परीसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून तिचे अभिनंदन होत आहे.

### राज्य ज्ञानदीप प्रज्ञाशोध परीक्षेची प्रवेश प्रक्रिया १५ जूनपासून : प्रा. डॉ. आडसूळ

**सोलापूर, दि. ९ जून-**
महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त, भारत सरकार आय.एस. ओ.मानांकन प्राप्त राज्यस्तरीय ज्ञानदीप प्रज्ञाशोध परीक्षा महाराष्ट्र राज्य १५ जून पासून पूर्ण राज्यभरामध्ये प्रवेश प्रक्रियेला सुरुवात होत असून सर्व विद्यार्थ्यांनी वेळेत प्रवेश घ्यावा असे आव्हान राज्यस्तरीय ज्ञानदीप प्रज्ञाशोध परीक्षा मुख्य प्रवर्तक, सदस्य पुणे बोर्ड, सदस्य मंत्रालय समन्वय समिती मुंबई, प्रदेशाध्यक्ष एकनाथ स्वाभिमानी शिक्षक सेना महाराष्ट्र राज्य, संस्थापक चेअरमन स्वाभिमानी शिक्षक व कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित सोलापूर प्रा.डॉ बापूसाहेब आडसुळ यांनी केले आहे. परीक्षेसाठी राज्यातून दोन ते तीन लाख विद्यार्थी परीक्षेला बसतील, ही परीक्षा इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी असेल विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार परीक्षा केंद्र असतील, सदर प्रज्ञाशोध परीक्षेसाठी तज्ञ व अनुभवी शिक्षक वर्ग पूर्ण राज्यभरामध्ये कार्यरत आहेत. राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्या हस्ते सदर पुस्तिकेचे प्रकाशन होऊन प्रवेश प्रक्रिया सुरू होईल अशी माहिती राज्यस्तरीय ज्ञानदीप प्रज्ञाशोध परीक्षेचे मुख्य प्रवर्तक प्रा डॉ बापूसाहेब आडसुळ यांनी दिली आहे.



प्रा.डॉ बापूसाहेब आडसुळ

### सोलापूरच्या ऋत्विज चव्हाण यांना राज्यस्तरीय सह्याद्री कलारत्न पुरस्कार



**सोलापूर, दि. ९ जून-**
विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तींचा नालंदा फाउंडेशन यांचा प्रतिष्ठेचा सह्याद्री रत्न पुरस्कार यावेळी ऋत्विज चव्हाण यांना जाहीर झाला आहे. चित्रकला आणि लेखन याच्यातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल त्यांची निवड झाली. हा कार्यक्रम श्रमिक पत्रकार भवन पुणे येथे पार पडणार आहे. अमूर्त शैलीची चित्रकला तसेच उत्स्फूर्त लेखनासाठी त्यांना कलारत्न पुरस्काराने प्रदान करून सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी विविध क्षेत्राम ध्ये काम करणाऱ्यांना प्रमाणपत्र, सन्मानचिन्ह आणि मेडल देऊन सन्मान करण्यात येणार आहे. विविध क्षेत्रांमधून प्रस्तावना मागून त्यातून उल्लेखनीय काम करणाऱ्यांना हा प्रतिष्ठेचा पुरस्कार देण्यात येईल असे जाहीर करण्यात आले. सामाजिक आणि कला क्षेत्रातील चित्रकला आणि लेखन कार्याचा आढावा घेऊन हा पुरस्कार देण्यात येतो. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, सुनील नाना गोडबोले, सुप्रसिद्ध सिनेअभिनेते नितीन धवणे पाटील, राष्ट्रीय अध्यक्ष मराठी चित्रपट असोसिएशन प्रदेश उपाध्यक्ष राज्याची चित्रपट व सांस्कृतिक विभाग संचालक सॉलिटयुड हॉलिडे, प्रा. डॉ. संदीप सांगळे अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आर्या घारे देऊळ बंद मराठी चित्रपटातील छोटीशी चिमुकली (अभिनेत्री) यांची उपस्थिती असणार आहे.

### पीपीओमध्ये पत्नीचे नाव नमूद नसलेल्या माजी सैनिकांनी १६ जून रोजी उपस्थित राहावे

**सोलापूर दि. ९ जून-**
जिल्ह्यात जे माजी सैनिक दि. ०१ जानेवारी १९८६ पूर्वी सेवानिवृत्त झाले आहेत व त्यांच्या पत्नीचे नाव पीपीओमध्ये नमूद नसल्यास त्यांनी पत्नीचे नाव पीपीओमध्ये समाविष्ट करून घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह दि. १६ जून २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे उपस्थित राहावे. असे आवाहन करण्यात येत आहे.त्यासाठी खालील कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे. डिस्चार्ज बुक व पीपीओची प्रत, पत्नीचे आधार कार्ड व पॅन कार्ड प्रत, माजी सैनिक ओळखपत्र. माजी सैनिकांनी सदर प्रक्रिया वेळेत पूर्ण न केल्यास त्यांच्या पश्चात पत्नीला कुटुंब निवृत्ती वेतन मिळण्यास अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे सर्व संबंधित माजी सैनिकांनी आवश्यक कागदपत्रांसह दिलेल्या दिनांक व वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

### १५ जूनपासून पशुपालनावर आधारित दोन दिवसीय कार्यशाळा

**सोलापूर, दि. ९ जून-**
अभिनव उद्योजकता कौशल्य विकास प्रशिक्षण व बहुउद्देशीय संस्था सोलापूर यांच्या मार्फत सोलापूर येथे दि. १५ जूनपासून दोन दिवसीय शेतीपूरक उद्योग व्यवसायाच्या वाढीसाठी पशुपालनावर आधारित कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन दिवसीय कार्यशाळेत शेतीपूरक उद्योगावर आधारित शेळीपालन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुटपालन तसेच इतर शेतीपूरक उद्योगांवरील संधी याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. शेळ्यांची निवड, आजार उपचार, व्यवस्थापन,लसीकरण, चारा साठवण, पद्धत गोठा बांधणे इ. कोंबड्यांची निवड, कोंबड्यांच्या इतर जाती, आजार, लसीकरण, बाजारपेठ, दुग्ध व्यवसायामध्ये गायीची निवड, उत्पादन वाढीसाठी घ्यायची काळजी तसेच विमा, विक्री कौशल्य, उद्योजकीय व्यक्तिमत्व,सुसंवादाचे कौशल्य, प्रकल्प अहवाल, शासनाच्या विविध कर्ज योजना व अनुदान विषयक माहिती शासनाच्या सवलती इत्यादी विषयांवर मार्गदर्शन तज्ञानमार्फत करण्यात येणार आहे. कार्यशाळेस शिक्षणा आठवी पास, वयोमर्यादा जास्तीत जास्त ५० वर्षापर्यंत आहे तसेच कार्यशाळा पूर्ण करणाऱ्यास प्रमाणपत्र मिळेल. अधिक माहिती व प्रवेशासाठी ८२६३००८९१३ या क्रमांकावर संपर्क साधावा. शहरातील व परिसरातील सुशिक्षित बेरोजगार युवक युवतीने याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या अध्यक्षा मीनल दास यांनी केले.

# उत्तर सोलापूरसाठी नवीन डीपी, अखंडित वीजपुरवठा करा

**जिल्हा परिषद उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांची महावितरणकडे मागणी**

**शेतकऱ्यांच्या वीज प्रश्नांवर महावितरणकडून सकारात्मक आश्वासन**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**
उत्तर सोलापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या वीज समस्यांच्या निराकरणासाठी जिल्हा परिषद उपाध्यक्ष तथा अर्थ व बांधकाम सभापती इंद्रजीत पवार यांनी महावितरणच्या सोलापूर ग्रामीण विभागाचे कार्यकारी अभियंता मनीषकुमार सूर्यवंशी यांची भेट घेऊन विविध प्रलंबित प्रश्नांबाबत सविस्तर चर्चा केली. शेतकऱ्यांना अखंडित व दर्जेदार वीजपुरवठा मिळावा, यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

उत्तर सोलापूर तालुक्यातील अनेक वाडी-वस्त्यांवरील सिंगल फेज वीजपुरवठा बंद असल्याने नागरिकांना तसेच शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. याशिवाय अनेक गावांमध्ये अपुऱ्या क्षमतेच्या डीपीमुळे कमी दाबाने वीजपुरवठा होत असून वारंवार खंडित होणाऱ्या विजेमुळे शेतीपिकांचे नुकसान होत आहे. या पार्श्वभूमीवर पवार यांनी महावितरण प्रशासनासमोर विविध मागण्या मांडल्या. यामध्ये बंद असलेला सिंगल फेज वीजपुरवठा तात्काळ सुरू करणे, प्रत्येक गावाच्या गरजेनुसार नवीन वितरण रोहित्रे (डीपी) उपलब्ध करून देणे, वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करणे तसेच आवश्यक ठिकाणी १०० केव्ही क्षमतेच्या नवीन डीपी मंजूर करून बसविण्याची मागणी करण्यात आली. कार्यकारी अभियंता सूर्यवंशी यांनी संबंधित सर्व मागण्यांची सकारात्मक दखल घेत



प्राधान्याने आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. यावेळी भाजपा ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, उत्तर सोलापूर युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष अमोल सुतार, गुळवंचीचे सरपंच सुनील जाधव, अरुण बारसकर, श्याम शिंदे, अमोल बोराडे, अझर शेख, माजी सरपंच दत्ता पवार, प्रवीण लबडे, पिंटू कापसे उपस्थित होते.

शेतकऱ्यांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करणार असून, वीजपुरवठा सक्षम करण्यासाठी आवश्यक त्या सर्व स्तरांवर प्रयत्न सुरू राहतील, अशी भूमिका इंद्रजीत पवार यांनी यावेळी व्यक्त केली.

**या मागण्यांवर झाली चर्चा**
उत्तर सोलापूरच्या वीज समस्यांवर भर
- वाडी-वस्त्यांवरील बंद सिंगल फेज वीजपुरवठा सुरू करण्याची मागणी
- प्रत्येक गावासाठी नवीन डीपी उपलब्ध करण्याचा आग्रह
- वारंवार खंडित होणाऱ्या विजेचा प्रश्न मार्गी लावण्यावर भर
- आवश्यक ठिकाणी १०० केव्ही क्षमतेच्या डीपी मंजुरीची मागणी

# शेतकऱ्यांनी सूक्ष्म सिंचन योजनेसाठी अर्ज करावेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**
सन २०२६-२७ या वर्षासाठी राष्ट्रीय कृषि विकास योजनेअंतर्गत "प्रति थेंब अधिक पीक (सूक्ष्म सिंचन)" योजनेसाठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील लाभार्थी शेतकऱ्यांसाठी १.५५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करण्यात आला असून पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात येत आहे

या योजनेंतर्गत प्रचलित आर्थिक मापदंडाच्या अथवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के मर्यादेत, यापैकी जे कमी असेल त्या प्रमाणात अनुदान देण्यात येणार आहे.

लाभासाठी पात्र शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करून अर्ज सादर करावेत.अर्ज भरण्यासाठी शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करणे आवश्यक आहे. अर्ज सादर करताना माहिती अचूक भरावी, अन्यथा अर्ज रद्द होण्याची शक्यता आहे.

अर्जासोबत ॲग्रीस्टॅक फार्मर आयडी, आधार कार्ड, बँक पासबुक व जातीचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.

या योजनेचा लाभ कमाल ५ हेक्टर क्षेत्रापर्यंत देण्यात येणार आहे. पोर्टलवर "प्रथम अर्ज करणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्त्वानुसार अर्ज स्वीकारले जाणार असून अर्जांची संगणकीय सोडत काढण्यात येईल. निवड झाल्यानंतर लाभार्थी शेतकऱ्यांना लघुसंदेशाद्वारे माहिती देण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी सहाय्यक कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी, मंडल कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी अथवा सामूहिक सेवा केंद्राशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी केले आहे.

# दाखले देण्यासाठी माढा तहसील सर्कलकडून पैशाची मागणी

**विद्यार्थी व पालकाची लूट; भ्रष्ट अधिकारी व दलालावर कारवाई करण्याची मागणी**



**तभा वृत्तसेवा**
**माढा, दि. ९ जून-**
जून महिन्यापासून सगळीकडे शैक्षणिक वर्षाला सुरुवात होते त्यासाठी विद्यार्थ्यांना उत्पन्नाचे दाखले डोमेसेल सर्टिफिकेट व जातीच्या प्रमाणपत्राची आवश्यकता असते ही कागदपत्रे मिळवण्यासाठी विद्यार्थी व पालक माढा तहसील कार्यालयात येतात. परंतु या बाबी मिळवण्यासाठी त्यांची आर्थिक लूट होत असल्याचे कळते. त्यामुळे माढा तहसीलदार संजय भोसले यांना सामाजिक कार्यकर्ते शंभू साठे यांनी या बाबी रोखण्यासाठी व संबंधित अधिकारी व दलालांवर कारवाई करण्यासाठी मंगळवारी निवेदन दिले. यावेळी शंभू साठे, शरद वारगड, संदीप साठे, राजू शर्मा, संजय आवारे, विजय चवरे,गौतम शिंदे व इतर नागरिक उपस्थित होते.

या निवेदनात असे म्हटले आहे की विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी लागणारे दाखले देताना माढा तहसील ऑफिसमध्ये खुलेआम भ्रष्टाचार होत आहे. तसेच चालू वर्षी शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाल्याने शालेय प्रवेश घेण्याकरिता विद्यार्थ्यांना उत्पन्न दाखला, जात प्रमाणपत्र, डोमासाईल सर्टिफिकेट अशी अनेक कागदपत्रे महसूल विभागातून घ्यावी लागतात. सदरचे दाखले काढण्याकरिता विद्यार्थ्यांना माढा तहसिल कार्यालयात यावे लागते. परंतु सदर ठिकाणी शासकीय सेतु सुविधा असताना व तेथे माफक दरात शासनाने ठरवून दिलेल्या किमतीत दाखले देण्याचे काम करणे अपेक्षीत असताना माढा तहसिल कार्यालयाच्या आवारामध्ये दलालांचा प्रचंड मोठा सुळसुळाट झाला आहे. सदर दलाल हे विद्यार्थ्यांना व त्यांचे पालकांना गळ घालून त्यांचेकडून विविध मार्गातून अनावश्यक मोठ्या प्रमाणात पैसे घेऊन दाखले देण्याचे काम करतात. तसेच तहसील कार्यालयातील सर्कल अधिकारी हे दलालामार्फत पैशांची मागणी करतात.

यामध्ये शासकीय यंत्रणाचाही सहभाग असल्याचे दिसून येत आहे. या सर्व प्रकारामुळे जनतेची आर्थिक लुट होत आहे. या कारणामुळे विद्यार्थ्यांना व जनतेस नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे दलाल व शासकीय अधिकाऱ्यांकडून होणारी लूट तात्काळ थांबवून भ्रष्ट कारभाराची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी. अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल.

**चौकशी करून कारवाई करू**
माफक दरात शासनाने ठरवून दिलेल्या किमतीत दाखले देण्याचे काम करणे अपेक्षीत असताना जादा पैसे घेण्याच्या तक्रारी संदर्भात निवेदन प्राप्त झाले असून या निवेदन केलेल्या आरोपाची चौकशी करून दोषी आढळल्यास योग्य कारवाई करू.
**-संजय भोसले, तहसीलदार माढा**



# ऑर्किड स्कूलमध्ये रंगला चिमुकल्यांचा प्रवेशोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ९ जून-**
सोलापुरातील शैक्षणिक वतुळात वेगळा ठसा उम टविलेल्या नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये ९ जून विद्यारंभ दिन संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी, सचिवा सौ. वर्षा विभूते, विश्वस्त यशराज करजगी, व्यवस्थापक श्री. अक्षय चिडगुंपी, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे, प्राचार्या रुपाली हजारे उपस्थित होते.

सर्वप्रथम विद्यार्थ्यांचे स्वागत गुलाबपुष्प देऊन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करून कै. नागेश करजगी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आले. उन्हाळ्याच्या प्रदीर्घ सुट्टीनंतर शाळेची पहिली घंटा वाजली. प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर नवा डबा, नवे दप्तर, वह्या, पुस्तकांची नवलाई असताना आपल्या मित्रमंडळींना भेटण्याची उत्सुकता होती तर दुसरीकडे पूर्व प्राथमिक विभागातील चिमुरड्यांनी पहिल्यांदाच पालकांसमवेत शाळेत पहिले पाऊल टाकले. शाळेचा परिसर विद्यार्थ्यांच्या किलबिलाटाने गजबजून गेला होता. शाळेचा पहिला दिवस अविस्मरणीय करण्याच्या दृष्टीने शाळेने जय्यत तयारी केली होती. संस्थेचे अध्यक्ष डॉ. कुमार करजगी यांनी आपल्या भाषणातून उपस्थित विद्यार्थ्यांना व पालकांना मार्गदर्शन केले व शैक्षणिक वर्षाकरिता शुभेच्छाही दिल्या. प्राचार्या रुपाली हजारे यांनी सर्व विद्यार्थी व पालकांचे स्वागत केले. सूत्रसंचालन शिक्षिका निकिता येलमेळी यांनी केले.

# महात्मा बसवेश्वर जयंतीनिमित्त गुणवंतांचा सन्मान

**विविध उपक्रमांनी जयंतीची सांगता**



**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. ९ जून-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील वीरशैव लिंगायत समाज संघटनेच्या वतीने महात्मा बसवेश्वर यांची जयंती विविध उपक्रम राबवून पिलीव येथील खंडोबा मंदिरात साजरी करण्यात आली.

प्रारंभी श्री ष..ब्र १०८ प्रभूदेव. शिवाचार्य माढेकर महाराज यांचे आशीर्वचन झाल्यानंतर महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन श्री ष.ब्र.१०८ प्रभूदेव शिवाचार्य माढेकर महाराज व आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी श्री ष.ब्र. १०८ प्रभूदेव शिवाचार्य माढेकर महाराज आमदार विजयकुमार देशमुख, प्रमुख वक्ते सुहास उरवणे, संकेत देशमुख, शिवम घोंगडे, संतोष देशमुख, ओंकार देशमुख, श्रीकांत आर्वे, शिवम राजमाने, सोहन घसाडे, सुजित खलीपे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान म न्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्ते सुहास उरवणे यांनी महात्मा बसवेश्वरांच्या जीवन चरित्रावरील अभ्यासपूर्ण मांडणी व त्यांनी दिलेल्या शिकवणीचे वचनांचे केलेल्या धर्माच्या स्थापनेविषयी माहिती वेगवेगळ्या प्रकारची घडलेल्या प्रसंगाची उदाहरणे देऊन लोकांच्या ज्ञानात भर घातली. अध्यक्ष संकेत देशमुख यांनी प्रास्ताविक केले. शिवम घोंगडे यांनी आभार म नले.

**म.बसवेश्वरांच्या समानतेचा, समतेचा आदर्श आचरणात आणा**
आ. विजयकुमार देशमुख म्हणाले, महात्मा बसवेश्वराच्या समानतेचा व समतेचा आदर्श आचरणात आणून त्यांनी दिलेल्या वचनामृताचा व वचनाचे पालन करून अभ्यास करावा महात्मा बसवेश्वर यांनी १२व्या शतकाच्या काळात अत्यंत मनापासून स्वतःपासून जातिभेद नष्ट करून बहुजन समाजाला समानतेचा संदेश देऊन स्वतःही त्या पद्धतीने आचरण केले. त्यांनी लिंगायत धर्माची स्थापना केली व लिंगायत धर्माच्या माध्यमातून सर्वसामान्य जनतेला जातीभेदापासून दूर राहून सर्व मानव जात समान असल्याचा पुनरुच्चार केला.

# साक्षी भैरामडगी बनली वळसंगची प्रतिकात्मक सरपंच

**तहसीलदार मनोज राऊत यांच्या संकल्पनेतून उपक्रम; एक दिवस सांभाळले गावचे कामकाज**

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ९ जून-**
वळसंग (ता.द.सोलापूर) येथील श्री शंकरलिंग प्रशालेतील विद्यार्थिनी कुमारी साक्षी मल्लिकार्जुन भैरामडगी हिने प्रतिकात्मक सरपंच म्हणून एक दिवस वळसंग गावचे कामकाज पाहिली.

सदरचा उपक्रम हा पंचायत समिती दक्षिण सोलापूरचे तहसीलदार आदरणीय मनोज राऊत यांच्या संकल्पनेतून व मार्गदर्शनातून तालुक्यातील नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा व शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र झालेल्या विद्यार्थ्यांना एक संधी म्हणून व आजचा विद्यार्थी उद्याचा लोकप्रतिनिधी भविष्य तुमचे आमचे समृध्द लोकशाहीचे या उद्देशाने चालू करण्यात आले. या पहिल्याच वर्षी हा मान साक्षी मल्लिकार्जुन भैरामडगी हिस मिळाले. यादिवशी सर्व प्रथम संस्था व प्रशालेतर्फे एकदिवसीय प्रतिकात्मक सरपंचपद भूषविलेली साक्षी भैरामडगी हिचा सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष श्रीशैल दुधगी, चेअरमन शिवशरण थळंगे, उपाध्यक्ष विश्वनाथ थळंगे, सदस्य प्रकाश दुधगी, मल्लिनाथ थळंगे, समेश दुधगी, ग्रामविकास अधिकारी जाधव साहेब, मुख्याध्यापक वीरेश थळंगे, पर्यवेक्षक शिवानंद घोडके, विश्वनाथ दुधगी, सिध्दाराम भैरामडगी, श्रीशैल भैरामडगी, बसवराज भैरामडगी,शंकर दुधगी, सोमनाथ भैरामडगी उपस्थित होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक वीरेश थळंगे यांनी केले. यात्प्रसंगी भैरामडगी परिवारातर्फे उपस्थित मान्यवरांचे व बाह्य परीक्षा विभाग प्रमुख बाळकृष्ण गुंड यांचा सत्कार करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, संजयकुम ार घनशेट्टी, नीलकंठ कवटगी, प्राध्यापक संतोष शिंदे, सिध्दारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, संतोष कस्तुरे, विजय प्याटी, शिवराज अष्टगी, मल्लिनाथ गौडगाव, अजय माणकोजी, विजयालक्ष्मी थळंगे, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोंडे, वरिष्ठ लिपिक राजश्री दुधगी, कनिष्ठ लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, विनोद दुधगी, कडेप्पा कोळी, सुनिता कुर्ले यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग उपप्रमुख श्रीमंत भोसले यांनी केले तर आभार बसवराज दुधगी यांनी मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सोलापूरच्या विकासासाठी १२ जूनला जिल्हा परिषदेसमोर आंदोलन

### विमानसेवा, आयटी पार्क, बससेवा, पाणीपुरवठ्यासह सहा प्रमुख मागण्यांसाठी सोलापूर विकास मंचाचा एल्गार

**सोलापूर, दि.९ जून-**
शहर व जिल्ह्याच्या रखडलेल्या विकासकामांबाबत शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सोलापूर विकास मंचाच्या वतीने १२ जून रोजी सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत जिल्हा परिषद समोर एक दिवसीय आंदोलन करण्यात येणार आहे.

सोलापूरच्या विकासासाठी अत्यावश्यक असलेल्या अनेक प्रकल्पांकडे शासनाकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप मंचाने केला आहे. विमानसेवा, आयटी पार्क, शहर परिवहन सेवा, पाणीपुरवठा आणि शैक्षणिक सुविधांबाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी आंदोलनातून करण्यात येणार आहे. सोलापूर-गोवा व सोलापूर-हैदराबाद विमानसेवा कायम ठेवण्याबरोबरच विमानतळावर नाईट लँडिंगची सुविधा उपलब्ध करून द्यावी. सोलापूरमध्ये आयटी पार्क तातडीने सुरू करून रोजगारनिर्मितीला चालना द्यावी. धर्मवीर संभाजी महाराज तलाव आणि पत्रकार भवन परिसरातील रेल्वे पुलांचे रुंदीकरण, विजापूर रोडवर सर्व्हिस रोडची उभारणी, महापालिकेची परिवहन बस सेवा पुन्हा सुरू करणे आणि शहरातील पाणीपुरवठा व्यवस्था सुधारून नागरिकांना दररोज पुरेसे पाणी उपलब्ध करून द्यावे. याशिवाय सोलापूर येथील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश प्रक्रिया तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात येणार आहे.

सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी आता केवळ आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष कृतीची गरज असल्याचे मंचाने नमूद केले आहे. विविध सामाजिक संस्था, व्यापारी, उद्योजक, विद्यार्थी, महिला आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन मंचाने केले आहे.



## महत्त्वाचे...



### यशस्वी होण्यासाठी ध्येय, जिद्द, चिकाटी आवश्यक : भाऊसाहेब रुपनर

**सांगोला, दि. ९ जून-**
जीवनात यशस्वी होण्यासाठी मोठे ध्येय, ते पूर्ण करण्याची जिद्द आणि सातत्याने प्रयत्न करण्याची चिकाटी आवश्यक आहे. याच गुणांच्या बळावर विद्यार्थी कोणत्याही क्षेत्रात यशाचे शिखर गाठू शकतात, असे प्रतिपादन संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर यांनी केले. ते फॅबटेक कॉलेज ऑफ फार्मसी, सांगोला येथे आयोजित बी.फार्मसी अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभात बोलत होते. यावेळी पुढील शिक्षण, नोकरी किंवा व्यवसाय करताना कोणतीही अडचण आली तर महाविद्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन करत संस्थेचे शिक्षक व व्यवस्थापन विद्यार्थ्यांच्या पाठीशी सदैव उभे राहतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाची सुरुवात भाऊसाहेब रूपनर, प्राचार्य डॉ.संजय बैस, डॉ.नाहीद शेख, प्रा.निदा मुल्ला यांच्या हस्ते सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगतातून फॅबटेकमध्ये घालवलेले दिवस आयुष्यभर प्रेरणा देणारे ठरतील, अशा भावना व्यक्त केल्या. डॉ.बैस, डॉ.शेख, प्रा.मुल्ला यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत मेहनत आणि समाजसेवेची जाणीव जपण्याचा संदेश दिला. सूत्रसंचालन सृष्टी घंटे यांनी केले. आभार अमृता गायकवाड यांनी मानले.

### कै. आवताडे यांच्या स्मणार्थ गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव व करिअर मार्गदर्शन

**मंगळवेढा, दि. ९ जून-**



कै. महादेवराव बाबुराव आवताडे प्रतिष्ठानच्या वतीने आमदार समाधान आवताडे यांच्या मार्गदर्शनाखाली इयत्ता १० वी व १२ वी गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा तसेच '१० वी-१२ वी नंतर पुढे काय?' या विषयावरील करिअर मार्गदर्शन कार्यक्रम रविवार, १४ जून रोजी सकाळी १०.१५ वाजता जोगेश्वरी मंगल कार्यालय, मंगळवेढा येथे आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमात प्रसिध्द व्याख्याते, कवी व कीर्तनकार अविनाश भारती हे प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. विद्यार्थी, पालक व युवकांनी या प्रेरणादायी उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

### शिवसेना सोशल मीडिया जिल्हा संपर्कप्रमुखपदी अमित पाटील

**सांगोला, दि. ९ जून-**



उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार खा. डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार तसेच सोशल मीडिया राज्यप्रमुख प्रतीक शर्मा व पश्चिम महाराष्ट्र संपर्कप्रमुख महादेव सरवदे यांच्या नेतृत्वाखाली सांगोल्यातील अमित हनमंत पाटील यांची शिवसेना सोशल मीडिया सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



### ज्येष्ठ साहित्यिका सुमन चंद्रशेखर यांची तितिक्षा आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कारांची हॅटट्रिक

**बार्शी, दि. ९ जून-**
साहित्य क्षेत्रात सातत्याने दर्जेदार लेखन करणाऱ्या ज्येष्ठ साहित्यिका सुमन शिवानंद चंद्रशेखर यांनी तितिक्षा इंटरनॅशनल, पुणे यांच्यावतीने प्रदान करण्यात येणाऱ्या तितिक्षा आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कारांची हॅटट्रिक साधत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. सुमन चंद्रशेखर यांना कादंबरी, ललित लेखसंग्रह आणि कवितासंग्रहासाठी एकाच वेळी तीन प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत. तितिक्षा भावार्थसेवा अंतर्गत आयोजित करण्यात आलेला तितिक्षा आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार सोहळा कोल्हापूर येथे पार पडला. या सोहळ्यात सुमन चंद्रशेखर यांच्या तीन वेगवेगळ्या साहित्यकृतींना आंतरराष्ट्रीय स्तरावरील सन्मान प्राप्त झाला. त्यामध्ये 'मायेची पाखर' या कादंबरीसाठी तितिक्षा आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार - सर्वोत्कृष्ट कादंबरी पुरस्कार, 'आठवणींचा दरवळ' या पुस्तकासाठी तितिक्षा आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार - सर्वोत्कृष्ट ललित लेखसंग्रह पुरस्कार, 'परिमळ' या पुस्तकासाठी तितिक्षा आंतरराष्ट्रीय ग्रंथ पुरस्कार - सर्वोत्कृष्ट कवितासंग्रह पुरस्कार अशा तीन मानाच्या पुरस्कारांचा समावेश आहे. पुरस्कार सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पदक विजेते पर्यावरण तज्ज्ञ ॲड. तुषार शिवशरण हे होते. तसेच माजी आमदार जयश्री जाधव, लोककलावंत व अभिनेते राजेश खर्डे-वेसावकर, नाट्य अभिनेत्री शमा वैद्य, अभिनेत्री वैशाली राजशेखर, चित्रा साठे, जयमाला इनामदार तसेच शंकर अंदानी यांची उपस्थिती होती.

# कचरा कोंडाळे उघड्यावरच; स्वच्छतेचा उडाला बोजवारा




**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. ९ जून-**
मंगळवेढा नगरपरिषद हद्दीत काही महिन्यांपूर्वी बंद करण्यात आलेली उघड्यावरची कचरा कोंडाळे पुन्हा सुरू झाल्याने नागरिक आणि व्यापाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे परिसरात दुर्गंधी, प्रदूषण आणि आरोग्याच्या समस्या वाढल्याचा आरोप स्थानिकांकडून केला जात आहे. नगरपरिषदेत पूर्णवेळ मुख्याधिकारी नसल्याने स्वच्छता व्यवस्थेवर परिणाम होत असल्याचेही नागरिकांचे म्हणणे आहे.

शहरातील विविध भागांत प्लास्टिक, घरगुती व इतर घनकचऱ्याचे ढिगारे साचले असून, सकाळ-संध्याकाळ दुर्गंधीमुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. काही रहिवाशांनी श्वसनाचे आजार, सर्दी-खोकल्याच्या तक्रारी वाढल्याचे सांगितले. विशेषतः उघड्यावर साचलेल्या कचऱ्यामुळे कीटक, डास आणि रोगकारक जिवाणूंची वाढ होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

काही महिन्यांपूर्वी नगरपरिषदेकडून कचरा प्रक्रियेसाठी आराखडा तयार करण्यात आला होता. त्याअंतर्गत उघड्या कचरा कोंडाळ्यांना बंद करून वैज्ञानिक पद्धतीने कचरा व्यवस्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र हा उपक्रम प्रभावीपणे राबविला गेला नसल्याने पुन्हा जुन्या पद्धतीचा अवलंब करण्यात आल्याचे दिसून येत आहे.

स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी प्रशासनाच्या उदासीनतेवर टीका केली आहे. नगरपरिषदेत पूर्णवेळ मुख्याधिकारी नसल्याने महत्त्वाचे निर्णय वेळेत होत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तसेच स्वच्छता विभागातील मनुष्यबळाची कम तरता आणि रिक्त पदे हीदेखील समस्येची प्रमुख कारणे असल्याचे सांगितले जात आहे.

आरोग्य तज्ज्ञांच्या मते, उघड्यावर साचलेला कचरा हा अनेक संसर्गजन्य आजारांचे केंद्र ठरू शकतो. त्यामुळे कचऱ्याचे वर्गीकरण, जैविक कचऱ्यापासून कंपोस्ट निर्मिती, प्लास्टिकचे स्वतंत्र संकलन आणि नियोजित कचरा निस्तारण केंद्रांची उभारणी आवश्यक आहे. नागरिकांनी नगरपरिषदेकडून तातडीने स्वच्छता मोहीम राबविणे, रिक्त पदे भरणे आणि कायमस्वरूपी मुख्याधिकारी नेमण्याची मागणी केली आहे. तसेच कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र समिती स्थापन करून नागरिकांचा सहभाग वाढविण्याची आवश्यकता व्यक्त केली जात आहे. स्थानिक शाळांमध्ये आणि समाजकेंद्रांमध्ये स्वच्छता सप्ताह, कर्चयाचे वर्गीकरण कार्यशाळा आणि मोहिम राबविल्याने नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण होऊ शकते, असे समाजसेवक म्हणाले. त्यांनी पुढे नमूद केले की, महत्वाच्या क्षेत्रात तातडीने स्वच्छता मोहीम राबवावी आणि संयमी नियंत्रणासाठी सीसीटीव्ही किंवा परिपत्रकाद्वारे निरीक्षण वाढवावे. कायदेशीर बाबतीत, शहरातील नियम व पर्यावरण कायद्यांचे उल्लंघन झाल्यास त्याविरुद्ध दंडात्मक कारवाई केली जाऊ शकते. स्थानिक न्यायालयांमध्ये नागरिकांनी जनहित याचिका दाखल करून तातडीने कारवाई करावी, अशी सूचना काही लोकांनी दिली. त्यांनी म्हटले की, प्रशासनाने योग्य तोडगा न काढल्यास लोकांनी कायदेशीर मार्गांचा आधार घ्यावा. पर्यावरण संघटनांनी व बुद्धिजीविकांनीही या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची गरज अधोरेखित केली आहे. त्यांनी सांगितले की, कचरा व्यवस्थापन हे शहर नियोजनाचा एक अविभाज्य भाग आहे आणि ते दीर्घकालीन आर्थिक व सामाजिक आरोग्यासाठी आवश्यक आहे. तातडीने स्थायी मुख्याधिकारी नेमावा आणि कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र समितीची स्थापना करावी ज्यात शिक्षक, नागरिक प्रतिनिधी आणि पर्यावरण तज्ज्ञ यांचा समावेश असेल. नगरपालिकेचे मत ठेवल्याबद्दल त्यांनी पुढे सांगितले की, काही वेळा स्थानिक राजकीय दबाव आणि प्रशासकीय बदलांमुळे ठोस उपाय लवकर घडत नाहीत. 'प्रशासनात नियमितपणे नेमणुका, भरती व प्रशासकीय स्थैर्य असणे गरजेचे आहे. जर मुख्याधिकारी पूर्णवेळ नसतील तर प्रशासकीय कामकाजावर खऱ्या परिणाम दिसतात.

## जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्थेकडून सभासदांना ९० लाखांचा लाभांश

### 13 जून रोजी सर्वसाधारण सभा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.९ जून-**
जिल्हा परिषद कर्मचारी सहकारी पतसंस्था क्र. १, सोलापूरच्या वतीने सभासदांना तब्बल ९० लाख रुपयांचा लाभांश वितरित करण्यात येणार असून, याबाबतचा प्रस्ताव संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडण्यात येणार आहे. ही सभा शनिवार, १३ जून रोजी येथील डॉ. निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित केल्याची माहिती व्हाईस चेअरमन श्रीधर कलशेट्टी यांनी दिली.

सभेच्या पार्श्वभूमीवर आयोजित पत्रकार परिषदेत संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी आर्थिक व सामाजिक कार्याचा आढावा सादर केला. संस्थेचे भागभांडवल २० कोटी रुपये असून बचत ठेवी ५ कोटी २९ लाख रुपये आहेत. राखीव व इतर निधी मिळून संस्थेकडे ३ कोटी ८६ लाख रुपयांचा निधी उपलब्ध आहे. संस्थेची गुंतवणूक १ कोटी ४८ लाख रुपये असून कर्जवाटप व वसुलीचा व्यवहार २८ कोटी ५२ लाख रुपयांपर्यंत पोहोचला आहे. संस्थेने सातत्याने केलेल्या सामाजिक कार्याची दखल घेत राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. तसेच पूरग्रस्तांच्या मदतीसाठी 'अक्षय पात्रा' संस्थेला १ लाख ११ हजार रुपयांची मदत देण्यात आली आहे. सभासदांना यंदा ३.७५ टक्के लाभांश आणि बचत ठेवींवर ८ टक्के व्याज देण्याचा प्रस्ताव असून, सुमारे ९० लाख रुपयांची रक्कम सभा मंजूर झाल्यानंतर थेट सभासदांच्या बँक खात्यात जमा केली जाणार आहे.

यावेळी उपाध्यक्ष श्रीधर कलशेट्टी तसेच संचालक डॉ. एस. पी. माने, व्ही. व्ही. पाटील, एम. आर. तांबोळी, व्ही. एम. घेरडे, व्ही. व्ही. घोगरे, जी. एम. भारडकर, एस. डी. हिमाणे, टी. ए. मुतवल्ली, एस. एच. राठोड, सी. ए. वाघमारे, एम. एस. शिंदे, किरण लालबोंद्रे, विकास शिंदे, रोहित घुले, डॉ. पांडुरंग नवले तसेच तज्ज्ञ संचालक कुंडलिक खुदे यांच्या मार्गदर्शनाखाली संस्था कार्यरत आहे.



## वळसंग परिसरातील केळीच्या बागा जमीनदोस्त

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. ९ जून-**
दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग आणि चिंचोळी परिसरात शनिवारी झालेल्या अवकाळी मुसळधार पाऊस आणि तीव्र वादळी वाऱ्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. शेतकरी रमेश चिंचोळी व काशिनाथ माणकोजी यांच्या हातातोंडाशी आलेली केळीची बाग वादळामुळे पूर्णपणे उपटून पडली असून, त्यांचे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

शेतकरी माणकोजी यांनी कर्ज काढून आणि रात्रंदिवस मेहनत करून केळीची बाग जोपासली होती. बहुतांश झाडांना मोठे घड आले होते आणि काही दिवसांतच काढणी सुरू होणार होती. मात्र, काल सायंकाळी झालेल्या अचानक वादळी पावसामुळे केळीची झाडे मुळासकट उन्मळून पडली, तर काही झाडे मधोमध तुटली आहेत. यामुळे संपूर्ण घड मातीत लोळत असून लागवडीचा खर्चही निघणे अशक्य झाले आहे. या अस्मानी संकटामुळे शेतकरी माणकोजी व चिंचोळी यांच्यावर मोठे आर्थिक संकट कोसळले आहे.

प्रशासकीय दिरंगाई; पंचनाम्याची प्रतीक्षाघटना घडून २४ तास उलटत आले तरी अद्याप कृषी किंवा महसूल विभागाकडून या भागाची पाहणी झालेली नाही. वळसंग परिसरातील तलाठी समाधान काळे, मंडळ अधिकारी संतोष फुलारी आणि तहसीलदार किरण जमदाडे यांनी या परिस्थितीची दखल घ्यावी, अशी मागणी ग्रामस्थांमधून होत आहे. शासकीय अधिकाऱ्यांनी तात्काळ बांधावर येऊन नुकसानीचे पंचनामे करावेत, तरच शेतकऱ्याला पीक विमा आणि शासकीय मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होईल.शेतकऱ्यांची आर्त हाक बँकेचे कर्ज आणि उधारी घेऊन केळीची बाग उभी केली होती. डोळ्यांदेखत सर्व कष्ट मातीमोल झाले. आता कर्ज कसे फेडायचे आणि कुटुंब कसे चालवायचे, तहसीलदार किरण जमदाडे तात्काळ पंचनाम्यांचे आदेश देऊन आम्हाला आर्थिक मदत मिळवून द्यावी, अशी मागणी पीडित शेतकरी माणकोजी व चिंचोळी यांनी केली.

## मृगाची दमदार सुरुवात; खरिपाला मिळाला दिलासा

### पेरणीसाठी आणखी पावसाची आवश्यक



**तभा वृत्तसेवा,**
**माळिशरस, दि. ९ जून-**
कृषी व्यवसायाला वरदान ठरणारा मृग नक्षत्राचा पावसाने सुरुवात दमदार केल्याने खरीप हंगामाला दिलासा मिळाला. मात्र काही ठिकाणी वादळाचा तडाखा बसलेल्या शेतकऱ्यांना मोठ्या नुकसानीला सामोरे जावे लागले आहे. खरिपाच्या दृष्टीने कृषी विभागाने नियोजित तयारी केली असून वेळेत पडलेल्या पावसाने सध्या तरी बळीराजा सुखावला आहे. उन्हाळ्याच्या अखेरीस पाणीटंचाईच्या तोंडावर मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर तालुक्यात बहुतांश ठिकाणी बऱ्यापैकी पावसाने हजेरी लावली.पेरणीसाठी आणखी पावसाची आवश्यकता आहे.

**खतांचे नियोजन**

युरिया - ९ हजर ८ मे. टन उपलब्ध ५ हजार १३८. ६४ मे टन, डीएपी १ हजार ७४० उपलब्ध १ हजार ४१४.७०, एमओपी मंजूर ७४० मे टन उपलब्धता ९३१.७५, एसएसपी मंजुरी १ हजार ८८० उपलब्धता २ हजार ४०९.७५, कॉम्पेलक्स मंजूर ५ हजार ९८० उपलब्धता ५ हजार ७४२ मंजुरी. २० हजार १४० उपलब्धता १५ हजार ६३६.८४ मे. टन.

**बियाणे नोंद**

बाजरी अपेक्षित पेरणी क्षेत्र ५ हजर २ ७८ हे बियाणे २११ क्विंटल, मका १४ हजार २८५ हे . २ हजार ८५७ क्विंटल, तूर १२१ हे १८ क्विंटल, मुग ८६ हे १७ क्विंटल, उडीद ३८ हे १० क्विंटल, भुईमुग ४२ हे ५० क्विंटल अशा पद्धतीने खरीप बियाण्यांचे नियोजन करण्यात आले आहे.

> पावसाने वेळेत सुरुवात केली आहे .पेरणीयोग्य पाऊस नाही मात्र पेरणीयोग्य पाऊस पडेल अशी आशा वाटत असल्याने यावर्षी खरीपात बाजरी मक्याची पेरणी जादा होणार आहे याशिवाय ऊस चारा पिकांनाही मोठा प्राधान्य मिळेल त्या दृष्टीने बियाणे व खतांबाबत्ती प्रशासनासह कृषी दुकानांची तयारी पूर्ण झाली आहे.
>
> - **भीमराव शेंडगे,** अध्यक्ष कृषी दुकानदार संघटना माळिशरस



## अबुहसन खतीब यांची औद्योगिक न्यायालयात महसूल सहाय्यकपदी नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**उत्तर सोलापूर, दि. ९ जून-**
घरची परिस्थिती जेमतेम. वडील सुलतान शेख हे टेम्पो चालवून चरितार्थ चालवितात. तर दोघांच्या शिक्षणासाठी खर्च करणे शक्य नसल्याने लहान भाऊ आदमने मोठ्या भावाला प्रोत्साहन देऊन स्वतः शिक्षणासाठी केलेला त्याग. जिद्द न सोडता तब्बल बारा वर्षे केलेल्या परिश्रमाचे फळ मिळाले अनब वडाळा येथील अबुहसन सुलतान शेख या युवकाने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत यश प्राप्त केले. अबुहसनची महसूल सहाय्यक (औद्योगिक न्यायालय) या पदावर नियुक्ती झाली आहे. अबुहसन हे वडाळा येथील माऊली महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. त्यांचे शालेय शिक्षण वडाळा येथील काकानगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व न्यू हायस्कूलमध्ये झाले.तर महाविद्यालयीन शिक्षण माऊली महाविद्यालयात झाले.२०११ मध्ये बी.ए.पदवी उत्तीर्ण झाल्यानंतर स्पर्धा परिक्षेची तयारी केली. अनेकवेळा अपयश येऊन देखील अबुहसन यांनी चिकाटी सोडली नाही. कुटुंबातील सर्व सदस्यांनी देखील त्यांना प्रोत्साहन दिले. हे यश मिळिवल्याबद्दल श्री भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जितेंद्र साठे यांनी अबुहसन व त्यांचे वडील सुलतान खतीब यांचा सत्कार केला.यावेळी रिपाइंचे जिल्हा सरचिटणीस श्यामसुंदर गायकवाड, दत्तात्रय वीर, सुभाष गायकवाड, आयुब सय्यद, अमोल गायकवाड उपस्थित होते.